
जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष : ३१ | अंक : १४ | मूल्य ४ रुपये | पृष्ठे ८+ ४ = १२ | जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प



नि कुटुंबातील सर्व लहान-मोठे, स्त्री आणि पुरुष यांनी आठवड्यातून एक दिवस कोणत्याही ठरावीक वेळी अनौपचारिकपणे एकत्र बसावे आणि गेल्या आठवड्यात देशासंबंधी, समाजासंबंधी घडलेल्या घटनांची तसेच संघ व विविध कार्यांच्या हालचालींची चर्चा करावी, आपल्या भाषेतून निघणाऱ्या साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वार्तांचा उल्लेख व्हावयास हरकत नाही. कुटुंबातील सर्वांना या एकत्रीकरणात मनापासून भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### सरन्यायाधीशांच्या हस्ते कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन

**मुंबई** : भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते रविवारी कोल्हापूर जिल्ह्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन सर्किट बेंचचे उद्घाटन केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. कोल्हापुरात चौथ्या खंडपीठाची स्थापना मागील काही वर्षांपासून विविध स्तरावरून होत असलेल्या मागणीच्या पृष्ठभूमीवर करण्यात आली आहे. कोल्हापूर परिसरातील नागरिकांना त्यांच्या याचिकांच्या सुनावणीसाठी ३८० किमी अंतरावर असलेल्या मुंबईला जावे लागणाऱ्या याचिकाकर्त्या आणि वकिलांवरचा भार कमी होईल. सध्या मुंबईतील प्रमुख खंडपीठाव्यतिरिक्त उच्च न्यायालयाचे आणखी दोन खंडपीठे आहेत. त्यात विदर्भातील नागपूर आणि मराठवाडा क्षेत्रातील छत्रपती संभाजीनगरचा समावेश आहे. उच्च न्यायालयाचे तिसरे खंडपीठ शेजारच्या गोव्यात आहे. १ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांनी कोल्हापूरला सर्किट बेंच म्हणून नियुक्त करण्याची अधिसूचना जारी केली.

श्री क्षुधाशांती सेवा संस्था
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ९
(जेवण पार्सल उपलब्ध)
सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा, उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रू.
वरण, बट्टी ३० रू.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रू
पार्सल मिळेल
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# राधाकृष्णन् रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार

## जे. पी. नड्डा यांनी केली महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नावाची घोषणा

**नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

रालोआने उपराष्ट्रपती पदाच्या उमेदवाराची घोषणा केली. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् रालोआचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार असतील, अशी घोषणा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी रविवारी सायंकाळी केली. भाजपाच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत उपराष्ट्रपती पदाच्या उमेदवाराचे नाव निश्चित करण्यात आले, अशी माहिती जे. पी. नड्डा यांनी दिली.

उपराष्ट्रपती सर्व सहमतीने व्हावा, यासाठी विरोधकांसोबत चर्चा केली जाणार आहे, अशी माहिती नड्डा यांनी दिली. असे आम्ही यापूर्वीही केले आहे. आम्ही विरोधकांच्या संपर्कात आहोत. आमच्या वरिष्ठ नेत्यांनी यापूर्वीही त्यांची भेट घेतली आणि ते संपर्कात आहेत. रालोआने उपराष्ट्रपती पदासाठी सी. पी. राधाकृष्णन् यांची उमेदवारी निश्चित केली आहे आणि सहकारी पक्षांनीही या निर्णयाला पाठिंबा दिल्याचे नड्डा यांनी सांगितले.



उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् यांचे अभिनंदन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

तामिळनाडूच्या तिरुप्पूर येथे २० ऑक्टोबर १९५७ रोजी चंद्रपुरम् पोनुस्वामी राधाकृष्णन् यांचा जन्म झाला. ते भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत आणि सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. राधाकृष्णन् यांनी आपला राजकीय प्रवास जनसंघाच्या माध्यमातून सुरू केला होता. १९९८ आणि १९९९ मध्ये कोईम्बतूर येथून लोकसभा निवडणूक जिंकले होते. २००३ ते २००६ या कालावधीत ते तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष राहिले.

सी. पी. राधाकृष्णन् फेब्रुवारी २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत झारखंडचे राज्यपाल राहिले. या व्यतिरिक्त मार्च ते जुलै २०२४ या कालावधीत तेलंगणाचा अतिरिक्त प्रभार त्यांच्याकडे होता. त्यानंतर मार्च ते ऑगस्ट २०२४ पर्यंत त्यांनी पुडुचेरीच्या नायब राज्यपालाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला होता. ३१ जुलै २०२४ पासून ते महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत.

### सी. पी. राधाकृष्णन् यांचे उल्लेखनीय कार्य

तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष असताना २००४ ते २००७ या कालावधीत त्यांनी ९३ दिवसांची रथयात्रा काढली होती. नदीजोड, दहशतवादाच्या विरोधात जागरुकता आणि अस्पृश्यता निर्मूलनाचा उद्देश या रथयात्रेमागे होता. संसदेत ते वस्त्रोद्योगावरील स्थायी समितीचे अध्यक्षही होते. सोबतच त्यांनी कित्येक आर्थिक आणि सामाजिक उपक्रमांशी संबंधित समित्यांमध्ये सक्रिय भूमिका पार पाडली होती. त्यांनी व्हीओ कोईम्बतूर येथील चिदम्बरम् महाविद्यालयातून बीबीएची पदवी प्राप्त केली आहे.

# सात दिवसांत शपथपत्र द्या, अन्यथा देशाची माफी मागा

## ज्ञानेश कुमार यांचा राहुल गांधींना इशारा | निवडणूक आयोगाने पत्रपरिषदेत फेटाळले आरोप

**नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

निवडणूक आयोग आणि मतदारयादीच्या मुद्यावर लावण्यात आलेले आरोप निराधार आणि खोटे आहेत. आरोप करणाऱ्यांकडे त्याचे पुरावे असल्यास, त्यांनी सात दिवसांत शपथपत्र दाखल करावे, अन्यथा संपूर्ण देशाची माफी मागावी, असा इशारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना रविवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

एकतर शपथपत्र दाखल करावे लागेल किंवा देशाची माफी मागावी लागेल. तिसरा पर्याय नाही. सात दिवसांच्या आत शपथपत्र मिळाले नाही, तर हे सर्व आरोप निराधार राहतील, असा अर्थ याचा राहील, असे ज्ञानेश राव यांनी सांगितले.

दुहेरी मतदान आणि मतचोरीचे आरोप निवडणूक आयोगाने फेटाळून लावले आणि सर्व भागधारक पारदर्शक पद्धतीने पुनरीक्षण यशस्वी करण्यासाठी काम करीत असल्याचे स्पष्ट केले. राहुल गांधी यांचे वक्तव्य संविधानाचा अपमान करणारे आहे. मतचोरीसारखे शब्द लोकशाही संस्थांना कमकुवत करतात, असे



आयोगाने म्हटले. राजकीय पक्ष फायदा लाटण्यासाठी मतदारांना लक्ष्य करण्यासाठी निवडणूक आयोगाचा वापर करीत असल्याचा आरोप कुमार यांनी केला.

निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून भारतातील मतदारांना लक्ष्य करून राजकारण केले जात असताना, आज निवडणूक आयोग सर्वांना हे स्पष्ट करू इच्छितो की, निवडणूक आयोग निर्भयपणे गरीब, श्रीमंत, वृद्ध, महिला, तरुणांसह सर्व वर्ग आणि सर्व धर्मांच्या सर्व मतदारांसोबत उभा राहिला आहे आणि कोणताही भेदभाव न करता उभा राहील, असे कुमार म्हणाले.

**मतदार भगिनी, माता यांचे व्हिडीओ द्यायचे का?**

मशिन रिडेबल मतदार यादीबाबत बोलायचे तर सुप्रीम कोर्टाने २०१९ मध्येच म्हटले होते की, मतदाराच्या खाजगीपणावर मर्यादा येऊ शकतात. असे काही गैरप्रकार प्रकार झालेले आहेत. मतदार भगिनी, माता यांचे व्हिडीओ शेअर केले गेले पाहिजेत का? मतदार आपल्या आवडत्या नेत्याला मत देतो. लोकसभा निवडणुकीत मतदान प्रक्रियेत मोठी यंत्रणा कार्यरत असते. लाखो कर्मचारी यात असतात. या पारदर्शी प्रक्रियेत कोणी वोट चोरी करू शकतो का?

### पत्रकार परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे

- वारंवार खोटे सांगितल्यास ते खरे होत नाही.
- निवडणूक आयोग राजकीय पक्षांत भेदभाव कसा करू शकतो?
- आयोग सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असा भेद करीत नाही.
- राजकीय पक्ष बंदूक आयोगाच्या खांद्यावर ठेवून चालवत आहेत.
- कुणी कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, आयोग आपल्या घटनात्मक कर्तव्यापासून मागे हटणार नाही.

# उत्तराखंडमध्ये मदरसा बोर्ड कायदा रद्द

**डेहराडून, १७ ऑगस्ट**

काँग्रेस सरकारच्या काळात लागू केलेला मदरसा शिक्षण मंडळ कायदा रद्द करण्याचा निर्णय उत्तराखंड सरकारने घेतला आहे.



त्याऐवजी उत्तराखंड अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था विधेयक, २०२५ विधानसभेत मंजूर करून नवीन कायदा आणला जाईल. यात शीख,जैन धर्मांच्या शाळांना अल्पसंख्याकाचा निधी मिळण्याची तरतूद असल्याची माहिती मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी रविवारी दिली.

मुख्यमंत्री धामी म्हणाले, उत्तराखंड विधानसभेचे पावसाळी अधिवेशन १९ ते २२ ऑगस्ट दरम्यान गैरसैन येथे होणार आहे. या अधिवेशनात सरकारने मदरसा बोर्ड कायदा रद्द करून त्याऐवजी उत्तराखंड अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था विधेयक, २०२५ आणण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तत्कालीन काँग्रेस सरकारने केलेल्या कायद्यामुळे केवळ मदरसातील शाळांनाच निधी मिळायचा मात्र नवीन कायद्यानुसार शीख आणि जैनांसह इतर धर्मांशी संबंधित शैक्षणिक संस्थांनाही निधी मिळणार आहे. सरकार उत्तराखंड मदरसा शिक्षण मंडळ कायदा, २०१६ आणि उत्तराखंड गैर-सरकारी अरबी आणि फारसी मदरसा मान्यता नियम, २०१९ हे कायदेदेखील रद्द केले जाणार आहे. अल्पसंख्याक संस्था असल्याचा लाभ घेण्यासाठी सर्व संस्थांना राज्य सरकारकडून परवानगी घ्यावी लागेल आणि त्यांच्याकडे नोंदणी करावी लागेल

### देशातील ठरणार पहिलेच राज्य

शीख, जैन, ख्रिश्चन, बौद्ध आणि पारशी यासारख्या इतर अल्पसंख्याक समुदायांना फायदा व्हावा यासाठी मदरसा शिक्षण मंडळ कायदा रद्द करणारे उत्तराखंड देशातील पहिले राज्य ठरणार असल्याचे मुख्यमंत्री धामी यांनी सांगितले.

# कठुआत ढगफुटी, दरड कोसळून सात ठार

**जम्मू** : जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यात रविवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या ढगफुटी आणि दरड कोसळण्याच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये चार कुटुंबांतील पाच मुलांसह सात सदस्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील राजबागच्या जोड घाटी गावात आणि जंगलोटच्या बागरा गावात ही आपत्ती आली. यामुळे पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाली आणि अनेक सखल भाग पाण्याखाली गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ढगफुटीमुळे जोध घाटी येथे एक पुरुष आणि त्याच्या दोन अल्पवयीन मुलांसह पाच जणांचा मृत्यू झाला. यामुळे गावातील संपर्क तुटला.

# अंतराळवीर शुभांशुचे मायभूमीत आगमन

## विमानतळावर जल्लोषात स्वागत, शालेय विद्यार्थी, मान्यवरांची उपस्थिती

**नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन आणि नासाच्या ॲक्झिअम-४ या यशस्वी अंतराळ मोहिमेचे पायलट शुभांशु शुक्ला यांचे रविवारी आज पहाटे अमेरिकेतून भारतात आगमन झाले.

राजधानी दिल्ली येथील विमानतळावर त्यांचे आगमन होताच केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह, मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी त्यांचे स्वागत केले. विमानतळावर उपस्थित असलेले शालेय विद्यार्थी आणि इतर मान्यवरांनी त्यांचे भारत माता की जयच्या घोषणा देत जंगी स्वागत केले. शुभांशु यांच्यामुळे देशाच्या अंतराळ संशोधन क्षेत्रातील एका सुवर्ण क्षणाची नोंद झाली असे डॉ. सिंह यावेळी म्हणाले. यावेळी शुभांशु यांच्यासोबत भारताच्या महत्त्वाकांक्षी गगनयान



मोहिमेसाठी निवडलेले दुसरे अंतराळवीर ग्रुप कॅप्टन प्रशांत बाळकृष्णन नायर हेदेखील भारतात परतले. ते या मोहिमेसाठी भारताचे राखीव अंतराळवीर होते. विमानतळावर मंत्री डॉ. सिंह यांनी शुभांशु यांच्या पत्नी कामना शुक्ला यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शुभांशु शुक्ला लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याची शक्यता असून, त्यानंतर ते आपल्या मूळ गावी लखनौला रवाना होतील

# जळगाव एमआयडीसीतील भूखंड ताब्यात घेणार

## उद्योग न उभारणाऱ्यांना नोटीस; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

शहरासह जिल्ह्यातील अन्य ठिकाणी स्थापन झालेल्या एमआयडीसी औद्योगिक प्रयोजनासाठी अनेक भूखंड दिले गेले आहेत. नवीन उद्योगांना जागा मिळत नाही, म्हणून ते नव्या एमआयडीसीची मागणी करतात. मात्र, वर्षानुवर्षे ज्यांना एमआयडीसीअंतर्गत भूखंड दिले, ते त्यांनी विकसित केले नसल्याचे समोर आले आहे. अशा भूखंडधारक लाभार्थ्यांना तीन महिन्यांची नोटीस बजावून भूखंड विकसित करण्यासंबंधी सूचना देण्यात येईल; अन्यथा ते सर्व भूखंड ताब्यात घेतले



जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हा नियोजन विभागाचा रविवारी (१७ ऑगस्ट) आढावा घेतला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत अजित पवार यांनी विविध विषयांवर माहिती दिली. ते म्हणाले की, मराठवाडा, विदर्भाच्या धर्तीवर उद्योगांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्यासंदर्भात उद्योजकांनी मागणी केली आहे. राज्य सरकारची तशी योजनाही आहे. उत्तर महाराष्ट्रात धुळे व नंदूरबार या जिल्ह्यांचा अशा प्रकारच्या योजनेत समावेश करण्यात आला आहे. मात्र, जळगाव त्यापासून वंचित आहे. जळगावचाही त्यात अंतर्भाव असावा, अशी मागणी होते आहे. त्याचा सकारात्मक विचार करून जळगाव जिल्ह्यातील उद्योगांना सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्यात येईल, अशी महत्त्वाची घोषणा अजित पवार यांनी केली.

### कंत्राटदारांच्या थकीत बिलांपोटी साडेचार हजार कोटी अदा

थकीत बिलांमुळे कंत्राटदार आंदोलन करीत असून, रस्ते, पुलांची कामे ठप्प आहेत. विकासकामांचा निधी अन्यत्र वळविल्याच्या मुद्यावर अजित पवार म्हणाले की, अशाप्रकारे कुठलाही निधी वळवता येत नाही. राज्यातील कंत्राटदारांच्या थकीत बिलांपोटी नुकतेच चार हजार ६०० कोटी रुपये अदा केले. जळगावच्या अधीक्षक अभियंत्यांनी ३०० कोटींची मागणी केली आहे, त्याचीही पूर्तता केली जाईल, असे सांगत विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.



## थोडक्यात महत्त्वाचे...



### प्रा. भूषण पाटील यांना पीएच. डी. पदवी प्रदान

**शिरपूर :** आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रा. भूषण वामनराव पाटील यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे इलेक्ट्रॉनिक्स विषयात डॉक्टरेट (पीएच. डी.) पदवी प्रदान करण्यात आली. 'मेटा हेरिस्टिकस अस्सिटेड हायब्रीड डीप लर्निंग मॉडेल फॉर कॉटन डिसीझ प्रेडिकशन- ऑन इंटरनेट ऑफ थिंग्स बेस्ड अँप्लिकेशन' हे डॉ. भूषण पाटील यांनी सादर केलेल्या संशोधनाचे मुख्य शीर्षक होते. हे संशोधन कॉम्प्युटर सहाय्यक प्रणालीद्वारे कापूस पिकावरील रोग शोध आणि निदान यावर उपयुक्त ठरणारे आहे. प्रा. भूषण पाटील यांना डॉ. प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी प्रा. भूषण पाटील यांचा गौरव केला.



### कनिष्ठ महाविद्यालयात पसायदानाचे उत्साहपूर्ण पठण

**शहादा :** येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माउलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी पसायदानाचे सामूहिक पठण उत्साहात केले. या वेळी उपप्राचार्या प्रा. कल्पना पटेल, पर्यवेक्षक प्रा. के. एच. नागेश, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. अरविंद पाटील व प्राध्यापक बंधू-भगिनी उपस्थित होते. प्रा. डोळे यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वरीतील पसायदान हे संत ज्ञानेश्वरांनी भगवंताकडे जगातील सर्व प्राणिमात्रे सुखी राहण्यासाठी मागितलेले कृतज्ञ मागणे आहे, असे मार्गदर्शन केले. उपप्राचार्या कल्पना पटेल यांनी मार्गदर्शन केले. प्रा. पी .सी. चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयेश चौधरी यांनी आभार मानले.



### कृषी महाविद्यालयात नशामुक्ती संकल्प अभियान

**शहादा :** पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित के. व्ही. पटेल कृषी महाविद्यालयात शहादा शहर पोलिस ठाण्यातर्फे नशामुक्त संकल्प अभियानांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. विजय गवांदे यांनी प्रास्ताविकात नशामुक्ती संकल्प अभियानाचे उद्दिष्ट व युवकांची मानसिकता त्यासोबतच वाढणाऱ्या अमली पदार्थांच्या सेवनावर त्यांनी भाष्य केले. १५ विद्यार्थ्यांनी नशामुक्ती या विषयावर पोस्टर सादरीकरण केले. त्यापैकी दोन विजेत्या विद्यार्थ्यांना शहादा पोलिस ठाण्याचे निरीक्षक नीलेश देसले यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना नशामुक्तीपर शपथ देण्यात आली. प्राचार्य डॉ.प्रकाश पटेल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रासंगिक उदाहरण देत नशामुक्तीसाठी काम करण्याची प्रेरणा दिली.




### शहादा कनिष्ठ महाविद्यालयात युवांमध्ये देशभक्तीचा संचार

**शहादा :** येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी हर घर तिरंगा अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता केली. आपल्या घरी व परिसरात तिरंगा लावण्यासाठी सर्वत्र आवाहन केले. महाविद्यालय आवारात शिस्तीत बसून हर घर तिरंगा अभियानाच्या जागर जनमाणसात पोहोचविण्यासाठी अशी राष्ट्रभक्ती दाखविली. या वेळी उपप्राचार्या प्रा. कल्पना पटेल, पर्यवेक्षक प्रा. के. एच. नागेश, प्रा. व्ही. सी. डोळे, प्रा. ए .पी. पाटील, प्रा. अरविंद पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. ऊर्मिला पावरा आदी उपस्थित होते.

### अमली पदार्थ, महिला सुरक्षाविषयी मार्गदर्शन

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल व कनिष्ठ



महाविद्यालयातील अकरावी व बारावीतील विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, महिला सुरक्षाविषयक कायदे व उपाययोजना, बाललैंगिक अत्याचार, पोक्सो कायदा, सायबर क्राइम व ऑनलाइन गेमिंग आदींविषयी शिरपूर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक हेमंत खैरनार यांनी मार्गदर्शन केले.वाहतूक सुरक्षा, वाहतुकीचे नियम, विनापरवाना वाहन चालविणे यासंबंधी माहिती व गुन्हे याबाबत वाहतूक विभागातील हवालदार श्याम पवार यांनी मार्गदर्शन केले. या वेळी प्राचार्य सचिन पाटील उपस्थित होते. सचिन बागूल यांनी प्रास्ताविक केले. या वेळी क्रीडाप्रमुख राहुल स्वर्गे, शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते.

## निधन वार्ता



### विजया तावडे

**भुसावळ :** येथील तापीनगर भागातील चिंतामणी विहारमधील रहिवासी विजया अरुण तावडे (वय ५४) यांचे अल्प आजाराने निधन झाले. महावितरणचे निवृत्त कर्मचारी अरुण एकनाथ तावडे यांच्या पत्नी, तर गोदावरी स्कूलमधील संगीत शिक्षक कुंदन तावडे यांच्या त्या आई होत.



### नारायण कासार

**जळगाव :** शहरातील शिव कॉलनी भागातील रहिवासी नारायण गोपाळ कासार (वय ७५) यांचे १५ ऑगस्टला अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, दोन भाऊ, असा परिवार आहे. सचिन व पंकज यांचे ते वडील होत.

# लाडक्या बहिणींची ऊर्जा शहर विकासासाठी लाभदायक

## पालकमंत्री रावल : मुख्यमंत्र्यांसाठी धुळ्याच्या ४२ हजारांवर राख्यांचे संकलन

**धुळे :** भाजप प्रदेशाध्यक्षांच्या सूचनेवरून राज्यभरात रक्षाबंधन पर्वाचा उपक्रम झाला. त्याअंतर्गत शहरातील महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांसह लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यासाठी १५ हजार राख्यांचे लक्ष्य असताना तब्बल तिप्पट म्हणजे ४२ हजार २०० राख्यांचे संकलन केले. अजूनही हे संकलन सुरूच असून, हा आकडा ५० हजारांवर पोहोचेल. याच लाडक्या बहिणींच्या साथीने शहराला एका वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी कटिबद्ध होऊया, असे आवाहन पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

रक्षाबंधन पर्वाच्या प्रदेश संयोजिका जयश्री अहिरराव, महानगर जिल्हा संयोजिका वैशाली शिरसाट यांच्या नेतृत्वात शहरातील विविध प्रभागांतील लाडक्या बहिणींकडून मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासाठी राख्यांचे संकलन झाले. संकलित ४२ हजार २०० राख्या जलसंपदामंत्री महाजन व पालकमंत्री रावल यांच्याकडे शनिवारी (१६ ऑगस्ट) सायंकाळी सुपूर्द करण्याचा कार्यक्रम आमदार अनुप अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयात झाला.



### लाडक्या बहिणींच्या ताकदीपुढे सारेच पिके

माजी आमदार कुणाल पाटील म्हणाले, की शहरात पक्षाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचा हा माझा दुसरा-तिसरा प्रसंग आहे. यामध्ये आपण सर्वांनी मला पक्षात सामावून घेतल्याची भावना खूपच समाधानाची आहे. माझ्याशी मनमोकळेपणे चर्चा करत, स्मितहास्याने माझे स्वागत करत मी परका नसल्याची जाणीव करून देत आहात. पण एक खरे आहे, की या लाडक्या बहिणी काय करू शकतात, याचे सर्वांत मोठे उदाहरण माझ्याशिवाय दुसरा कोणीही देऊ शकत नाही. असे सांगताच सर्वांनी मनमोकळी दाद देत हास्याचा स्फोट केला. धुळे शहरासह ग्रामीणमध्येही पक्षासाठी तुमच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याची ग्वाही माजी आमदार पाटील यांनी दिली.

आमदार अनुप अग्रवाल, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे प्रदेश सरचिटणीस डॉ. सुशील महाजन, महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, प्रतिभा चौधरी, जयश्री अहिरराव, वैशाली शिरसाट, बेटी बचाव-बेटी पढावच्या प्रदेश संयोजिका अल्पा अग्रवाल, ज्येष्ठ नेते हिराण गवळी, विजय पाच्छापूरकर, लाडकी बहीण योजनेच्या संयोजिका किरण कुलेवार, भगवान गवळी, नरेश चौधरी आदी व्यासपीठावर होते.

प्रारंभी सौ. अहिरराव व सौ. शिरसाट यांनी प्रास्ताविकात राख्या संकलनाची माहिती दिली. उपक्रमासाठी पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभलेच. शिवाय शहरातील प्रत्येक प्रभागातील भगिनींसह पक्षाच्या सहकारी भावांनीही यात योगदान देत मदत केल्याने हा उपक्रम यशस्वी होऊ शकल्याचे सांगत सर्वांचे आभार मानले.

### लाडक्या देवाभाऊंचे रक्ताने काढले चित्र

राख्या संकलनात मोलाची भूमिका बजावणाऱ्या शहरातील अॅड. नेहा अहिरराव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी स्वतःच्या रक्ताने व स्वतःच्या हाताने त्यांचे चित्र काढले. हे चित्र अॅड. अहिरराव व आमदार अग्रवाल यांच्या हस्ते पालकमंत्री रावल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. आमदार अग्रवाल यांनी सांगितले की, अॅड. अहिरराव यांच्या चित्राचा व्हिडिओ माझ्या पाहण्यात आल्यानंतर तो मी मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठविला. त्यांनी त्या व्हिडिओची तत्काळ दखल घेत अवघ्या दोन तासांनी मला आणि अॅड. अहिरराव यांना लघुसंदेश करीत आभार मानले. यातून देवाभाऊंचे लाडक्या बहिणींवर किती प्रेम आहे, याची प्रचिती आली. या वेळी बेटी बचाओ-बेटी पढाओच्या संयोजिका अल्पा अग्रवाल आणि पक्षाचे कार्यकर्ते मोहित देसले यांच्यातर्फे मुख्यमंत्री फडणवीस यांना देण्यासाठी राखीची प्रतिकृती असलेली सुंदर फ्रेम पालकमंत्री रावल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

पालकमंत्री रावल म्हणाले, की राज्य शासनाच्या माध्यमातून विविध वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजना राबविल्या जात आहेत. त्यातून समाजातील तळागाळातील घटकांना हा लाभ देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न होत आहे. राज्यातील लाडक्या बहिणींसाठी ६० हजार कोटींची तरतूद केली जात आहे. यामुळे महिलांना मोठा आधार मिळाला आहे. यापुढेही महिलांसह सर्वच घटकांसाठी विविध योजना राबवून त्यांना त्यांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

आमदार अग्रवाल म्हणाले की, **लाडक्या बहिणींनी दिलेल्या राख्या** जलसंपदामंत्री महाजन व पालकमंत्री रावल मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवतील. यात धुळे शहराने सर्वाधिक राख्या संकलित केल्याचेही आवर्जून सांगतील. डॉ. सुभाष भामरे, श्री. अंपळकर यांनीही या उपक्रमात योगदान देणाऱ्या पक्षाच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या, शहरातील लाडक्या बहिणींसह सर्वांचे कौतुक केले.

# पिंपळनेरमध्ये चोरट्यांनी भरदिवसा बंद घराला केले लक्ष्य

## घरातील रोख रकमेसह सोन्याचा दागिना केला लंपास

**पिंपळनेर (साक्री) :** घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून रोख रकमेसह सोन्याचा दागिना लंपास केला. विशेष म्हणजे गजबजलेल्या व सतत वर्दळीचा परिसर असलेल्या भागात भरदुपारी ही घरफोडीची घटना घडल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपळनेर पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पथक घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी शनिवारी दुपारी पिंपळनेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथील सुमननगर भागात १५ ऑगस्टला दुपारी दीडच्या सुमारास सुपडू पाखले यांनी त्यांच्या मनुश्री किराणा दुकानाचे शटर व राहत्या घराला कुलूप लावून ते त्यांची पत्नी वैशाली पाखले असे दोघेही मुलगी, जावई व नातवंडे यांना भेटण्यासाठी बसने नंदुरबार येथे गेले होते. दरम्यान, मुलीच्या घरी नंदुरबार येथे पोहोचल्यावर त्यांच्या घराशेजारी राहणारे हरीश गुजराथी यांनी पाखले यांना दुपारी चारच्या दरम्यान भ्रमणध्वनीवरून संपर्क करीत तुमच्या घराचा दरवाजा उघडा आहे. तुम्ही दरवाजा उघडा ठेवून गेले का? असे सांगितले. त्या वेळी पाखले यांनी सांगितले की, मी दरवाजा लावला आहे.तरी तुम्ही खात्री करा. त्यावर त्यांनी खात्री करून सांगितले की, तुमच्या घराच्या दरवाजाचे कुलूप हे तोडलेले आहे व घरातील कपाट अस्ताव्यस्त पडलेले आहे. असे सांगितल्यावर पाखले हे पत्नी, जावई व मुलीसह खासगी वाहनाने नंदुरबार येथून सायंकाळी साडेसहाच्या सुमारासपिंपळनेर येथील सुमननगरमधील राहत्या घरी दाखल झाले. घरी येताच त्यांना घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडलले दिसले. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे लॉक तुटलेले व दुकानातील गल्ला अस्ताव्यस्त पड़लेला आढळून आला.दुकानातील गल्ल्यातील रोख रक्कम व कपाटात ठेवलेला सोन्याचा



अखंड तुकडा या वस्तू आढळून आल्या नाहीत. चोरट्यांनी घरात शिरून १६ हजार ६० रुपये रोख रक्कम व दोन लाख ४८ हजार रुपये किमतीचा २५ ग्रॅमचा सोन्याचा अखंड तुकडा, असा सुमारे दोन लाख ६४ हजार ६० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. पोलिसांनी तपासाला गती देऊन चोरट्यांना जेरबंद करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. याप्रकरणी सुपडू जगन्नाथ पाखले (वय ५८) यांच्या फिर्यादीवरून पिंपळनेर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिरीक्षक संदीप संसारे तपास करीत आहेत.

# घरफोडीचे ६० वर गुन्ह्यांतील सराईत गुन्हेगार पोलिसांच्या हाती!

## सव्वासहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत, चार गुन्हे उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १७ ऑगस्ट**

घरफोडीचे ६० पेक्षा अधिक गुन्ह्यांतील सराईत गुन्हेगार दिल्लीला पळून जाण्याच्या तयारीत असताना स्थानिक गुन्हे शाखा व शहर पोलिसांच्या संयुक्त पथकाच्या हाती लागला. त्याच्याकडून तब्बल सहा लाख २७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करीत घरफोडीचे चार गुन्हे उघडकीस आले.

शहरातील घरफोडीतील सराईत गुन्हेगार शहरातील गुरुकुलनगर परिसरात फिरत असून, तो दिल्लीला पळून जाण्याचे तयारीत आहे, अशी गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांना १६ ऑगस्टला मिळाली. पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांनी शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांना याबाबत माहिती देऊन दोन वेगवेगळी पथके सराईत गुन्हेगाराच्या शोध



घेण्याकामी रवाना केले. पथकांनी मिळालेल्या गोपनीय माहितीप्रमाणे सराईत गुन्हेगार जिम्मी ऊर्फ दीपक शर्मा याचा शोध घेण्यासाठी सापळा रचला असता, तो गुरुकुलनगर परिसरात फिरताना दिसून आला. त्यास पोलिस पथकांनी कुठल्याही प्रकारचा संशय न येऊ देता शिताफीने ताब्यात घेतले. त्यास ताब्यात घेऊन गुन्ह्याबाबत विचारपूस करता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे पथकांनी विश्वासात घेऊन विचारता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. काही दिवसांपूर्वी धुळे जिल्ह्यातील शिरपूर शहरात एक व पिंपळनेर येथे दोन अशा घरफाड्यादेखील केल्या असल्याचे त्याने सांगितले.

जिम्मी ऊर्फ दीपक बिपीन ऊर्फ अरमित शर्मा (वय ३२, रा. प्लॉट नं. ४ अ, गुरुकुलनगर, नंदुरबार) याच्याकडून गुन्ह्यातील सोन्याचे दागिने, मोबाइल व वाहन, असा सुमारे सहा लाख २७ हजार ५०० रुपयांचे मुद्देमाल जप्त केला असून, धुळे जिल्ह्यातील तीन व नंदुरबार शहरातील एक, असे घरफोडीचे चार गुन्हे उघड करण्यात नंदुरबार पोलिसांना यश मिळाले. जिम्मी ऊर्फ दीपक शर्माविरुद्ध महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत तसेच परराज्यातील गुजरात, हरियाना, राजस्थान आदी ठिकाणी ६० पेक्षा अधिक गुन्हे दाखल असून, सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेण्यात नंदुरबार पोलिसांना यश मिळाले आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलिस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक हेमंतकुमार पाटील, उपनिरीक्षक विकास गुंजाळ, छगन चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेच हवालदार मोहन ढमढेरे, पोलिस नाईक अविनाश चव्हाण, पोलिस शिपाई अभय राजपूत, तसेच शहर पोलिस ठाण्याचे हवालदार दीपक बुनकर, नरेंद्र चौधरी, विनोद महाजन, प्रशांत पाटील, पोलिस शिपाई किरण मोरे आदींच्या पथकांनी केली.



# धुळे महापालिकेवर भाजपचा ध्वज फडकविण्यासाठी सज्ज होऊया

## पालकमंत्री रावल : भाजपची महानगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**धुळे :** भाजपच्या माध्यमातून आपण सारे अनेक वर्षांपासून सोबत काम करत आहोत. आमदार अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वात सरकारच्या माध्यमातून शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा संकल्प साकारत आहोत. पक्षाच्या कार्यकर्त्यांवर नवनवीन जबाबदाऱ्या सोपवून त्यांच्या कार्यक्षमतेला वाव दिला जात आहे. याच संघटनात्मक बळावर आगामी महापालिका निवडणुकीतही एकतर्फी भाजपचा ध्वज फडकविण्यासाठी सज्ज होऊया, असे आवाहन पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

आमदार अनुप अग्रवाल यांच्या मालेगाव रोडवरील जनसंपर्क कार्यालयात भाजपची महानगर जिल्हा कार्यकारिणी महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी जाहीर केली. यातील पदाधिकाऱ्यांना जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री रावल यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. आमदार अनुप अग्रवाल, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे प्रदेश सरचिटणीस डॉ. सुशील महाजन, महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, प्रतिभा चौधरी, जयश्री अहिरराव, वैशाली शिरसाट, बेटी बचाअ-बेटी पढाअच्या प्रदेश संयोजिका अल्पा अग्रवाल, हिराण गवळी, विजय पाच्छापूरकर, लाडकी बहीण योजनेच्या संयोजिका किरण कुलेवार, भगवान गवळी, नरेश चौधरी आदी व्यासपीठावर होते.

**प्रभागातील जनतेपर्यंत पोहोचा : आमदार अग्रवाल**

आमदार अग्रवाल म्हणाले, की पक्षात पदे मोजकी आणि काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या जास्त आहे. आज फादर बॉडी जाहीर झाली आहे. अजून बऱ्याच कार्यकारिणी जाहीर व्हायच्या आहेत. त्यात प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मानाने सामावून घेतले जाईल. पदाची गरिमा ठेवून पक्षाची ध्येयधोरणे व पक्षाचा विचार जनतेपर्यंत पोहोचवा. आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रत्येक प्रभागातून पक्षाकडून १५ ते २० जण इच्छुक आहेत. यात निवडक इच्छुकांनाच उमेदवारी मिळेल. यामुळे प्रत्येकाने आपापल्या प्रभागात निष्ठेने काम करा. जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या अडीअडचणी, समस्या जाणून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. पक्षाकडून होणाऱ्या सर्वेक्षणात जनतेकडून जी नावे पुढे येतील त्यांनाच संधी मिळेल. कुठलीही वशिलेबाजी होणार नाही. येणारा काळ आपलाच आहे. त्यासाठी प्रत्येकाने मेहनत घ्यावी सज्ज व्हावे.

### भाजपची महानगर जिल्हा कार्यकारिणी

सरचिटणीस- ओमप्रकाश खंडेलवाल, शशिशेखर मोगलाईकर, पवनकुमार जाजू, सुनील कपिल. उपाध्यक्ष- यशवंत येवलेकर, जितेंद्र चौवटिया (शहा), डॉ. राहुल भामरे, राजेंद्र खंडेलवाल, प्रा. सागर चौधरी, पृथ्वीराज पाटील, अजय अग्रवाल, दिलीप शितोळे. चिटणीस- संदीप बैसाणे, योगिता बागूल, कमलाकर पाटील, सुनील विसपुते, सुबध पाटील, शेखर कुलकर्णी, जितेंद्र धात्रक, शरद चौधरी. कोशाध्यक्ष- अजय (राम) अग्रवाल. कार्यालय प्रमुख- प्रकाश उबाळे.

# भागपूर उपसा सिंचन योजनेला वेग

## मंत्री महाजनांकडून आढावा; शेतकऱ्यांना मिळणार फायदा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी भागपूर उपसा सिंचन योजनेचे काम वेगाने प्रगतीत असून, या योजनेमुळे जळगाव, जामनेर व पाचोरा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. प्रकल्पाचा आढावा रविवारी (१७ ऑगस्ट) आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी घेतला.

याप्रसंगी अभियंता व्ही. डी. पाटील, अधीक्षक अभियंता गो. श्रा. महाजन, कार्यकारी अभियंता प्र. पा. वराडे, उपअभियंता च. सु. खंबायत, सहाय्यक अभियंता रा. भ. पाटील उपस्थित होते. भागपूर उपसा सिंचन योजना कार्यान्वित झाल्यानंतर जिल्ह्यातील शेतीचे भविष्य उज्ज्वल होईल, असा विश्वास मंत्री गिरीश महाजन यांनी या वेळी व्यक्त केला.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील लाभक्षेत्र १३,९०४ हेक्टर आहे. जळगाव तालुक्यातील २६ गावांना सिंचनाचा थेट फायदा होणार आहे. त्यात चिंचोली, कंडारी, उमाळे, पाथरी, धानवड, शिरसोली प्र. बो., दापोरे, जावखेडे, शिरसोली प्र. नो., देव्हारी, कुऱ्हदडे, वराड खु., वाकडी, वावदडे, रामदेववाडी, लोणवाडी खुर्द, वसंतवाडी, विटनेर, जळके, लोणवाडी बुद्रुक, बिलखेड, बिलवाडी, डोमगाव, सुभाषवाडी, वदली, वराड बुद्रुक या गावांचा समावेश आहे.

प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रस्तावित जलसाठा ९८.३५ दशलक्ष घनमीटर असून, लाभक्षेत्र १६,८६० हेक्टर आहे. जामनेर तालुक्यातील २२ लघु व २ मध्यम प्रकल्प, पाचोरा तालुक्यातील २० लघु व ३ मध्यम प्रकल्प, तर जळगाव तालुक्यातील २ लघु प्रकल्पांची तूट भरून काढली जाणार आहे. याशिवाय कांग प्रकल्पाची उंची वाढ, गोलटेकडी लघुपाटबंधारे प्रकल्प व एकुलती सा. त. प्रकल्पांचाही समावेश आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा**

या योजनेमुळे जळगाव, जामनेर व पाचोरा तालुक्यातील शेतकरी थेट लाभार्थी ठरणार असून, सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे व कृषी उत्पादनात मोठी भर पडणार आहे.



### प्रकल्पाचा खर्च अन् सिंचन क्षेत्र

या योजनेची एकूण अंदाजित किंमत ३५३३.०५ कोटी इतकी असून, या योजनेतून ५ मध्यम व ४४ लघु प्रकल्पांचे स्थिरीकरण करण्यात येत आहे. प्रकल्पाचा एकूण जलसाठा १९२.६५६ दशलक्ष घनमीटर असून, ३० हजार ७६४ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

थेंब थेंब वाचवा भरपूर पिकवा



ठिबक सिंचन संच
पूर्णतः आधुनिक व वाजवी दरात उपलब्ध.
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645
Jaimatadi

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी–८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४–२०२६.
■ फोन : ०२५७ – २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

जळगाव तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com



## महत्त्वाचे

### गणेश अमृतकर यांना छत्रपती संभाजी राजे इंटरनॅशनल पुरस्कार जाहीर



**जळगाव :** येथील जय महाकाली कलावंत सांस्कृतिक बहुउद्देशिय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नथ्थू अमृतकर यांना ''धर्मवीर छत्रपती संभाजी राजे इंटरनॅशनल ऑफ द इयर २०२५'' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंतीनिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्यातर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महनीय व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. त्यात गणेश अमृतकर यांचा समावेश आहे. अमृतकर यांचे अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. साधारण व्यक्तीमत्वाला ८७ पुरस्कार मिळणे सोपे नाही. हा पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी शिर्डी येथे होणार आहे. शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे व प्रसिद्ध अभिनेते विजय पटवर्धन यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

### मेहतर समाजातर्फे गोगादेवजी महाराजांची शोभायात्रा उत्साहात



**जळगाव :** मेहतर समाजाचे आराध्य दैवत गोगादेवजी महाराज, राष्ट्रीय संत श्री नवलस्वामीजी महाराज व वीरपुरुष रतनसिंगजी महाराज जयंतीनिमित्त मेहतर समाजातर्फे रविवारी शोभायात्रा काढण्यात आली. मेहतर वाल्मीकी समाज पंचायत, श्री नवलधाम गोगामेढी वीर रतनसिंग व श्री महाऋषी नवलधाम १७ ऑगस्ट रोजी नवलधाम गोगामेढी रामदेवजीबाबा व वीर रतनसिंग मेढीधाम येथे वीर गोगादेव महाराज, संत नवलस्वामी, रतनसिंग महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन फुले मार्केट समोर करण्यात आले आहे. या काळात मेहतर समाज सव्वा महिने उपवास ठेवतात. तसेच यानिमित्त पालखी व निशाण छडीची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीची सांगता गोगा मेडीधाम व नवलधाम येथे करण्यात आली सफाई कर्मचाऱ्यांना सुट्टी मनपातील कायम सफाई कर्मचाऱ्यांना विर गुरुदेव जयंती (गोगा नवमी) निमित्त मनपातर्फे १८ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना ही सुट्टी देण्यासाठी अखिल भारतीय सफाई मजदूर संघाचे जिल्हाध्यक्ष अजय घेंगट यांच्यातर्फे मनपा प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानुसार प्रशासनाने ही सुट्टी जाहीर केली आहे..

### लाडशाखीय वाणी समाजातर्फे २४ रोजी गुणगौरव समारंभ

**जळगाव :** येथील लाडशाखीय वाणी समाज विकास मंडळातर्फे रविवारी २४ ऑगस्ट रोजी विद्यार्थी गुणगौरव समारंभ आयोजित केला आहे. गणपती नगरातील सुमंगल कम्युनिटी हॉलमध्ये हा सोहळा दुपारी तीन वाजता होईल. आमदार सुरेश भोळे आणि जयेष्णू आयटीआय गुरुकुलच्या संचालिका सरिता वाणी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. लाडशाखीय वाणी समाजाचे अध्यक्ष मेजरनाना वाणी (जे. एन. वाणी) अध्यक्षस्थानी असतील. या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन लाडशाखीय वाणी समाज विकास मंडळ, सुमंगल महिला मंडळ, लाडशाखीय समाज युवा मंच आणि युवा फाऊंडेशन, जळगाव यांनी केले आहे.



# आदिवासींच्या प्रश्नांसाठी सप्टेंबरमध्ये बैठक

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे आश्वासन; प्रतिभा शिंदेंचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

सत्ता असल्यावरच लोकांचे प्रश्न सोडविता येतात. निर्णय आणि धोरण ठरविण्याची क्षमता आपल्या हातात येते. त्यामुळे राज्यातील जनतेचा विकास ह्याच दृष्टीने आम्ही पाऊल टाकले आहे. राज्यातील आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न आहेत. ते सोडविण्या करीत ऑगस्टच्या शेवटी किंवा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात सर्व मंत्र्यांची आदिवासींच्या शिष्टमंडळासोबत बैठक घेण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निर्धार मेळाव्यात दिले.

लोकसंघर्ष मोर्चातर्फे शिवतीर्थ मैदानावर रविवारी (१७ ऑगस्ट) निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या आयोजक लोकसंघर्ष मोर्चाच्या अध्यक्षा प्रतिभा शिंदे ह्या होत्या. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, नरहरी झिरवळ, माणिकराव कोकाटे, माजी मंत्री गुलाबराव देवकर, डॉ. सतीश पाटील, जिल्हाध्यक्ष संजय पवार, उमेश नेमाडे, महिला अध्यक्षा कल्पना पाटील, मिनल पाटील, महानगराध्यक्ष अभिषेक पाटील, योगेश देसले, युवती अध्यक्षा मोनालिका पवार, भाग्यश्री ठाकरे, सुरेश सोनवणे, श्याम सनेर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, राजकारणात काम करतांना सत्तेचे अनेक चढउतार पाहिले आहे. त्यामुळे सत्तेशिवाय कामे होत नाही. समाजातील गोरगरीब, आदिवासी, अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी महायुती राज्यात एकदिलाने काम करीत आहे. प्रतिभा शिंदे ह्या अनेक वर्षांपासून समाजातील शोषित, पिडीत वर्गाच्या प्रश्नांवर आवाज उठवीत आहेत. त्यांना पक्षात येण्याचे मी सांगितले होते. त्यांनी राष्ट्रवादीत येण्याचा जो निर्णय घेतला त्याबद्दल त्यांना निराश होऊ देणार नाही. प्रतिभा शिंदे यांनी केलेल्या मागण्यांबाबत आणि आदिवासी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सप्टेंबरमध्ये संबंधित खात्याचे मंत्री आणि अधिकाऱ्यांची बैठक लावण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

### जिल्हा परिषद, मनपावर राष्ट्रवादीचा झेंडा फडकवा

खान्देश हा केवळ एक भौगोलिक क्षेत्र नसून एक संस्कृती आहे. या खान्देशने राज्याच्या राजकारणात अनेक महान नेते दिले आहेत. खान्देशची माती, परंपरा जपण्याचे काम येथील समाजाने केले आहे. मात्र अनेक वर्षापासून हा खान्देश पाण्याच्या दृष्टीने वंचित राहत आला आहे. तापीचे ९२ टीमएमसी पाणी गुजरातला वाहून जाते. हे वाहून जाणारे पाणी अडविले तर खान्देश सुजलाम, सुफलाम होईल. त्यासाठी आपल्याला निर्णय घ्यावा लागणार असल्याचे मंत्री छगनराव भुजबळ यांनी उपमुख्यमंत्र्यांना सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातगणना जाहीर केल्याने समाजात कोण किती आहे ? हे आता कळणार आहे, त्याबद्दल मोदींचे आभार मानतो असे ते म्हणाले. आम्ही ओबीसीच्या आरक्षणासाठी लढत आहोत. आम्हाला दुसऱ्याचं काही नको, जे आमच्या हक्काचे आहे तेच आम्ही मागत असल्याचे सांगत भुजबळांनी जरांगेंना टोला लगावला. तसेच येत्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहे. जिल्हा परिषद आणि महापालिकेवर राष्ट्रवादीचाच झेंडा फडकविण्यासाठी कामाला लागा असे आवाहनही मंत्री छगनराव भुजबळ यांनी केले. याप्रसंगी मंत्री नरहरी झिरवळ यांनीही मार्गदर्शन केले.

### उत्तर महाराष्ट्रासाठी वैधानिक महामंडळ जाहीर करा - प्रतिभा शिंदे


खान्देशातील नंदुरबार आणि धुळे हे दोन्ही जिल्हे गरीब आहेत. तर विकासात जळगाव जिल्ह्याचा सातवा क्रमांक लागतो. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील अनुशेष भरून काढण्यासाठी वैधानिक महामंडळ जाहीर करण्याची मागणी लोकसंघर्ष मोर्चाच्या नेत्या प्रतिभा शिंदे यांनी केली. तसेच पूर्वी ज्या काँग्रेस पक्षात मी काम करीत होते तिथे प्रदेशवरील नेत्यांनी पाय ओढण्याचे काम केल्याची टीकाही प्रतिभा शिंदे यांनी केली.

### प्रतिभा शिंदेंचा राष्ट्रवादीत प्रवेश

निर्धार मेळाव्यात प्रतिभा शिंदे यांनी असंख्य आदिवासी समाजबांधवांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी राष्ट्रवादीची मफलर त्यांच्या गळ्यात टाकत पक्षात स्वागत केले.

# नशिराबादमध्ये २२ कोटींच्या विकासकामांचा आज प्रारंभ

## पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते लोकार्पण, भूमिपूजन सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**नशिराबाद (जळगाव), १७ ऑगस्ट**

नशिराबादमध्ये विकासाची नवी पहाट उजाडत आहे. पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते सोमवारी (१८ ऑगस्ट) तब्बल २२ कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन होत आहे.

सोहळ्यात नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसह पूर्णत्वास गेलेल्या १४ कोटींच्या विविध कामांचे लोकार्पण होणार आहे. नगरपरिषदेची नवी वास्तू पालकमंत्री पाटील यांच्या प्रोत्साहन आणि निधीमुळे उभारली गेली असून, तिचे उद्‌घाटन थाटामाटात होणार आहे. याचबरोबर नगरपरिषदेच्या हद्दीत सात कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन होणार आहे.

कार्यक्रमाला मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे, प्रशासक शीतल राजपूत-मेहेर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, राजकीय नेते व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. गावाच्या विकासाला प्राधान्य दिल्यामुळे ग्रामस्थांत समाधानाचे वातावरण असून, या कार्यक्रमाची आतुरतेने प्रतीक्षा आहे.

### गावात ५२ कामांचा धडाका

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रयत्नांमुळे नशिराबादमध्ये विकासकामांना गती मिळाली आहे. सोमवारी (१८ ऑगस्ट) वॉर्ड क्रमांक १ ते १० मधील ५२ कामांचे लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे.



**जळगाव : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार हे रविवारी जिल्हा दौऱ्यावर आले होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री पवार यांचा सत्कार करताना माजी मंत्री गुलाबराव देवकर व पदाधिकारी.**




# पवारांच्या निवासस्थानी उपमुख्यमंत्र्यांची भेट

**जळगाव :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे जळगाव दौऱ्यावर आले असता राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा बँकेचे चेअरमन संजय पवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. अजित पवार यांनी जिल्हा बँकेतील कामकाजाची माहिती देखिल संजय पवार यांच्याकडून जाणून घेतली. तसेच जुने छायाचित्र पाहून अजित पवार यांनी जुन्या आठवणींनाही उजाळा दिला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात देखील अजित पवार यांनी जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्याचा पक्षाचा संघटनात्मक आढावा घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार हे निवासस्थानी आले तेव्हा अक्षरशः देव आले अशी भावना संजय पवार यांनी व्यक्त केली. तसेच त्यांच्या कुटुंबालाही आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले.

# तीन दिवसांतील अतिवृष्टीच्या पंचनाम्याचे आदेश

## डीपीडीसीसाठी वाढीव निधी देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

प्रत्येक जिल्ह्यात गेल्यानंतर त्या जिल्ह्यात जिल्हा नियोजन मधून झालेल्या कामाचा आढावा घेतो. आज जळगाव जिल्ह्यातील कामाचा आढावा घेतला, कामं खूप चांगली आणि महत्वाच्या क्षेत्रासाठी झाली आहेत. त्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील, जिल्ह्यातील मंत्री, प्रशासन यांच्या प्रयत्नाचे आपण विशेष कौतुक करतो, असे सांगून येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये जिल्ह्याला निश्चितपणे वाढीव निधी देऊ, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालय आवारातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात रविवारी (१७ ऑगस्ट) झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, खासदार स्मिता वाघ, आमदार अनिल भाईदास पाटील, सुरेश भोळे, किशोर पाटील, चंद्रकांत सोनवणे, अमोल पाटील, अमोल जावळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे उपस्थित होते.

गेल्या तीन दिवसांत मुसळधार पाऊस झाला आहे, त्यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचे तत्काळ पंचनामे करावेत, असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. बैठकीत जिल्ह्यातील विविध विकासकामांची सविस्तर माहिती घेतली. बैठकीत जळगाव जिल्हा सिंचन धोरण, खरीप हंगामाची तयारी, तापी खोरे महाकाय पुनर्भरण योजना, शेततळे योजना, विभागीय क्रीडा संकुल उभारणी, गंगाखेड बेट पर्यटनासह विभागातील पर्यटन विकास, जळगाव जिल्ह्याची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा व रेल्वे एकत्रीकरण, औद्योगिक विकास, बँकिंग पतपेढी आराखडा यांसह जिल्ह्यातील प्रलंबित व सुरू असलेल्या अनेक विकास प्रकल्पांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. जळगाव जिल्हा नियोजन समिती कार्यालय अधिलेख कक्षाच्या उद्घाटनाचा कार्यक्रमही पार पडला. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हा आपला ध्यास असून, प्रत्येक क्षेत्रात प्रगती साध्य करण्यासाठी राज्य सरकार व जिल्हा प्रशासन सातत्याने कार्यरत राहील.

# जळगावात मेडिकल हबची उपमुख्यमंत्र्यांकडून पाहणी

## जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिली कामाची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

जळगाव- संभाजीनगर रोडवरील चिंचोली शिवारात ६६.२७ एकर क्षेत्रावर उभारण्यात येत असलेल्या भव्य मेडिकल हबची पाहणी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत केली. यावेळी खा. स्मिता वाघ, आ. अनिल भाईदास पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.



पाहणीदरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी आर्किटेक्चरल मॉडेलच्या माध्यमातून मेडिकल हबची सविस्तर माहिती दिली. वैद्यकीय महाविद्यालयासाठी ५,६१५ चौ.मी. क्षेत्र असून त्यावर ४१,६२२ चौ.मी. बांधकाम करण्यात आले आहे. रुग्णालयासाठी राखीव असलेल्या ५,८९० चौ.मी. क्षेत्रावर देखील ४१,६२२ चौ.मी. इतके बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच निवासस्थान व वसतीगृहांसाठी १,१४,३४५ चौ.मी. क्षेत्रात बांधकाम करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी मेडिकल हबमधील इमारतींची पाहणी करून प्रत्यक्ष स्थितीची माहिती घेतली. या वेळी दिसून आलेल्या त्रुटी तात्काळ दुरुस्त करण्याचे निर्देश संबंधित अभियंत्यांना देण्यात आले. या मेडिकल हबमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय महाविद्यालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, संशोधन केंद्र यासह आरोग्यसेवेचे सर्व घटक एकाच ठिकाणी उभारले जाणार आहेत. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी हा या प्रकल्पामागचा उद्देश असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, हा प्रकल्प दीर्घकालीन दृष्टीकोनातून आरोग्य क्षेत्रासाठी ''गेम चेंजर'' ठरेल. जळगाव जिल्ह्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असून आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे जिल्ह्याच्या प्रगतीला गती मिळणार आहे. यामुळे जळगावसह उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना पुणे, मुंबईसारख्या महानगरांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही आणि स्थानिक पातळीवरच उच्च दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

# शहिदांच्या स्मारकासाठी साडेचार कोटी

## उपमुख्यमंत्र्यांकडून मान्यता; रिंग रोडचे काम केंद्रीय निधीतून

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

जिल्ह्यात २९ शहिदांच्या स्मारकासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हा नियोजन मंडळातून साडेचार कोटींच्या निधीची मागणी केली आहे. मात्र राज्याच्या नियोजन मंडळातून हा निधी मंजूर करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी (१७ ऑगस्ट) केली. तसेच शहीद स्मारकासाठी साडेचार कोटी रुपये तातडीने उपलब्ध करून देण्यासंबंधी नियोजन विभागाच्या सचिवांना निर्देश देण्यात येतील, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, जळगाव शहरासह धरणगाव विभागातील रिंग रोडसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू. इथल्या खासदार स्मिता वाघ यांनी जळगाव शहरासह धरणगाव ग्रामीण परिसरातून जाणाऱ्या रिंग रोडनिर्मितीचे काम केंद्रीय रस्ते निधीतून करण्यासंबंधी केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना पत्र दिले आहे. त्यासंबंधी माहिती घेऊन आपण स्वत: श्री. गडकरी यांच्याशी चर्चा करू व या दोन्ही रस्त्यांची कामे मार्गी लावू, असे त्यांनी सांगितले.

**शासकीय इमारतींचे नूतनीकरण**

जिल्हा परिषदा, जिल्हाधिकारी कार्यालयांसह इतर सर्व शासकीय कार्यालयांमधील वातावरण चैतन्यदायी असावे म्हणून जुन्या, जीर्ण झालेल्या या कार्यालयांच्या इमारतींचे नूतनीकरणाचे काम सरकारने हाती घेतले आहे. त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देऊ व या इमारती सर्व सोयी-सुविधांनी सज्ज करू. ज्या हेरिटेज इमारती आहेत, त्यांचा तो दर्जा कायम ठेवत त्या पद्धतीने त्यांचे नूतनीकरण केले जाईल, असेही पवारांनी सांगितले.

### विरोधकांचे आरोप निराधार

मतचोरीचा मुद्दा सर्वत्र गाजत असताना, त्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे खासदार आमच्यापेक्षा जास्त संख्येने निवडून आले, तेव्हा आम्ही काही बोंबलत बसलो नाही. नंतरच्या सहा महिन्यांत जनतेच्या हिताचे निर्णय घेतले, नियोजन केले व विधानसभेला २३८ आमदार निवडून आणले. त्या धक्क्यातून विरोधक अद्याप सावरले नाहीत, त्यामुळे ते निवडणूक आयोग व आमच्यावर मतचोरीचा आरोप करीत आहेत. आयोग स्वतंत्र व स्वायत्त यंत्रणा आहे, त्यामुळे त्याबद्दल निराधार आरोप न करता विरोधकांनी अंतर्मुख होऊन विचार करावा, असे आव्हानणठ पवारांनी विरोधकांना दिले.

# उपमुख्यमंत्री पवार यांनी घेतली नंदुरबारच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**नंदुरबार :** जळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नंदुरबार जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, आमदार अनिल भाईदास पाटील, नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे, रतन पाडवी, मोहन शेवाळे, धनंजय गावित, राजेंद्र बाविस्कर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार यांनी जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सभासद नोंदणी वाढवावी, गावागावांत पक्षाची विचारधारा पोहोचवावी आणि युवकांना मोठ्या प्रमाणावर नेतृत्वाची संधी द्यावी, अशा सूचना दिल्या. बैठकीत जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे यांनी जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर प्रकाश टाकला. या वेळी नंदुरबार, धुळे व जळगाव जिल्हा व रावेर येथील अनेक पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. पक्षाचे कुटुंब दिवसेंदिवस वाढत असून, ही खरंच अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे, असे म्हणत उपमुख्यमंत्री पवारांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

# समन्वयाने काम करा, योजनांची गती वाढवा

## पालकमंत्री पाटील : पाळधीत धरणगाव पंचायत समितीची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव/पाळधी/धरणगाव, १७ ऑगस्ट**

जास्तीत जास्त शेत पाणंद रस्त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठवा. ग्रामरोजगार सेवकांनी आत्मीयतेने काम करून गावोगावी शासनाच्या योजना पोहोचवा. अधिकारी- कर्मचाऱ्यांनी योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवणे ही सेवा समजून काम केले पाहिजे. कार्यादेश झालेल्या कामांना गती द्या आणि कामे दर्जेदार व मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. पाळधी येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या उपस्थितीत धरणगाव पंचायत समितीची आढावा बैठक उत्साहात झाली. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना तसेच जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना आणि पंचायत समिती अधिनस्त विभागांचा आढावा घेण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी विविध विभागांच्या कामांचा आढावा घेतला. त्यांनी शासनाच्या योजनांमध्ये अनावश्यक विलंब होऊ देऊ नका, मंजूर प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांचा विश्वास जिंकावा, असे निर्देश अधिकारी- कर्मचाऱ्यांना निर्देश दिले. बैठकीत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, डीआरडीएचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी, गटविकास अधिकारी किशोर वानखेडे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सचिन पानझडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय चव्हाण, गटशिक्षणाधिकारी भावना भोसले, शेतकी संघाचे अध्यक्ष गजानन पाटील, संजय महाजन, डी. ओ. पाटील, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, पी. एम. पाटील, रवींद्र चव्हाण यांच्यासह तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य आणि विविध विभागांचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

विस्तार अधिकारी कैलास पाटील यांनी सूत्रसंचालन केले. गटविकास अधिकारी किशोर वानखेडे यांनी प्रास्ताविकात विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. विस्तार अधिकारी राजेश इंगळे यांनी आभार मानले.




### पाळधी खुर्द ग्रा.पं.ला मिळाला आयएसओ दर्जा

या वेळी पाळधी खुर्द ग्रामपंचायतीला मिळालेल्या आयएसओ दर्जाबद्दल त्यांना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते आयएसओ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## अग्रलेख...

# आता घुसखोरांची गय नाही

गेल्या जून महिन्यात बलाढ्य समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतील रस्त्यांवर जळलेल्या वाहनांचा खच पडला होता. न्यू यॉर्क, लॉस एन्जेलिस, कॅलिफोर्नियामध्ये निर्वासितांनी धुमाकूळ घातला होता. अमेरिकेतील निर्वासितांच्या संदर्भात डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी निर्वासितांनी अमेरिकेला वेठीस धरले होते. बेकायदेशीर निर्वासितांचा हा प्रश्न आता अमेरिकेसह संपूर्ण युरोपला भेडसावत आहे. यातील बहुतांश निर्वासित हे अवैध मार्गाने शिरलेले घुसखोर आहेत. अमेरिका, युरोपप्रमाणे भारतही गेल्या ५० वर्षांपासून घुसखोरीचा सामना करीत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपली लोकसंख्या होती केवळ ३५ कोटींच्या आसपास. आजचा आकडा आहे १४५ कोटी ६० लाख. म्हणजे आपल्याकडे असलेली नैसर्गिक संसाधने तेवढीच. पण खाणारी तोंडे बेसुमार वाढली. स्वातंत्र्यानंतर गेल्या ७८ वर्षांमध्ये लोकसंख्येत सुमारे ११० कोटींनी वाढ झाली. या लोकसंख्येत घुसखोरांचा आकडा मोठा आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ५४ कोटी ८० लाखांच्या आसपास होती. पुढच्या दहा वर्षांत १९८१ ला हा आकडा ६८ कोटी ५१ लाख एवढा झाला. अर्थात दहा वर्षांमध्ये लोकसंख्येत १४ कोटींनी वाढ झाली. १९७१ मध्ये बांगलादेशची निर्मिती झाली. या निर्मिती प्रक्रियेत भारताचा हात असल्याचे गोडवे गायिले जात असले तरी याचा सर्वांत मोठा फटका आपल्यालाच बसला आणि अजूनही बसतो आहे. पाकिस्तानचा लष्करी हुकूमशहा जनरल याह्या खान यांच्या सैन्याने बंगाली नागरिकांवर अनन्वित अत्याचार केल्याने लक्षावधी बंगाली भारताच्या दिशेने पळत सुटले. आपणही मोठ्या उदार मनाने या बांगलादेशींना आश्रय दिला. त्याचा परिणाम असा झाला की आज आसाममधील एकूण ३५ पैकी ११ जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत. १९७१ मध्ये बांगलादेशी घुसखोर या भागात घुसले आणि त्यांनी स्थानिकांच्या जमिनी बळकावत, वनक्षेत्रावर ताबा मिळवित आपले प्रभुत्व निर्माण केले. याच जिल्ह्यांमधून लाखोंच्या संख्येने घुसखोर उर्वरित भारतात घुसत आहेत. पश्चिम बंगालचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही. बांगलादेशला लागून असलेल्या मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर हे जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत तर बिरभू, दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यांमधील मुस्लिमांची संख्या ३० टक्क्यांच्या वर आहे. आणि पाच जिल्हे असे आहेत की तेथे मुस्लिमांचे प्रमाण २५ टक्क्यांच्या वर आहे. ही आकडेवारी दहा वर्षांपूर्वीची आहे. कदाचित आसाम आणि पश्चिम बंगालमधील आणखी काही जिल्ह्यांमध्ये हिंदू अल्पसंख्यक झाले असतील. झारखंड आणि बिहारमध्येही मुस्लिमांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे मुस्लिमांच्या वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणले नाही तर झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल ही राज्ये हिंदूंच्या हातून गेलेच समजा. असे झाले तर बांगलादेशसह या तीन राज्यांचा एक मोठा समूह मुस्लिमबहुल होऊन आणखी एका फाळणीच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्यास नवल वाटायला नको. एका अंदाजानुसार भारतात सध्या तीन कोटींपेक्षा जास्त घुसखोर वास्तव्यास आहेत. घुसखोरीच्या समस्येकडे काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने कमालीचे दुर्लक्ष केले आहे. नव्हे अवैध घुसखोरीला प्रोत्साहन दिले. केवळ मुस्लिम मते मिळवून त्यांच्या बळावर सत्ता संपादन करण्यासाठी काँग्रेससह डावे पक्ष आणि सपा, तृणमूल काँग्रेस, राजद, डीएमके, राष्ट्रवादी काँग्रेस (एकत्रित) आदी प्रादेशिक पक्षांनी मुस्लिमांना कुरवाळण्याचे धोरण स्वीकारून देशासमोर फार मोठे आव्हान उभे केले आहे. देशासमोर येणाऱ्या दोन दशकांनंतर लोकसंख्येच्या प्रमाणात होणाऱ्या बदलामुळे कोणते संकट उभे ठाकेल याची जाणीव झाल्याने लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांचा घुसखोरीचा मुद्दा उपस्थित केला. देशातील लोकसंख्येचे प्रमाण हेतुपुरस्सर बदलले जात असून याचा देशावर विपरीत परिणाम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या आव्हानाला तोंड देण्यासाठी उच्चस्तरीय लोकसंख्याशास्त्रीय मिशनची त्यांनी घोषणा केली. आतापर्यंत कोणत्याही पंतप्रधानाने घुसखोरीच्या मुद्द्याला लाल किल्ल्यावरून संबोधित करताना हात घातला नव्हता. घुसखोरी राष्ट्रासमोरील मोठे आव्हान आहे. देशाच्या सीमावर्ती भागात बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांना वसविल्यानंतर स्थानिकांच्या जमिनी लाटून अथवा शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून बस्तान बसविण्याचे षडयंत्र रचले जात आहे. २००४ ते २०१३ या काळात उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालच्या सीमेवर मशिदी आणि मदरशांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्या राज्यातील सीमेवरील धार्मिकस्थळे हटविण्याची धडक मोहीम सुरू केली असली तरी बिहारातील राजकीय अपरिहार्यतेमुळे घुसखोरीच्या मुद्द्याला हात घातला गेला नाही. पश्चिम बंगालमध्ये तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी घुसखोरांचे समर्थक आहेत. अवैध घुसखोरीसाठी केंद्र सरकार जबाबदार असल्याचे सांगत कारवाई करण्यास नकार देतात. संपूर्ण भारतात घुसलेल्या बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांना बनावट आधार, पासपोर्ट, वाहन परवाना, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र तयार करून देण्याचे काम पश्चिम बंगालमधूनच केले जाते.

वर्षभरापूर्वी झारखंडमध्ये झालेली विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाने घुसखोरीच्या मुद्द्यावरच लढविली होती. संथालसह अन्य आदिवासी भागातील भोळ्याभाबड्या आदिवासींना फसवून त्यांच्या जमिनी बळकावण्याचे कारस्थान जोरात सुरू आहे. एवढेच नव्हे तर आदिवासी मुलींशी विवाह करून त्यांचे धर्मपरिवर्तन करण्याचे कुटिल कारस्थान रचले गेले आणि त्याला गोरगरीब आदिवासी बळी पडत आहेत. दुर्दैवाने भारतीय जनता पक्षाने उपस्थित केलेला घुसखोरीचा आणि आदिवासींच्या फसवणुकीचा मुद्दा मतदारांच्या गळी उतरला नाही. युद्ध करून भारतावर कब्जा करणे शक्य नसल्याचे परकीय आक्रमकांना समजले होते. त्यामुळे त्यांनी हिंदूंना बाटवा, नासवा आणि नष्ट करा या त्रिसूत्रीचा अवलंब करून भारतावर शेकडो वर्षे राज्य केले. विशेष म्हणजे जो भाग मागासलेला आहे त्या भागावरच मुस्लिम आणि ख्रिस्ती धर्मप्रचारक लक्ष केंद्रित करतात. ईशान्य भारतातील मणिपूर वगळता इतर राज्यांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात धर्मपरिवर्तन केले जात आहे. ख्रिस्ती धर्मप्रचारक आदिवासींना तर जिहादी दलितांना लक्ष्य करीत आहेत. काँग्रेसची सत्ता असताना देवभूमी उत्तराखंडमध्ये लोकसंख्येची रचना बदलण्यासाठी लॅण्ड जिहाद पुकारण्यात आले. वनविभागाच्या जमिनीवर कबरी, मजारी उभारत जागा ताब्यात घेण्याचे भयंकर षडयंत्र आखण्यात आले होते. पण, भाजपाचे सरकार आल्यानंतर अवैध मजारी हटविण्यात आल्या. काँग्रेसची सत्ता असल्यास प्रशासनाकडून हमखास सहकार्य मिळेल, याची खात्री असल्याने जिहादींची हिंमत वाढली होती. ज्या राज्यांमध्ये भाजपाची सरकारे आहेत तेथे आता लॅण्ड जिहादला काही प्रमाणात आळा बसलेला आहे. स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करून जिहादींना इशारा दिला आहे. घुसखोरी रोखण्यात पश्चिम बंगाल सरकारचा मोठा अडथळा आहे. राज्य सरकार सहकार्य करीत नसल्याने बांगलादेशी घुसखोर बिनदिक्कत सीमा ओलांडून भारतात प्रवेश करीत आहेत. सनातन धर्माचे अस्तित्व कायम ठेवायचे असेल तर संस्कृतीवर होणारे आक्रमण थांबविणे आणि घुसखोरांची हकालपट्टी करणे हाच एक उपाय आहे. येणाऱ्या काळात मोदी सरकार ऑपरेशन 'पुश बॅक' आणखी तीव्र करण्याची शक्यता आहे. बिहारातील मतदारयादी पुनरीक्षण हा यातील पहिला टप्पा आहे. पुढील टार्गेट हे पश्चिम बंगाल असेल यात शंकाच नाही. त्यामुळेच राजकीय उद्देशाने मुस्लिमांची तळी उचलून धरणाऱ्यांचे धाबे दणाणले असून मतदारयादी पुनरीक्षणाला जोरदार विरोध सुरू केला आहे. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी सुरू केलेली मतदार अधिकार यात्रा म्हणजे त्यांच्या पायाखालची वाळू सरकण्यासारखे आहे. कारण, घुसखोरी कायमस्वरूपी रोखण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये सत्तापरिवर्तन आवश्यक झाले आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# हत्तींचा कळप आणि पक्ष्यांचा थवा!

फिल्ड मार्शल मुनीर हे कुराणचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांना संपूर्ण कुराण कंठस्थ आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडात त्यांचे एक भाषण झाले. या भाषणाचा प्रारंभच त्यांनी कुराणमधील एका गोष्टीने केला.

इब्राहिमने मक्का-काबा शहर बांधले. या शहराची भरभराट होऊ लागली. व्यापार वाढू लागला, प्रगती होऊ लागली. येमेन व इथोपियाचा राजा अब्राहाच्या डोळ्यात ही बाब खुपू लागली. त्याने आपल्या राज्यातील साना गावात एक चर्च बांधले. याने संतप्त होत एका मुस्लिमाने सानात जाऊन या चर्चवर लघवी केली. राजा अब्राहा संतापला. त्याने काबा-मक्काला कायमचे संपविण्याचा निर्णय घेतला व आपले लष्कर काबाच्या दिशेने पाठविले. त्यात मोठमोठे हत्ती होते. काबाचा विनाश होणार होता. पण, अल्लाहने काबाच्या रक्षणाचे वचन दिले होते.

**गोष्ट महमूदची :** काबाला संपविण्यासाठी पाठविलेल्या हत्तींमध्ये मेहमूद नावाचा हत्ती होता. त्याचा माहूत त्याला काबाकडे कूच करण्यास सांगत होता आणि हा हत्ती वारंवार जमिनीवर बसून जात असे. अल्लाहने या हत्तींच्या विरोधात पक्ष्यांचे थवे पाठविले आणि या पक्ष्यांनी मातीचे लहान लहान दगड या हत्तींवर टाकणे सुरू केले.

**हत्तींची काय गत झाली? :** भारताने आम्हाला संपविण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही अशीच गत भारताची करू, असा इशारा देण्यास मुनीर विसरले नाहीत. अरबस्तानात ज्या वर्षात ही घटना घडली त्याला अम अल फिल म्हणजे हत्तीचे वर्ष म्हटले जाते आणि या घटनेनंतर ५० वर्षांनी मुस्लिम प्रेषित मोहम्मद पैगंबराचा जन्म झाला.

**मर्सिडिस आणि गिट्टीचा ट्रक :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारताच्या विरोधात किती आग ओकावी? भारत म्हणजे चकाकनारी मर्सिडिस आणि पाकिस्तान म्हणजे रेती-गिट्टीने भरलेला ट्रक! अशा ट्रकने मर्सिडिसला धडक दिली तर चकाकणाऱ्या मर्सिडिसचे काय होईल? असा प्रश्न विचारीत मुनीर यांनी पुन्हा एकदा भारताला धमकी दिली. विशेष म्हणजे ही धमकी अमेरिकेच्या भूमीवरून देण्यात आली.

**पहलगामपूर्वी :** पहलगाम हत्याकांड होण्यापूर्वी जनरल मुनीर यांनी अशीच भारताविरोधात गरळ ओकली होती. फिल्ड मार्शल मुनीर यांच्या चिथावणीखोर भाषणानंतर भारतासमोर एकच पर्याय आहे तो म्हणजे पाकिस्तानचे चार तुकडे करणे. १९७१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे दोन तुकडे करीत ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांना शरणागतीसाठी बाध्य केले होते. जगाच्या इतिहासातील ही एक सर्वांत मोठी शरणागती मानली जाते. आता भारताला पाकिस्तानचे चार तुकडे करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**सिंदूरनंतर :** देशाचे वायुदलप्रमुख अमरप्रीत सिंग यांनी एका कार्यक्रमात बोलताना, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला अधिक चोप देण्याची आमची इच्छा होती असे म्हटले आहे. आता ती इच्छा पूर्ण करण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानला अन्य कोणतीही भाषा समजत नाही, त्याला एकच भाषा समजते ती म्हणजे युद्धाची. भारताला आता पाकिस्तानच्या विरोधात निर्णायक पावले उचलावी लागतील असे मानले जाते.

**फ्लोरिडातील भाषण :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी अमेरिकेच्या फ्लोरिडामधील हयात हॉटेलमधील एका समारंभात बोलताना जे शब्द उच्चारले आहेत त्याची गंभीर दखल भारताला घ्यावी लागेल. या कार्यक्रमाचा प्रारंभ कुराणच्या एका आयतचे पठन करून करण्यात आला. नंतर पाकिस्तानचे राष्ट्रगीत झाले आणि यानंतर फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारतावर जणू शब्दांचा बॉम्बवर्षाव सुरू केला. या समारंभासाठी पाकिस्तानी वंशाच्या काही प्रतिष्ठितांना निमंत्रित करण्यात आले होते. कुणालाही मोबाईल वा अन्य डीजिटल उपकरणे आत नेण्याची परवानगी नव्हती. एका अमेरिकन सेनापतीच्या निवृत्ती समारोहानिमित्त हा समारंभ आयोजिण्यात आला होता.

**धरण तर बांधा :** फिल्ड मार्शल मुनीर भारताविरोधात युद्ध पुकारल्यासारखे बोलले. २५ कोटी पाकिस्तानींचे पाणी बंद करण्यासाठी भारताने इंदस नदी करार रद्द केला आहे. आता त्यावर धरण बांधले जाणार आहे. भारताने धरण बांधावेच. 'हम दस मिसाईल से फारीग कर देंगे! हमें मिसाईल की कमी है?' असे म्हणत मुनीर म्हणाले, इंदस नदी ही काही भारताची मालमत्ता नाही. भारताने कालव्यांचे बांधकाम सुरू करावे आणि मग पाकिस्तान काय करतो ते पाहावे.

**अर्धे जग घेऊन बुडू :** पाकिस्तान एक आण्विक राष्ट्र आहे. आमचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न झाल्यास केवळ आम्ही बुडणार नाही हे भारताने लक्षात ठेवावे. आम्ही अर्धे जग घेऊन बुडू. तेवढी आमची आण्विक क्षमता आहे, असेही मुनीर यांनी या भाषणात सांगितले.

**श्रेय ट्रम्प यांनाच :** भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धबंदीचे श्रेय केवळ राष्ट्रपती ट्रम्प यांनाच आहे आणि म्हणूनच आम्ही शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी त्यांचे नाव सुचविले आहे असेही ट्रम्प यांनी घोषित केले. फिल्ड मार्शल मुनीर यांनी आपल्या भाषणात अनेकदा भारताची खिल्ली उडविली.

**पूर्व ते पश्चिम :** भारताच्या पूर्व भागात महत्त्वाची प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे युद्धाचा प्रारंभ पूर्वेपासून होत तो पश्चिमेकडे जाईल. मुनीर यांनी अप्रत्यक्षपणे गुजरातच्या जामनगरमधील रिलायन्स रिफायनरीचा उल्लेख केला. जगातील हा सर्वांत मोठा तेल शुद्धीकरण कारखाना असल्याचे मानले जाते. या कारखान्याचा विमाच ३ लाख कोटी रुपयांचा असल्याचे समजते. यावरून या कारखान्यात किती मोठी गुंतवणूक करण्यात आली असावी याचा अंदाज करता येईल.

**अतिरेक्यांची घुसखोरी सुरूच :** दरम्यान, काश्मीर खोऱ्यात सुरू असलेल्या चकमकी पाहता पाकिस्तानी अतिरेक्यांचे आगमन अद्याप सुरू असल्याचे दिसते. कुलगाममधील चकमकीत भारताचे दोन जवान हुतात्मा झाले. ही चकमक प्रदीर्घ काळ चालली. या साऱ्यावरून पाकिस्तानने ऑपरेशन सिंदूरपासून कोणताही धडा घेतलेला दिसत नाही. याचाच अर्थ भारताला पाकिस्तानबाबत अधिक प्रभावी कारवाई करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**पाक सरकारलाच इशारा :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी केवळ भारताविरोधात भूमिका घेतली असे नाही तर त्यांनी आपल्या सरकारलाही इशारा दिला आहे. युद्ध ही एक गंभीर बाब असल्याने ती केवळ लष्करी सेनापतींवर सोडून चालत नाही असे म्हटले जाते. युद्धाप्रमाणेच राजकारण ही एक गंभीर बाब असल्याने ती केवळ राजकीय नेतृत्वावर सोडून चालणार नाही असे म्हणत मुनीर यांनी आपल्याच सरकारला धमकीही दिली.

**नवी परिस्थिती :** फिल्ड मार्शल मुनीर यांच्या या भाषणाने पाकिस्तान व भारत दोन्ही देशांसमोर नवी परिस्थिती निर्माण झाली अहे. आता या फिल्ड मार्शलचे करावयाचे काय असा प्रश्न पाकिस्तान सरकारसमोर उपस्थित झाला आहे. कारण मुनीर यांना चीन-अमेरिका दोन्ही महासत्तांचा पाठिंबा आहे. मुनीर यांचा कार्यकाळ नोव्हेंबर महिन्यात संपत आहे. त्यांना मुदतवाढ न दिल्यास कोणत्याही दिवशी आपले सरकार उलथविण्याचा धोका पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना भेडसावणार आहे.

**नवा बोनस :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी बलुच लिबरेशन आर्मी या पाकिस्तानातील फुटीर गटाला दहशतवादी घोषित करून मुनीर यांना जणू बोनस घोषित केला आहे. पाकिस्तानचे शासन अल्ला, आर्मी व अमेरिका हे तिघे चालवितात असे म्हटले जात असे. ते पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

## वेध

अनिल फेकरीकर

# धरणांनाही मिळावे सेफ सिटीचे कवच!

महाभारतातील कथेत शूरवीर कर्ण याचे रक्षण व्हावे याकरिता सूर्याने त्याला जन्मतःच अंगावर अभेद्य कवच प्रदान केले होते. अशाच स्वरूपाचे कवच सावनेर शहराला सेफ सिटी प्रकल्पामुळे मिळाले आहे. यामुळे भविष्यात सावनेर शहर नागपूर जिल्ह्यातील सर्वांत सुरक्षित शहर म्हणून नावारूपास येईल. पण २ ते ३ लाख हेक्टर जमिनीचे सिंचन करणारे आणि उपराजधानीतील ५० लाख लोकांची तृष्णातृप्ती करणारे कामठी खैरी तसेच तोतलाडोह धरण असुरक्षित का? त्यांनाही आता काळानुसार सेफ सिटी प्रकल्पाचा एक भाग म्हणून कवच द्यायला हवे. तसे पाहता काळासोबत जो चालतो तोच स्पर्धेत टिकतो. अन्यथा त्याला कालबाह्य म्हणून बाजूला सारले जाते. महाराष्ट्र पोलिसांनी या गोष्टीची चाहूल समजून तत्काळ काही बदल करणे सुरू केले आहेत. याच बदलातील एक बदल म्हणजे नागपूर जिल्ह्यातील सावनेर शहरात सुरू झालेला सेफ सिटी प्रकल्प होय. ७९ व्या स्वातंत्र्य दिनापासून हा सेफ सिटी प्रकल्प सावनेर शहरात कार्यान्वित झाला. या सेफ सिटी प्रकल्पामुळे सावनेर शहर सुरक्षित झाले आहे, असे म्हणावे लागेल. कारण यातील तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून लावण्यात आलेले कॅमेरे लहान मुलांचे खेळणे नाही. तर एखाद्या गुन्हेगाराच्या वाहनाने सावनेर शहरात प्रवेश करताच त्याचा क्रमांक टिपून काही क्षणात जन्मकुंडली देणारे तंत्रज्ञानाने युक्त आहेत.



सावनेरमध्ये एकूण २५ ठिकाणी ९३ एआय तंत्रज्ञानयुक्त आधुनिक कॅमेरे बसविले आहेत. यात फेशिअल रिकगयाझेशन सिस्टिम आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकगनायझेशन (एएनपीआर) ही व्यवस्था कार्यान्वित केली आहे. यात सुमारे १ लाखांपेक्षा जास्त गुन्हेगारांचा डाटा टाकण्याची सुविधा आहे. याकरिता १२८ टेराबाईट्स स्टोरेज क्षमताही देण्यात आली आहे. मध्यप्रदेशसह महाराष्ट्रातील गुन्हेगारांची छायाचित्रे या सिस्टिममध्ये टाकण्यात आली आहेत. जेणेकरून कुठलाही गुन्हेगार सावनेर शहरात आला तर त्याला घातपात करता येणार नाही, अशीच व्यवस्था पोलिसांनी करून ठेवली आहे. तसे पाहता पोलिसांचे हात लांब असतात. याचे ज्वलंत उदाहरण द्यायचे झाल्यास देवलापार पोलिस स्टेशन अंतर्गत एक अपघाताची घटना घडली होती. त्या घटनेत पती- पत्नी दुचाकीने जात असतात. वाटेत मोरफाटा भागात त्यांच्या वाहनाला अज्ञात ट्रकने धडक मारून तो आरोपी पळून गेला. या घटनेत महिलेचा जीव जातो. अशावेळी पीडित पती आपल्या पत्नीला उपचार मिळावा म्हणून भर पावसात जाणाऱ्या येणाऱ्यांना मदत मागतो. पण लोकांनी त्याला मदत केलीच नाही. अखेर हतबल पती आपल्या पत्नीचा मृतदेह दुचाकीला बांधतो अन् पुन्हा परतीच्या वाटेवर निघतो. वाटेत त्याने जो पत्नीचा मृतदेह लटकविला त्याचा व्हिडीओ तयार करून त्याला व्हायरल केले जाते. त्याचे दुःख दूर करण्याऐवजी त्यावर मीठ चोळण्याचे काम केले जाते. त्याच प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी मार्वेल तंत्रज्ञानाचा वापर करून त्या धडक मारणाऱ्या आरोपी वाहनाचा शोध घेतला अन् विशेष म्हणजे आरोपीला उत्तर प्रदेशात जाऊन अटकही केली. याचा अर्थ पोलिसांनी मनावर घेतले तर पाताळातून आरोपीला आणू शकतात. हाच संदेश त्यांनी या प्रकरणातून दिला आहे, याकरिता त्यांचे आणि मार्वेल तंत्रज्ञानाचे अभिनंदन. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेल्या सावनेर तालुक्यात सतत तस्करी सुरू राहते. यावर आळा घालणे आवश्यक झाले आहे. त्या कारणाने पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची गरज सातत्याने भासत होती. ती गरज ओळखून त्यांनी सावनेर शहरात सेफ सिटी प्रकल्प कार्यान्वित करण्यावर भर दिला. हा प्रकल्प सुरू व्हावा याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी बरीच मेहनत घेतली. याबद्दल त्यांचे कौतुक करावेच लागेल. आता कळमेश्वर शहरातही सेफ सिटी प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. पण इतर शहरांच्या सुरक्षेचे काय? त्यांचाही विचार प्राधान्याने करावा. त्यापूर्वी धरणांचा विचार झाल्यास राष्ट्रीय संपत्ती सुरक्षित राहील. विशेषतः पारशिवनी तालुक्यातील पेंच प्रकल्प धरण (कामठी खैरी), रामटेक तालुक्यातील तोतलाडोह धरणाच्याही सुरक्षेचा विचार गृहमंत्रालयाने करायला हवा. केवळ शहरांना सुरक्षा देऊन काम होणार नाही. ही दोन्ही धरणे नागपूर शहरासाठी महत्त्वपूर्ण आहेत. यामुळे पुढील काळात या दोन्ही धरणांना सेफ सिटी प्रकल्पाच्या रूपात कवच मिळो, हीच अपेक्षा.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# सांस्कृतिक मार्क्सवादाचा हिंदू सणांवरील हल्ला

हिंदूंचा धर्म आणि त्यांचे तत्त्वज्ञान हे मार्क्सवादासमोर नेहमीच आव्हान राहिलेले आहे. हिंदूंचे सण आणि उत्सव, त्यांच्या परंपरा यांच्यावर प्रश्न उपस्थित करून, टीकाटिप्पणी करून सर्वसामान्य जनतेचा बुद्धिभेद करण्याचे काम सांस्कृतिक मार्क्सवाद करीत असतो.

हिंदूंचे आनंदाचे प्रसंग म्हणजे त्यांचे सण व उत्सव आहेत. या सर्व उत्सवांच्या माध्यमातून लोक एक होतात, आपल्या भावनांचे आदानप्रदान करतात, एकमेकांच्या आनंदामध्ये समरस होतात. यातून अर्थव्यवस्थेला सुद्धा खूप मोठी चालना मिळते. परंतु या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून कधी या सणांना पितृसत्ताक म्हणून हिणवायचे, तर कधी पर्यावरणविरोधी म्हणायचे, तर कधी कालबाह्य ठरवायचे असे यांचे प्रताप सुरू असतात. सध्याच्या धकाधकीच्या युगामध्ये अनेक घरांमध्ये आपले सण, उत्सव व त्यामागे दडलेला अर्थ सांगायला आजी-आजोबा नाहीत. शाळांमधून सुद्धा या मागचा खरा अर्थ मुलांना समजावून सांगण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे यातून निर्माण होणारी पिढी ही सांस्कृतिक मार्क्सवादाचे बळी ठरू शकते. या सांस्कृतिक मार्क्सवादाच्या हल्ल्यामुळे आमच्या नवीन पिढीचा आमच्या परंपरेवरचा विश्वास कमी होऊन ते श्रद्धाहीन होण्याचा धोका सुद्धा निर्माण होऊ शकतो. जे इस्लामी राजवटीला जमले नाही, इंग्रजांना जमले नाही ते या सांस्कृतिक मार्क्सवादामुळे होऊ शकते. म्हणून जनतेने सावध राहून वृत्तपत्र, समाज माध्यमे अशा सर्व ठिकाणी हिंदुस्थान आणि उत्सव यावर आक्षेप घेणाऱ्या लोकांचे आक्षेप खोडून काढणे आवश्यक आहे. कधी कधी हे मार्क्सवादी सिनेमातील नट आणि नटी यांना घेऊन सुद्धा त्यांच्या माध्यमातून हा हल्ला करतात. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला वाटते की एवढे मोठे लोक जर म्हणत आहेत तर कदाचित हे खरे असले पाहिजे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. हे सांस्कृतिक मार्क्सवादाचे हिंदू संस्कृतीवरील आक्रमण आहे हे आपण समाजाला पटवून दिले पाहिजे व आपले सण आणि उत्सव अतिशय धूमधडाक्यात व आनंदाने साजरे केले पाहिजेत.

आषाढ पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमेपासून सणांना सुरुवात होते. उन्हाळ्यात लग्न झालेल्या मुली आखाडीनिमित्त माहेरी येण्याचा प्रघात सुद्धा आहे. त्यानंतर जिवती हा सण येतो. पूर्वी सोनार लोक घरोघरी जाऊन दारावर जिवती लावायचे. पावसाळ्याची सुरुवात झालेली असते. पाणी प्रदूषित असते. यावेळेस घरातील मुलांचे आरोग्य चांगले राहावे या हेतूने या जिवती देवीची पूजा करण्यात येते. त्यानंतर नागपंचमी येते. फार पूर्वीपासून आपल्या पुराणांमध्ये वासुकी, शेषनाग इत्यादी नागांचे वर्णन आलेले आहे. आजही नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे कालसर्प पूजा करण्यात येते. पर्यावरण दृष्टिकोनातून बघितले तर हजारो टन अन्नधान्यांचा नाश करणाऱ्या उंदरांना खाणारे जे सर्प आहेत त्यांचेही स्मरण करण्याचा हा दिवस आहे. त्यानंतर रक्षाबंधन येते. बहीण आणि भावातील अकृत्रिम प्रेमाला दर्शविणारा हा सण आहे. यामध्ये बहीण भावाला राखी बांधते व भाऊ बहिणीच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेतो. इथे मात्र सांस्कृतिक मार्क्सवाद जागा होतो. तो म्हणतो की, हे पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. भावांनी बहिणींच्या रक्षणाची जबाबदारी कशाला घ्यायला पाहिजे? तुम्ही महिलांना कमजोर समजता का? इथे यांचा अभ्यास कमी पडतो. घरोघरी व्यक्तिगत स्तरावर जरी बहीण भावाला राखी बांधत असली तरीसुद्धा राक्षसराज बलीचे साम्राज्य उलथवून टाकण्याकरिता भगवान विष्णूच्या वामन अवतारामध्ये या वामन नावाच्या तरुण विद्यार्थ्याने गुरुकुलामध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे म्हणून रक्षा बांधली होती. १९०५ साली ज्यावेळेस इंग्रजांनी बंगालचे विभाजन केले त्यावेळेस सुद्धा समुद्रकिनाऱ्यावर जमलेल्या हजारो लोकांनी एकमेकांना रक्षासूत्र बांधून बंगालच्या विभाजनाच्या विरोधात लढण्याचा संकल्प केला होता. त्यामुळे रक्षा बांधणे हे एखाद्या कार्याचे किंवा संकल्पाचे स्मरण करून देण्याचे साधन आहे. राहिला प्रश्न भाऊ आणि बहीण यांच्यातील नात्यांचा. आई-वडील कोणालाही जन्मभराकरिता पुरलेले नसतात. त्यामुळे आपण गेल्यानंतर सुद्धा आपल्या मुलांमध्ये प्रेम आणि संबंध कायम राहावे यासाठी केलेली ही योजना आहे. आज नोकरीच्या निमित्ताने अथवा इतर कोणत्याही कारणांनी भाऊ-बहीण जर दूर राहत असतील तरीसुद्धा ते या दिवशी मनाने मात्र जवळ असतात व एकमेकांचे स्मरण करतात. ज्यांना भाऊ नाही किंवा बहीण नाही असे अनेक लोक कोणाला तरी बहीण किंवा भाऊ मानून त्यांच्याशी आपले अशा पद्धतीचे संबंध कायम ठेवतात. आज आपण अनेक ठिकाणी अनेक मंचावर स्त्रीवादी भूमिका मांडताना अनेकांना बघतो. समाजामध्ये स्त्री आणि पुरुष हे असले तरीही ते विविध नात्यांनी बांधले गेलेले असले पाहिजेत जेणेकरून यांच्यामध्ये संघर्ष न राहता परस्पर प्रेम कायम राहील हाही यामागचा उद्देश आहे. सांस्कृतिक मार्क्सवाद्यांना एवढे समजण्यासाठी भरपूर वेळ लागेल किंवा त्यांना समजून सुद्धा घ्यायचे नसेल. कारण त्यांचा उद्देश हिंदू संस्कृतीवर आक्रमण हाच आहे. ते कधी गणेशोत्सवामधील डीजेमुळे व्यथित होतात तर कधी गोविंदाच्या गाण्यांमुळे त्यांना त्रास होतो. होळीमध्ये आणि गोविंदामध्ये पाण्याचा अपव्यय केला जातो असे त्याचे म्हणणे असते. दिवाळीतल्या फटाक्यांमुळे वायुप्रदूषण होते हे सांगण्यासाठी विविध सिनेमातील कलाकारांना समोर आणून ते नागरिकांना फटाके न फोडण्याचे आवाहन करतात. परंतु हेच लोक कधीही ३१ डिसेंबरला फटाके फोडू नका असे आवाहन करीत नाही. जलीकट्टू किंवा बैलगाडा शर्यतीमध्ये प्राणी-हक्काचे उल्लंघन होते असे यांना वाटते परंतु बकरी ईदला लाखो बकरे कापले जातात त्यावेळेस यांच्यापैकी एकही समोर येऊन या प्राणी हिंसेबद्दल बोलत नाही. देवीला बोकड अर्पण करणे ही अंधश्रद्धा आहे याबद्दल अनेक साधुसंतांचा दाखला हे लोक देत असतात. परंतु इतर वेळेला बोकडाचे मटण खाल्लेले त्यांना चालते. 'दिवाळीच्या फटाक्यांमुळे गुदमरली मुंबई' अशा प्रकारचे मथळे छापणारे वृत्तपत्र ३१ डिसेंबरला मुंबई गुदमरली की नाही हे सांगत नाही.



सर्वच उत्सवांमध्ये समाजातील छोट्या छोट्या घटकांना काम मिळते. पोळ्याला मातीचे बैल बनविणारे कुंभार मग दिवाळीसाठी पणत्या बनवायला लागतात. फटाका उद्योगांमध्ये काम करणारे कामगार त्यांना तर वर्षातून एक वेळा फार मोठा रोजगार मिळतो. त्यामुळे ते वर्षभर त्यासाठी तयारी करतात. मूर्तिकारांना जन्माष्टमीला कान्होबा, गणेश जयंतीला गणपती, दुर्गा उत्सवामध्ये दुर्गा देवी, अशा विविध मूर्ती बनविण्याची संधी मिळते. भाजीपाला, किराणा, दूध, दही, मिठाई, खानपान सेवा, समारंभ व्यवस्थापन, नवीन दुचाकी, चारचाकी वाहनांची विक्री अशा अनेक गोष्टींना चालना मिळते. हिंदू सणांमुळे देशांमध्ये एक लाख कोटी रुपयांपेक्षा मोठी उलाढाल होते. अर्थव्यवस्थेला गती मिळते. सर्वसामान्य गोरगरीब जनतेपर्यंत पैसा पोहोचतो. त्यामुळे हिंदूंचे सण हे निसर्गाशी व आर्थिक चक्राशी संबंधित आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. हे सर्व समजून घ्यायला पुरोगामी, बुद्धिजीवी आणि मार्क्सवादी यांना वेळ नसला तरीही जनतेने मात्र अतिशय आनंदाने आणि उत्साहाने आपले सण साजरे केले पाहिजेत.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## सर्वसमावेशक गणेशोत्सव साजरा करण्याकडे कल

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेने परिपूर्ण आहे. माहितीचा स्फोट, कृत्रिम बुद्धिमत्ता, वेगवान जीवनशैली या सगळ्यामुळे माणसाचे जगणे पूर्वीपेक्षा खूप बदलले आहे. पण या साऱ्या बदलांमध्ये गणेशोत्सव आजही आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. गणेश हा विघ्नहर्ता, बुद्धीचा देव आणि आरंभीचा देवता मानला जातो. समाजाला एकत्र आणण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. त्यामुळे धार्मिकतेसोबतच सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्य वाढले. आज गणेशोत्सव फक्त धार्मिक न राहता सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय भान देणारा उत्सव झाला आहे. गणेशमूर्ती बनवताना शाडूची मूर्ती, नैसर्गिक रंग यांचा वापर करण्याचा संदेश समाजात पसरू लागला आहे. गणेशोत्सवात समाजातील विविध स्तरांतील लोक एकत्र येतात. कला, नृत्य, नाटक, कीर्तन, व्याख्यान यांचा कार्यक्रम घेऊन समाजात संस्कृतीची जपणूक केली जाते. फटाके, प्लॅस्टिक, रासायनिक रंग यांच्या प्रदूषणामुळे निसर्गाला धोका निर्माण होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही गरज बनली आहे. शिस्तबद्ध मिरवणुका, मर्यादित ध्वनी आणि पर्यावरणपूरक मूर्ती याकडे लोकांचा कल वाढत आहे. एकंदरीत, आजच्या युगात गणेशोत्सव हा परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम आहे. तो आपल्याला श्रद्धा, समाजहित, संस्कृती आणि पर्यावरण यांचा समतोल साधायला शिकवतो.

**श्रीकांत संभाजी मगर**

●● ●●

## कलियुगातील तमोगुणाचा प्रभाव

स्वयंशिस्त दुरापास्त होण्याचे मुख्य कारण म्हणजे तमोगुणाचा प्रभाव आणि तो का पडतो तर अरबट -सरबट आहारामुळे; तरीही जातीय राजकारण करून आमच्या खाण्यावर सुद्धा बंधने आणणार का? असा प्रश्न विचारून प्रसिद्धीच्या माध्यमात येण्याचा आटापिटा कोणी सोडायला तयार नाही. कोणी म्हणतो आम्ही नवरात्रीत मासे खातो, तर कोणी संकष्टीला मटण, कोणी जिवंत कोंबड्या हातात घेऊन मोर्चे काढतो; म्हणजेच स्वतःच्या जिभेवर ताबा नाही मग अशी मंडळी जनतेवर ताबा मिळवून काय साध्य करणार? दुकाने जर सरकारने बंद केली तर अशा मंडळींनी प्रथम दिवशी आपल्याला काय हवे ते घरी आणावे आणि त्याच्या भक्षणाचा सुखद अनुभव घ्यावा. कोरोना काळात काय करीत होतो, ते दिवस आठवावे. उगीच जातीय तेढ आणून काही साध्य होईल असे वाटत नाही. अशा मंडळींनी चांगुलपणाचे चिंतन करून तो आत्मसात करावा. सध्या त्याचीच कमतरता आहे. कर्तव्य, स्वधर्म व स्वयंशिस्त याची पायमल्ली करून निगरगट्ट राजनीतीची निर्मिती सातत्याने होते आहे आणि सहानभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्नही होतो आहे. धर्मावर ताशेरे ओढण्याआधी स्वधर्म आचरण करावा अन्यथा तोच स्वयंआचाराच्या चिंतनाचा विचार ठरतो आणि मग स्वातंत्र्यप्राप्ती शापित ठरते. किंकर्तव्यमूढ व गलितगात्र अर्जुनाला भगवान श्रीकृष्णांना भगवद्गीता सांगावीच लागली, तेच कार्य मोदींना सर्व व्याप सांभाळून करावे लागते आहे. कारण दुसऱ्याच्या घरात विषारी बॉम्ब टाकून भांडणे लावणाऱ्यांची संख्या वाढते. म्हणूनच हा सर्व कलियुगातील तमोगुणाचे प्रभाव म्हणावेसे वाटते.

## वाचक पत्रे

**अमोल करकरे**

●● ●●

## पोळा : बैलांप्रति कृतज्ञतेचा दिवस

महाराष्ट्रात पोळा श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो. बैलांचा उत्सव म्हणजे पोळा! बैल हा शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सोबती! कारण नांगरणीपासून ते पेरणी, दळणवळण यासाठी बैल शेतकऱ्याला मदत करतो. त्याच्या श्रमामुळेच शेतकऱ्याला पीक घेता येते. म्हणूनच बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची पूजा करून हा सण साजरा केला जातो. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना अंघोळ घालून, त्यांना तेल चोळून, सुंदर सजवून मिरवणुकीसाठी नेतात. बैलांच्या शिंगांना रंगवून, गळ्यात गजरे व गोंडे घालून, गोड पदार्थ खाऊ घालून त्यांचा सन्मान केला जातो. बैलांनी केलेल्या कष्टाचे स्मरण करून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी गावोगावी बैलांच्या मिरवणुका काढल्या जातात. शेतकरी बांधव एकत्र येऊन आनंदाने हा उत्सव साजरा करतात. एकंदरीतच पोळा हा शेतकऱ्याच्या कष्टकरी बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, निसर्गाची पूजा करण्याचा आणि समाजात एकोपा वाढविण्याचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून 'प्राण्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित होते.



**प्रिया बागडदेव**

# रशियाचे युक्रेनवर हवाई हल्ले

**चर्चेच्या काही तासांतच ८५ ड्रोन | बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी मारा | दोन गावे ताब्यात घेतल्याचा दावा | ५० पेक्षा अधिक नागरिक जखमी**

◆ **कीव, १७ ऑगस्ट**

अमेरिकेच्या अलास्का येथे पुतिन आणि ट्रम्प भेटीनंतर काही तासातच रशियाने युक्रेनवर शनिवारी जोरदार हवाई हल्ले केले. यात अनेक इमारती आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. ८५ शाहेद प्रकारचे ड्रोन आणि इस्कंदर-एम बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने जवळपास सहा तास हल्ले करण्यात आले. रशियाच्या हल्ल्याने ट्रकम्प यांच्या मध्यस्थीने युक्रेनसोबत सुरू असलेल्या शस्त्रबंदी कराराच्या वाटाघाटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

युक्रेनच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, रशियाच्या हवाई दलाने शनिवारी राजधानी कीव शहरालगतच्या भागावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी मारा केला. रशियाने डागलेल्या ८५ पैकी ६१ ड्रोन हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच उधळले. हवाई हल्ल्यात अनेक निवासी इमारती आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले असून यात ५० नागरिक जखमी आहे. त्याचवेळी रशियाच्या लष्कराने युक्रेनच्या दोन गावांवर ताबा मिळविल्याचा दावा केला आहे. दरम्यान युक्रेनसोबत शांतता करार करण्यासाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अलास्का येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर काही तासांतच हल्ला झाल्याने पुढील चर्चेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा हल्ला ट्रम्प यांना आव्हान असल्याचे मानले जात आहे.

### पूर्व-दक्षिणमधील अनेक भागांवर नियंत्रण

फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धाला आता तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात १२ हजार लोकांचा मृत्यू झाला असून, लाखो नागरिकांना स्थलांतर करावे लागले आहे. रशियाने पूर्व आणि दक्षिण युक्रेनमधील मोठ्या भूभागांवर नियंत्रण मिळविले आहे.



### डोनेस्तकवर पुतिन यांना हवा ताबा

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी अलास्कामध्ये ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान युद्ध संपवण्यासाठी युक्रेनने डोनेस्तकमधून आपले सैन्य मागे घ्यावे अशी अट ठेवली आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आणि युरोपीय नेत्यांना फोन करून पुतिन यांच्या मागणीची माहिती दिली. पुतिन यांना या प्रदेशावर पूर्ण नियंत्रण हवे आहे. सध्या परिस्थितीत रशियाचे डोनेस्तकच्या ७० टक्के भागावर नियंत्रण आहे. हा भाग कोळसा खाणी आणि जड उद्योगांसाठी ओळखला जातो.



### तिन्ही नेत्यांची शुक्रवारी संयुक्त बैठक

ट्रम्प यांनी शनिवारी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, २२ ऑगस्टला पुतिन आणि झेलेन्स्की यांच्यासोबत ते त्रिपक्षीय बैठक घेणार आहे. यावेळी दोन्ही नेते युद्धबंदीवर चर्चा करणार आहे. तत्पूर्वी सोमवारी १८ ऑगस्टला झेलेन्स्की यांच्यासोबत भेट घेणार असून पुतिन यांच्यासोबत झालेल्या चर्चेची त्यांना माहिती देणार आहे. दरम्यान जर्मन चांसलर फ्रेडरिक मर्झ यांनी शनिवारी सांगितले की, सोमवारी झेलेन्स्की आणि ट्रम्प यांच्यातील बैठकीनंतर त्रिपक्षीय बैठक होण्याची अपेक्षा आहे.

# भारतावर टॅरिफ लादणे मूर्खपणाचे

## अमेरिकन अर्थतज्ज्ञांनी ट्रम्प यांना सुनावले

◆ **वॉशिंग्टन, १७ ऑगस्ट**

भारतावर आयात शुल्क लादण्याचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय मूर्खपणाचा आहे. यातून अमेरिकेला कोणताही फायदा होणार नाही, अशा शब्दात प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जेफ्री सॅक्स यांनी म्हटले आहे.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सॅक्स म्हणाले, की अमेरिका इतक्या काळापासून आपल्या वर्चस्ववादी शक्तीचा वापर करत आहे की त्यांना वाटते की ते जगाच्या प्रत्येक भागावर राज्य करू शकतात. पण हा त्यांचा भ्रम आहे. ट्रम्प गोंधळलेले आहे आणि परिस्थिती सावरण्यात अपयशी ठरत आहे. भारतावर टॅरिफ लादणे कोणत्याही मानकांनुसार मूर्खपणाचे होते. ट्रम्प ब्रिक्स गटाचा द्वेष करतात कारण हे देश अमेरिकेसमोर उभे राहतात.



टॅरिफ अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी विनाशकारी आहे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करते. ट्रम्प यांचा निर्णय राजकीय व्यवस्थेचे पतन आहे. अमेरिकेत, ट्रम्पची धोरणे अपयशी ठरतील. भारताने अमेरिकेवर विश्वास ठेवू नये, जागतिक मूल्य साखळीत भारत चीनची जागा घेऊ शकते, असा विश्वास ठेवू नये. आजच्या घडीला चीन, रशिया आणि ब्राझील हे भारताचे भागीदार आहे.

### अमेरिकन शिष्टमंडळाचा भारत दौरा रद्द

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराच्या चर्चेला आता खीळ बसली आहे. चर्चेच्या पाच फेऱ्या झाल्यानंतर सहाव्या फेरीसाठी चर्चा करण्यासाठी भारतात येणाऱ्या अमेरिकन शिष्टमंडळाचा दौरा रद्द करण्यात आला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय उत्पादनांवर ५० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. जागतिक स्तरावर कोणत्याही देशांपेक्षा हा सर्वाधिक टॅरिफ आहे. यानंतर दोन्ही देशांकडून व्यापाराच्या वाटाघाटी थांबविण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

### कृषी क्षेत्रातील अटीने करार रखडला

कृषी क्षेत्रात अमेरिकेला प्रवेश देण्यास भारताने नकार दिला आहे. शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी भारत दीर्घकाळापासून या भूमिकेवर ठाम आहे. मात्र ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिका त्यांच्या कृषी उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न करत आहे. अशातच रशिया-युक्रेन युद्धबंदीवर ठोस तोडगा निघू शकला नाही, त्यामुळे भारतावर लादलेले टॅरिफ कमी होण्याची अनिश्चितता कायम आहे.

## इंडिगो विमानाचा मागचा भाग धावपट्टीवर आदळला

◆ **मुंबई, १७ ऑगस्ट**

बँकॉकहून मुंबईला येणारे इंडिगो एअरबस ए ३२१ या विमानाचा मागचा भाग उड्डाणादरम्यान धावपट्टीवर आदळला. ही घटना शनिवारी पहाटे ३.०६ वाजता धावपट्टी २७ वर घडली. खराब हवामान आणि मुसळधार पावसात विमानाचा खालचा भाग धावपट्टीवर आदळला. या घटनेत विमानातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, 'आम्ही या प्रकरणाची औपचारिक चौकशी करू आणि लवकरच आदेश जारी केला जाईल. घटनेनंतर विमानाला ग्राउंड करण्यात आले आहे आणि संपूर्ण चौकशी आणि दुरुस्तीनंतरच पुन्हा उड्डाण करण्याची परवानगी दिली जाणार आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की ही घटना खराब हवामानामुळे घडली. याबाबत इंडिगोने एक निवेदन जारी केले. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा ही प्राथमिकता आहे आणि कंपनी सर्व आवश्यक तपासणी आणि दुरुस्ती केल्यानंतरच विमान पुन्हा सेवेत आणेल, असे यामध्ये म्हटले आहे.

# काँगोमध्ये दहशतवादी हल्ला, ३० जणांचा मृत्यू

## उत्तर किवू प्रदेशातून १०० नागरिकांचे अपहरण

◆ **किन्शासा, १७ ऑगस्ट**

काँगोच्या उत्तर किवू प्रांतातील बापेरे गावावर दहशतवाद्यांनी धारदार शस्त्राने हल्ला केला, ज्यामध्ये ३० जणांचा मृत्यू झाला आणि सुमारे १०० जणांचे अपहरण करण्यात आले. या हल्ल्यामागे एडीएफ संघटना असल्याचा संशय आहे. सैन्य आणि स्थानिक प्रशासनाने या घटनेची पुष्टी केली आहे.

लुबेरो प्रदेशाचे लष्करी प्रशासक कर्नल अलेन किव्वा यांनी सांगितले, की दहशतवाद्यांनी धारदार शस्त्रांनी लोकांवर हल्ला केला आणि अनेक घरेही जाळण्यात आली. नागरी समाज संघटनेचे नेते सॅम्युअल कहेनी म्हणाले की, बहुतांश लोकांची हत्या धारदार शस्त्रांनी करण्यात आली. इस्लामिक स्टेटशी संबंधित अलाइड डेमोक्रॅटिक फोर्स अर्थात् एडीएफ या हल्ल्यासाठी जबाबदार असल्याचा संशय आहे.

# प्रियकराचा पार्सल बॉम्ब टाकण्याचा कट उधळला

## स्फोटक तस्करी रॅकेटचा पर्दाफाश

◆ **खैरागड, १७ ऑगस्ट**

छत्तीसगडमधील एका २० वर्षीय इलेक्ट्रिशियनने म्युझिक सिस्टम स्पीकरमध्ये एक इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइस (आयईडी) बसवले आणि ते एका महिलेच्या पतीला भेट म्हणून पाठवले, असे पोलिसांनी रविवारी सांगितले.

आरोपीने ऑनलाइन ट्युटोरियल वापरून आयईडी तयार केले, प्लग इन केल्यानंतर स्फोट होण्यासाठी ते डिझाइन केले. त्याच्या गुगल सर्च इतिहासात पोलिसांनी पकडल्याशिवाय बॉम्ब वापरून एखाद्या व्यक्तीला कसे मारायचे हे दाखवले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आरोपीला अटक करून, खैरागड-चुईखादन-गंडाई जिल्ह्यातील पोलिसांनी केवळ नियोजित हत्येचा कट उधळला नाही, तर आरोपींना जिलेटिनच्या काड्या पुरवणाऱ्या स्फोटक तस्करी रॅकेटचाही पर्दाफाश केल्याचे पोलिसांनी सांगितले. ताज्या प्रकरणात, मुख्य आरोपी विनय वर्मा आणि इतर सहा जणांना अटक करण्यात आली आहे, असे खैरागड-चुईखदान-गंडाई जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक (एसपी) लक्ष्य शर्मा यांनी सांगितले. इतरांची ओळख परमेश्वर वर्मा (२५), गोपाल वर्मा (२२), घासीराम वर्मा (४६), दिलीप धीमर (३८), गोपाल खेळवार आणि खिलेश वर्मा (१९) अशी झाली आहे. एप्रिल २०२३ मध्ये अशाच एका प्रकरणात, एका नवविवाहित पुरूषाचा आणि त्याच्या मोठ्या भावाचा भेटवस्तू म्हणून मिळालेल्या होम थिएटर म्युझिक सिस्टमचा स्फोट होऊन मृत्यू झाला.

# इस्रायली नौदलाचा येमेनवर भीषण हल्ला

## हुथीचे अड्डे उद्ध्वस्त, वीज प्रकल्पाचे केंद्र जमीनदोस्त

◆ **सना, १७ ऑगस्ट**

इस्रायली नौदलाने रविवारी पहाटे येमेनमधील हुथीच्या नियंत्रणात असलेल्या भागात जोरदार हल्ले केले. यात हुथींचे अनेक अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले, तर वीज प्रकल्पाचे केंद्र पूर्णतः जमीनदोस्त झाले. या हल्ल्यात हुथींचे शंभरपेक्षा अधिक सदस्य ठार झाल्याचा दावा इस्रायलने केला, मात्र हुथींकडून मृत्यूची पुष्टी करण्यात आलेली नाही.



इस्रायलच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राजधानी सनाच्या दक्षिणेकडील भागाला लक्ष्य करीत इस्रायली नौदलाने हुथींच्या अड्ड्यांवर क्षेपणास्त्राने हल्ले केले. यात या भागातील वीजपुरवठा करणारे हाजिफ पॉवर स्टेशन जमीनदोस्त झाले. याशिवाय या भागातील अनेक इमारतींना आग लागली. हल्ल्यात वीज प्रकल्पातील कामगारांसह हुथीचे शंभरपेक्षा अधिक सदस्य ठार झाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान इस्रायली नौदलाने येमेनवर हल्ला करण्याची ही दुसरी वेळ आहे. जूनच्या सुरुवातीला हुथींच्या नियंत्रणाखालील होदेइदा बंदराला लक्ष्य करण्यात आले होते. गेल्या अनेक महिन्यांपासून हुथी इस्रायलवर हल्ला करत आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायल देखील हुथींवर हल्ले करीत आहे.



# भाजपने शिवसेनेला तर राष्ट्रवादीने काँग्रेसला धक्का देण्याचे २०१४ मध्येच ठरले होते

## राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांचा गौप्यस्फोट

**गोंदिया :** भारतीय जनता पक्षाने शिवसेनेचा, तर राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसपासून वेगळे होण्याचा निर्णय २०१४ मध्येच घेण्यात आला होता आणि या निर्णयाला खुद्द शरद पवार यांचाही होकार होता. परंतु, कुठेतरी गाडी भरकटत होती, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी केला आहे.

महायुतीतर्फे स्थानिक नमाद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील नवनिर्वाचित संचालक व पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. स्थिर सरकारसाठी भाजपला पाठिंबा देण्याचे सूतोवाच २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार यांनी केले होते.त्या प्रसंगाची आठवण पटेल यांच्या वक्तव्यानंतर झाली. सहकारातील निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले. परंतु, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना हलक्यात घेऊ नये. जिल्हा परिषदेत आपण सोबत लढलो नसलो तरी आज सोबत आहोत. आपल्यात कितीही मतभेद असले, तरी म नभेद होऊ देऊ नये, असा सल्ला राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल यांनी दिला.

खासदार पटेल यांनी सांगितले की, आज त्यांचे वडील शिक्षणमहर्षी स्व. मनाहरभाई पटेल यांची पुण्यतिथी आहे. त्यांनी कधीही राजकारणात विरोधकांचा द्वेष बाळगला नाही. तेच संस्कार आपल्याला मिळाले आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्यासोबत मुंबई प्रवासाचा किस्सा, श्रद्धेय लक्ष्मणराव मानकर गुरुजी यांच्यासोबतच्या आठवणी व (स्व.) जी. एन. बाजपेयी यांचे प्रसंग विशद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगती करीत असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी आमदार फुके, बडोले, अग्रवाल, रहांगडाले, पुराम, कारेमोरे यांच्यासह सुनील फुंडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

### पंतप्रधान अन् सहकार मंत्र्यांचा विसर...

महायुतीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असले तरी नियोजन मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचेच दिसून आले. सहकार क्षेत्रातील संचालकांचा सत्कार कार्यक्रम असताना मंचावरील होर्डिंगवर पंतप्रधान मोदींसह थेट केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांचेच फोटो नव्हते. त्यामुळे कार्यक्रमस्थळी चांगलीच चर्चा रंगली होती.



राहुल गांधी यांच्या मतदार अधिकार यात्रेला रविवारी बिहारमधील सासाराम येथून प्रारंभ झाला. यावेळी सभेदरम्यान राहुल गांधी यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांना पाणी दिले. यावेळी मंचावर उपस्थित लालू प्रसाद यादव

# बिहारमध्ये मत चोरीचा डाव उधळून लावणार

## मतदार अधिकार यात्रेतून राहुल गांधींचा इशारा

◆ **पाटणा, १७ ऑगस्ट**

लोकसभा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत झालेल्या मत चोरीचे कारस्थान आम्ही उघड केले. निवडणूक आयोग भाजपासोबत संगमत करून निवडणूक चोरण्याचे षडयंत्र आखत आहे. बिहार निवडणुकीत मत चोरीचा डाव उधळून लावू ,असा इशारा काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी रविवारी दिला.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर काँग्रेसने रविवारी मतदार अधिकार यात्रा सुरू केली. या अंतर्गत २० जिल्ह्यातून १३०० किमीचा प्रवास करून नागरिकांना निवडणुकीत होणाऱ्या फसवणुकीसंदर्भात माहिती दिली जाणार आहे. सासाराम येथून सुरू झालेल्या यात्रेच्या शुभारंभप्रसंगी जनसभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, बिहारमध्ये पुनरीक्षण प्रक्रियेतून आयोगाकडून निवडणूक चोरण्याचे षडयंत्र रचले जात आहे, मात्र लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत घडलेल्या प्रकाराची पुनरावृत्ती बिहारमध्ये होवू देणार नाही. बिहारमध्येही ते मतदारांना विभागून मतांची चोरी करण्याची तयारी करत आहेत. मात्र, आम्ही त्यांना हे करू देणार नाही.

## चीनचे परराष्ट्र मंत्री उद्या भारत दौऱ्यावर

◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या निमंत्रणावरून चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिटब्युरो सदस्य आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी सोमवारी १८ ऑगस्ट रोजी दोन दिवसाच्या भारत दौऱ्यावर येणार असल्याची माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनातून दिली आहे. यावेळी वांग यी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची द्विपक्षीय बैठक होणार आहे. त्यांचा दौरा हा भारत-चीन सीमेच्या प्रश्नावर दोन्ही देशांच्या विशेष प्रतिनिधींमधील २४ व्या फेरीच्या बैठकीचा भाग असेल.

# निसार पृथ्वीचे निरीक्षण करण्यासाठी सज्ज

## १२ मीटरचा रडार अँटेना उघडला, नैसर्गिक आपत्तींची माहिती मिळणार

◆ **श्रीहरिकोटा, १७ ऑगस्ट**

नासा आणि इस्रोच्या संयुक्त मोहिमेतून प्रक्षेपित करण्यात आलेला निसार उपग्रह सक्रिय झाला आहे. पृथ्वीपासून ७४३ किमी उंचीवर असलेल्या या उपग्रहाचा १२ मीटरचा रडार अँटेना अवकाशात यशस्वीरित्या उघडला आहे.जो पृथ्वीवरील बदलांचे मोजमाप आणि निरीक्षण करणार आहे.

३० जुलै रोजी श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केलेला हा उपग्रह



हिमनद्या, भूकंप आणि जंगलांवर लक्ष ठेवेल. या मोहिमेतून या वर्षाच्या अखेरीस डेटा मिळेल, जो आपत्ती आणि अन्न सुरक्षेत मदत करेल. पृथ्वीच्या बदलत्या पृष्ठभागाचा अचूक अभ्यास करण्यासाठी निसार उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले. उपग्रह ९७ मिनिटांत पृथ्वीभोवती प्रदक्षिणा पूर्ण करीत असून आगामी १२ दिवसात ११७३ प्रदक्षिणा पूर्ण करून तो पृथ्वीच्या प्रत्येक भागाचा नकाशा तयार करणार आहे. ढग, घनदाट जंगले, धूर आणि अंधारातही तो कार्यक्षम असेल. निसारकडून मिळालेल्या डेटाच्या आधारे शास्त्रज्ञ हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती, पर्यावरणाचा अधिक चांगल्याप्रकारे अभ्यास करू शकणार आहे.

### अँटेनाचे वजन ६४ किलो

नासाच्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरीचे प्रोजेक्ट मॅनेजर फिल बरेला म्हणाले की, हा नासाचा आतापर्यंतचा सर्वात मोठा अँटेना रिफ्लेक्टर आहे. तो अंतराळात यशस्वीरित्या उघडणे हे वर्षानुवर्षे केलेल्या डिझाइन, चाचणी आणि सहकार्याचे परिणाम आहे. या अँटेनाचे वजन ६४ किलोग्रॅम आहे. ते १२३ कंपोझिट स्ट्रट्स आणि सोन्याचा मुलामा असलेल्या जाळीने बनलेले आहे.

# निवृत्तिवेतनधारकांसाठी १९ ऑगस्टला मेळावा

**नंदुरबार :** जिल्ह्यातील राज्य सरकारी निवृत्तिवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तिवेतनधारकांसाठी जिल्हा कोषागार कार्यालयात १९ ऑगस्टला सकाळी अकराला मेळावा होणार आहे. मेळाव्यात निवृत्तिवेतनधारकांच्या अडचणी दूर करण्यात येणार असून, ज्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांचे वय ८० वर्षांपेक्षा जास्त आहे, त्यांना त्यांच्या वयाचा पुरावा अर्थात जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला किंवा जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिलेला वयाचा दाखला व मोठ्या अपत्याच्या जन्मतारखेचा पुरावा जिल्हा कोषागार कार्यालयाच्या पेन्शन विभागात जमा करावा. निवृत्तिवेतनधारकांनी मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी, स. म. खडसे यांनी केले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### बीएड महाविद्यालयात 'एक पेड माँ के नाम' उपक्रम

**नवापूर :** येथील आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्थेचे श्री सुरूपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जोशाबा सरकार युवा मंडळ (नवापूर) आणि माय भारत कार्यालय (नंदुरबार) यांच्यातर्फे नुकताच एक पेड माँ के नामअंतर्गत सर्वप्रथम व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ. संजय अहिरे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी तसेच व्याख्याते म्हणून वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक जयस्वाल उपस्थित होते. व्यासपीठावर ज्येष्ठ प्रा. जगदीश काळे, सहयोगी प्रा. किशोर सोनवणे, प्रा. फिलीप गावित उपस्थित होते. कार्यक्रमासाठी माय भारत कार्यालयाचे जिल्हा युवा अधिकारी भूषण पाटील, सहाय्यक गणेश येशी, जोशाबा सरकार युवा मंडळाच्या सचिव नीलिमा माळी यांचे मार्गदर्शन लाभले. जोशाबा सरकार युवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नितीनकुमार माळी यांनी सूत्रसंचालन केले. ऋषिकेश पाडवी यांनी प्रास्ताविक केले. रोहन गावित यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्मिता गावित, प्रियंका वळवी, काजल वसावे, रोशनी वळवी, यमुना गावित आदींनी प्रयत्न केले.



### होळनांथे येथे कृष्ण जन्माष्टमी उत्सव उत्साहात

**शिरपूर :** होळनांथे येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम सीबीएसई पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक स्कूलमध्ये कृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा झाला. प्राचार्या भूमिका गर्ग यांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णांची पूजा करण्यात आली. धनश्री भदाणे हिने भगवान श्रीकृष्णांवरील मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सुमधुर गीते सादर करून वातावरण अधिक भक्तिमय केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लयबद्ध आणि ऊर्जा भरलेल्या नृत्याविष्काराने सभागृहात आनंद, उत्साह संचारला. पूर्वप्राथमिक विभागातील चिमुकल्यांनी मटक्यावर बोटांचे ठसे उमटवणे, मुकुट व बासरी तयार करणे अशा सर्जनशील आणि आनंददायी क्रियाकलापांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. शिक्षिका रोहिणी सांगळे यांनी सूत्रसंचालन केले.



### गुरुदत्त कॉलनीतील मराठी शाळेत दहीहंडी उत्साहात

**शिरपूर :** शहरातील गुरुदत्त कॉलनी भागातील आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात झाला. बालवाडी ते पहिलीतील विद्यार्थ्यांनी राधा आणि कृष्णाच्या वेशभूषेत नटूनथटून उपस्थित होते. मुख्याध्यापक गणेश साळुंके यांच्या हस्ते श्रीकृष्ण-राधा पूजन व दहीहंडी पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी दहीहंडीवरील गाण्यांवर बँड्च्या तालात नृत्य सादर केले. श्रीकृष्णाची आरती झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी फुगड्या खेळत दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. मुख्याध्यापक साळुंके यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. विशेष आकर्षण ठरलेली शिक्षकांसाठी डोळे बांधून दहीहंडी फोडण्याची स्पर्धा सर्वांना आनंद देणारी ठरली. विजेत्या शिक्षकांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. वंदना सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले.



### पटेल कन्या शाळेत गोपाळ काल्यानिमित्त दहीहंडी

**शिरपूर :** एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळेत गोपाळ काल्यानिमित्त दहीहंडी फोडण्यात आली. बालवाडीतील विद्यार्थिनींनी गोपाळकृष्ण व राधा यांचा पोशाख परिधान केला होता. मुख्याध्यापक मनोज पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. रूपेश कुलकर्णी यांनी गोकुळाष्टमीची माहिती दिली. 'हाथी घोडा पालखी...जय कन्हैया लाल की' या गर्जनेने परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थिनींनी उत्साहात दहीहंडी फोडली. विद्यार्थिनी व शिक्षकांनी नृत्य केले. विद्यार्थिनींना गोपाळकाल्याचा प्रसाद वाटण्यात आला.



### पाचोराबारी विद्यालयात सामूहिक पसायदान पठण

**नंदुरबार :** तालुक्यातील पाचोराबारी येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात संत ज्ञानेश्वर माउली यांच्या जयंतीनिमित्त पसायदानाचे सामूहिक पठण करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदान या अमृतवाणीच्या सामूहिक पठणातून विद्यार्थ्यांमध्ये सदभाव, सहिष्णुता आणि आध्यात्मिक जाणीव वाढवण्याचा दृष्टिकोनातून कार्यक्रम घेण्यात आला. मुख्याध्यापक गोरखनाथ बोराणे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपशिक्षक प्रवीण पटेल उपस्थित होते. संतोष पाडवी यांनी सूत्रसंचालन केले. मनोहर वसईकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी किरण पाडवी, वंदना खैरनार, कविता पटेल, राजेश पटेल, राजेंद्र ईशी, ईश्वर गिरासे, कृष्णा सामुद्रे यांनी सहकार्य केले.

### कृषी महाविद्यालयात अँटी रॅगिंग सप्ताह

**शहादा :** पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित के. व्ही. पटेल कृषी महाविद्यालयात १२ ते १८ ऑगस्टदरम्यान अँटी रॅगिंग सप्ताह साजरा करण्यात येत आहे. उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम होत आहेत. विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार अँटी रॅगिंगविषयी ध्वनी-चित्रफीत दाखविण्यात आली. महाविद्यालयाच्या अँटी रॅगिंग समितीचे सचिव व मुलांच्या वसतिगृहाचे रेक्टर डॉ. सचिन चौधरी यांनी प्रास्ताविक केले. अँटी रॅगिंग व शिस्तपालन समितीचे सदस्य प्रा. मयूर चौधरी व प्रा. विजय सपकाळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल यांनी रॅगिंगविरोधी कायदे, शिक्षा व शिस्तीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व वस्तीगृहात आदर्श वर्तन कसे ठेवावे यावरही त्यांनी भर दिला. आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी पोस्टर सादरीकरण व घोषवाक्य लेखन स्पर्धा घेण्यात आल्या असून, त्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. विजय गवांदे यांनी आभार मानले.

# 'पायी पायी पाढे' राज्यातील शाळांना प्रेरणादायी

## काल्लेखेतपाडा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा अनोखा उपक्रम

**दुर्गम आदिवासी भागात शिक्षणाची गंगा पोहोचवणे, हे आजही एक आव्हान आहे; पण या आव्हानांवर मात करण्यासाठी अनेक शिक्षक आपल्या कल्पकतेचा वापर करतात. असाच एक अभिनव उपक्रम नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात सुरू झाला आहे. काल्लेखेतपाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सुरू असलेल्या 'पायी पायी पाढे' या उपक्रमाने सर्वांनाच थक्क केले आहे.**



### उपक्रम इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरणार

'पायी पायी पाढे' हा उपक्रम शिकण्याची प्रक्रिया आणि दैनंदिन जीवन यांना जोडणारा एक आदर्श नमुना आहे. हे साध्य करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक होत आहे. हा साधा, पण प्रभावी प्रयोग आज काल्लेखेतपाडा शाळेपुरता मर्यादित असला, तरी हा आरंभ म्हणावा. हा उपक्रम महाराष्ट्रातील दुर्गम भागातील इतर शाळांसाठीही एक प्रेरणादायी उदाहरण ठरु शकतो.

**जगदीश जयस्वाल**
**शहादा, १७ ऑगस्ट**

नंदुरबार हा आदिवासीबहुल जिल्हा. त्यातील धडगाव हा दुर्गम भागातील तालुका. या तालुक्यातील उमराणी हे पाड्याच्या वस्तीचे गाव. सर्व पाडे एकमेकांपासून खूपच लांब. यातीलच एक पाडा काल्लेखेतपाडा येथे जिल्हा परिषदची शाळा आहे. शाळेच्या पाच किलोमिटर परिघात वाहन जाऊ शकत नाही. फक्त पायवाटा आहेत. त्याही डोंगर, दरी, नदी, नाले, शेत, जंगलातून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत जायचे असेल, तर सुमारे चार-पाच किलोमीटर बिकट पायवाटेतून पायपीट करण्याशिवाय पर्याय नाही. त्यातही जंगली श्वापदांची भीती नेहमी असते.

या शाळेत परिसरातील अमला, अचपा, लटकुवा, भोगवाडे, कामोद या पाच गावांसह उमराणी गावाचे देवपाडा, खालचापाडा, होळीपाडा, कुंडायपाडा, पाटीलपाडा, सावरीपाडा, मोवाडीपाडा, देवपाडा, निल्पीपाडा, ओव्यापाडा, खारमाट्यापाडा यांसारख्या सुमारे १२ पाड्यांमधील २६२ विद्यार्थी रोज तीन ते चार किलोमीटरची पायपीट करून नियमितपणे येतात. कारण, येथील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या याच प्रवासाला मनोरंजक करून शिक्षणाचे



माध्यम बनवले आहे. विद्यार्थ्यांचा प्रवास सुकर केला आहे. त्यांना पाढे पाठ करायची सवय लावली आहे.

शिक्षकांनी मुलांचे छोटे गट तयार केले आणि प्रत्येक गटात एक 'पाढा नेता' नेमला. प्रत्येक विद्यार्थी आपल्या घरातून निघून चालत येणाऱ्या नेहमीच्या गटाला सहभागी होतो. शाळेत जाताना ही मुले फक्त चालत नाहीत, तर निसर्गाचा आनंद घेत, हसत-खेळत तालासुरात पाढे म्हणत चालतात. कधी गाणी, कधी प्रश्नोत्तरे, तर विविध घोषणा देत चालत जातात. यातूनच त्यांचा मार्ग



माझ्या मुलीसह माझ्या कुटुंबातील अनेक विद्यार्थी काल्लेखेतपाडा या शाळेत दररोज पायी येतात. त्यांना आता सगळे पाढे तोंडपाठ झाले असून गणित विषयात त्यांना आवड निर्माण झाली आहे. येथील शिक्षकांनी त्यांना अभ्यासासाठी तयार केले आहे. ते नियमित अभ्यास करतात. आता विद्यार्थी स्वखुशीने शाळेत येतात. शिक्षकांचा उपक्रम खूप चांगला आहे.

**- संतोष पावरा (पालक, रा. निमरानी बुद्रुक, ता. धडगाव)**

तर सुकर होतो, ते सहज बिकट वाटा, नदी, नाले चालून जातात, टेकड्या चढून जातात. त्यांचा गणित विषयाचा अभ्यास सतत सुरू असतो.

हा उपक्रम सुरू करण्यामागे काही महत्त्वाची उद्दिष्टे होती. एक म्हणजे मुलामुलींचा प्रवास तर सुकर झालाच, वेळेचा सदुपयोगही झाला, या प्रवासादरम्यान जंगली प्राणी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांपासूनही मुलांची सुरक्षा झाली. कारण, सातत्याने आवाज होत असल्याने श्वापदे जवळ येत नाहीत. महत्त्वाचे म्हणजे १ ते ३० पर्यंतचे पाढे सहज पाठ करून घेतले जात आहेत आणि मोठ्या मुलांकडून लहान मुलांना शिकण्याची संधी देणे, ज्यामुळे सहशिक्षणाची आणि सर्जनशील शिकवण्याची एक उत्तम संस्कृती तयार झाली आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या पाढे पाठ करण्याच्या गतीमध्ये आणि अचूकतेमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. लहान मुलांनी मोठ्या मुलांकडून उच्चार आणि लय सहजपणे शिकून घेतली. गणिताची भीती जाऊन त्यांच्यात एक आत्मविश्वास निर्माण झाला आहे. शाळा सुरू होण्यापूर्वीच त्यांच्या अभ्यासाची सुरुवात होते. पाढे मनोरंजक व्हावे यासाठी उलटे व आडवे पाढेही पाठ करायला लावली जातात. पाढे म्हणत प्रवास होत असल्याने त्यांना थकवाही जाणवत नाही. ऊर्जा टिकून राहिल्याने अभ्यासासोबत खेळातही त्यांचे मन रमते.

सुरुवातीला ही शाळा वस्तीशाळा होती. २००८ मध्ये जिल्हा परिषदेचे पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग सुरू झाले. १७ वर्षांपूर्वी रुपेश दिगंबर नागलगावे या शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. त्या वेळी या शाळेत विद्यार्थी यायला धजावत नव्हते. दुर्गम पद्यातून पायी येणे त्यांना शक्य होत नव्हते, तर श्वापदांची भीती असायची; पण आपली कल्पकता आणि बुद्धीच्या जोरावर शिक्षक नागलगावे यांनी हा अनोखा उपक्रम राबविला. त्यांना मुख्याध्यापक तेगा शंकर पावरा, लक्ष्मीपुत्र वीरभद्रअप्पा उप्पीन, दशरथ उग्रावण्या पावरा, रमेश वाहऱ्या पावरा व दिनेश राज्या पाडवी या सहकारी शिक्षकांची भक्कम साथ लाभली.

# येऊ द्या निवडणुका, बहिणींचा आशीर्वाद आपल्यासोबत

## मंत्री गुलाबराव पाटील : तळोद्यात शिवसेना शिंदे गटातर्फे रक्षाबंधन सोहळा





**तभा वृत्तसेवा**
**तळोदा/नंदुरबार, १७ ऑगस्ट**

सत्ता असो किंवा नसो; शिवसेनेच्या कार्यात कधीही खंड पडलेला नाही. पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व अन्य कुठल्याही निवडणुका येऊ द्या. शिवसैनिकांनी काळजी करण्याचे काहीही कारण नाही. लाडक्या बहिणींचा आशीर्वाद आपल्यासोबत आहे. तळोद्यात शिवसेनेच्या संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून न्यायदानाचे कार्य करण्यात येत असल्याचे गौरवोद्‌गार पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी काढले.

तालुका शिवसेनेतर्फे रक्षाबंधन सोहळा शनिवारी (१६ ऑगस्ट) शहरातील माळी समाज मंगल कार्यालयात उत्साहात झाला, त्या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी, उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख भाऊसाहेब चौधरी, महिला आघाडीच्या विभागीय समन्वयक सारिका कोल्हे-माळी, जिल्हाप्रमुख गणेश पराडके, जिल्हाप्रमुख ॲड. राम रघुवंशी, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कविता चौधरी, जिल्हाप्रमुख ज्योती राजपूत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विजय पराडके, जिल्हा सहसंपर्कप्रमुख रामकृष्ण वाडिले, युवक जिल्हाप्रमुख बंटी वाघ, जिल्हा उपप्रमुख गौतम जैन, माजी सभापती हितेंद्र क्षत्रिय, शहर संघटक सूरज माळी, शिवसेना पदाधिकारी ललित जाट, अमृतसिंग पावरा, धडगाव नगरपंचायतीचे धनसिंग पावरा उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, रक्षाबंधन सोहळा मी माझ्या आयुष्यात पाहिला नाही. मी असाच सोहळा माझ्या जळगाव ग्रामीण मतदारसंघात राबवीन. शिवसेना कार्यालयातून न्यायदानाचे काम होत आहे. बहिणींच्या रक्षणाची जबाबदारी शिवसैनिकांची आहे.

आमदार रघुवंशी म्हणाले की, भविष्यात शिवसैनिकांनी संघटितपणे काम करायचे आहे. शहरातील प्रश्न सुटून माता-भगिनींना न्याय मिळाला पाहिजे, ही आमची एकमेव भूमिका आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने आमदारपद मिळाल्यानंतर दर शुक्रवारी शिवसेना संपर्क कार्यालयात जनतेचे प्रश्न सोडवण्यात येतात. दुर्दैवाने शिवसेना कार्यालयासह २०० लोकांना पालिकेने अतिक्रमणाची नोटीस दिली. अतिक्रमण काढण्याचा प्रयत्न पालिकेकडून करण्यात आला. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यास स्थगिती देऊन जनतेला दिलासा दिला. शहरातील बारगळ जहागीरदारीचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही, असेही आमदार रघुवंशी यांनी नमूद केले.

आमदार पाडवी यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. अक्कलकुवा मतदारसंघात १ लाख ५ हजार लाडक्या बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. वयोश्री योजनेत पूर्वी ५०० रुपये मानधन मिळायचे. आता १५०० रुपये लाभार्थ्यांना मिळत आहेत. लाडकी बहीण योजनेचा फायदा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गरीब असलेल्या महिलांपर्यंत पोहोचवीत भावाचे नाते पार पाडले. भेटवस्तूची किंमत न बघता या भावांचे देण्याचे मोठे मन बघा. मी आमदार असूनही विचारात पडतो की, तळोद्यातील शिवसैनिक एवढ्या भेटवस्तू आणतात कुठून? खरंच या शिवसैनिकांचे कौतुक करण्यासारखेच आहे, असे गौरवोद्‌गार काढले.

याप्रसंगी तालुका शिवसेनेतर्फे पाच हजार बहिणींना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. हजारो महिलांची लक्षणीय उपस्थिती पाहून मंत्री गुलाबराव पाटील, आमदार रघुवंशी यांनी ज्येष्ठ पदाधिकारी गौतम जैन, तालुकाप्रमुख अनुप उदासी, जितेंद्र दुबे, हितेंद्र क्षत्रिय, संदीप परदेशी यांच्यासह शिवसैनिकांचा गौरव केला.

जितेंद्र दुबे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारणाच्या सेवेवर भरवसा दाखवीत शिवबंधन बांधले. काहींना पदनियुक्त्याही देण्यात आल्या. तालुकाप्रमुख अनुप उदासी, विभागीय समन्वयक सरिता माळी, बाजार समितीचे उपसभापती हितेंद्र क्षत्रिय, संदीप परदेशी, अमृत पावरा यांनी मनोगते व्यक्त केली. शिवसेनेचा रक्षाबंधन सोहळा दिवसभर चर्चेचा विषय ठरला.



# सिंथेटिक ट्रॅक, आर्चरीसाठी निधी द्या

## मंत्री ॲड. कोकाटे यांना क्रीडा संघटनांतर्फे साकडे

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १७ ऑगस्ट**

जिल्ह्यातील ॲथलेटिक्स खेळाडूंसाठी सिंथेटिक ट्रॅक, आर्चरी खेळासाठी निधीसह खेळाडूंना दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून द्या, अशी मागणी जिल्ह्यातील क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री तथा क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांची भेट घेऊन केली. याप्रसंगी मंत्री ॲड. कोकाटे यांचा सत्कारही पदाधिकाऱ्यांनी केला.

नंदुरबार जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनतर्फे शहरात अत्याधुनिक सिंथेटिक ट्रॅक उभारावा, जेणेकरून जिल्ह्यातील ॲथलेटिक्स खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांची तयारी करता येईल, अशी मागणी करण्यात आली. तसेच जिल्हा आर्चरी असोसिएशनतर्फे धनुर्विद्या खेळासाठी आवश्यक साहित्य खरेदी व मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून निधी उपलब्ध करून द्यावा, यासंदर्भात निवेदन देण्यात आले. क्रीडाशिक्षक तथा जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव व आर्चरी संघटनेचे अध्यक्ष डॉ. मयूर ठाकरे यांनी निवेदनातून मागणी केली.

या वेळी क्रीडामंत्री ॲड. कोकाटे यांनी जिल्ह्यातील खेळाडूंना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी प्रशासनाला तत्काळ पाठपुरावा करून सिंथेटिक ट्रॅक तसेच आर्चरी खेळासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

या वेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, प्रांताधिकारी अंजली शर्मा, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी महेश पाटील, तसेच क्रीडाशिक्षक भागूराव जाधव, अनिल रौंदळ, जितेंद्र पगारे, नंदू पाटील, मनीष सनेर, खुशाल शर्मा, योगेश माळी, हेमचंद्र मराठे, जिल्हा क्रीडा कार्यालयातील कर्मचारी व जिल्ह्यातील खेळाडू उपस्थित होते. निवेदनामुळे जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रात नवे पर्व सुरू होऊन ॲथलेटिक्स व आर्चरीसारख्या खेळांना चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.



**शहादा :** पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक व शहादा पोलिस ठाणे यांच्यातर्फे अमली पदार्थमुक्त जनजागृती पथनाट्य सादर करण्यात आले.

# शहादा येथे नशामुक्तीवर पथनाट्याद्वारे जनजागृती

विद्यार्थ्यांनी सप्तशृंगी मंदिर चौक, बसस्थानक परिसर व जनता चौकात पथनाट्य सादर करून नागरिकांमध्ये नशामुक्तीबाबत जनजागृती केली. पथनाट्याद्वारे अमली पदार्थांच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकत तरुणांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन पोलिस निरीक्षक नीलेश देसले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी सहाय्यक जिल्हाधिकारी कृष्णकांत कनवारिया, पालिकेचे मुख्याधिकारी साजीद पिंजारी, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप वाघ, उपनिरीक्षक भुवनेश मराठे, उपनिरीक्षक विनोद पाटील, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक किरण सूर्यवंशी, भाजपचे राज्य परिषद सदस्य विनोद जैन, सुनील पाटील, अजबसिंग गिरासे, सतीश जव्हेरी, पत्रकार योगेश सावंत, राजू मन्सुरी, प्राचार्य डॉ. एस. पी. पवार आदी उपस्थित होते.

पथनाट्यानंतर विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची शपथ घेतली. 'नशामुक्त व्हा, देशाचा सन्मान वाढवा' हा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमासाठी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव कमलताई पाटील, समन्वयक मकरंद पाटील, संचालक मयूर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. मृणाल न्हाळदे व प्रा. नेत्रदीपक कुवर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. हितेंद्र चौधरी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. दिवाकर पाटील, प्रा. मानसी धनकानी, प्रा. कृतज्ञा पाटील, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अल्पसंख्याकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील

## ॲड. कोकाटे : नंदुरबारमध्ये मुस्लिम अल्पसंख्याक समाजातर्फे सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १७ ऑगस्ट**

अल्पसंख्याक विकास खात्याची जबाबदारी मिळाली आहे. मी काम करणारा मंत्री आहे. केवळ आश्वासन देऊन मी थांबत नाही. मुस्लिम अल्पसंख्याक समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन. मुस्लिम समाजाच्या मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न मार्गी लावीन, असे आश्वासन क्रीडा व युवक कल्याण तथा अल्पसंख्याक विकासमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले.

शहरातील इलाही चौकात मुस्लिम अल्पसंख्याक समाजातर्फे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आरीफ शेख, शोएब खाटीक, ज्येष्ठ कार्यकर्ते माधवराव चौधरी, रतन पाडवी, मोहन शेवाळे, नरेंद्र नगराळे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमा सोनगरे, जेलसिंग पावरा, मोहन माळी, मालती वळवी, अजहर मियाँ जहागिरदार, सय्यद मुजाहीद, सिकंदर कुरेशी, गुड्डू काकर, जाकीर मियाँ, जगदीश जायस्वाल, प्रदीप मराठे, अनिल चौधरी, संगीता पाडवी, शिंपी, प्रतिभा कुळकर्णी आदी उपस्थित होते.

ॲड. कोकाटे म्हणाले की, आपण मला काम सोपवा, दर्ग्याच्या उरुसमध्ये काही कमी असेल तर ते मी काम करेन. मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न सोडवीन, मुलामुलींचा शिष्यवृत्तीचा प्रश्न सोडवीन, निर्दोष युवकांविरुद्ध गुन्हे दाखल होणार नाहीत याची मी काळजी घेईन. कुरेशी बांधवांच्या मागण्या पूर्ण करेन. नंदुरबार जिल्ह्यातील अल्पसंख्याक बांधवांना जास्तीत जास्त निधी देण्यावर माझा भर राहीन, असेही त्यांनी सांगितले.

कुठलाही धर्म वेगळा नाही. प्रत्येक धर्मियाने या देशात गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे, असे पक्षाचे धोरण आहे. इमाम बादशाह दर्ग्यावर काही बांधवांनी मीच नंदुरबारच्या पालकमंत्रिपदी राहावे, अशी मन्नत मानली होती. त्या बांधवांचे मी आभार मानतो. अल्पसंख्याक विकास खाते मिळताच रक्षाबंधनाची राखी मी माझ्या मानलेल्या मुस्लिम भगिनीकडून बांधली, असेही त्यांनी नमूद केले. अल्पसंख्याक आर्थिक महामंडळ अधिक सक्षम बनवून युवकांना त्यातून रोजगार दिला जाईल. पोलिसांकडून आकस बुद्धीने युवकांवर गुन्हे दाखल होणार नाहीत,



याची दक्षता घेतली जाईल, असेही त्यांनी आश्वस्त केले.

जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे म्हणाले की, अल्पसंख्याक विकास विभागामुळे ॲड. कोकाटे यांच्यामुळे डबल इंजिन मिळाले आहे. शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचल्या पाहिजेत, असे कोकाटे यांचे धोरण आहे. राज्यात सर्वांत जास्त काम करणारा मंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा संविधानावर चालतो, सर्वधर्मसमभाव हाच राष्ट्रवादी काँग्रेसचा अजेंडा असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. युनूसभाई यांनी प्रास्ताविक केले. शोएब खाटीक यांनी आभार मानले. प्रत्येक तालुक्यातील मुस्लिम बांधवांच्यावतीने वेगवेगळ्या संघटनांनी माणिकराव कोकाटे यांचा जाहीर सत्कार केला. तसेच जिल्ह्यातील अल्पसंख्याक बांधवांच्या समस्या मांडण्यात आल्या.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### सावळदबारा विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**सावळदबारा (ता. सोयगाव)** : येथील जय कालंका देवी शिक्षण संस्था संचालित शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व (कै.) लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील महाविद्यालय व इंग्रजी प्राथमिक शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली. शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष भावराव कोलते, प्राचार्य नारायण कोलते, व्ही. पी. पाटील, व्ही. एस. राजपूत, बी. वाय. खमाट, जीवन कोलते, बी. बी. ससाणे, व्ही. के. जाधव, एस. जी. राठोड, एम. एन. व्यवहारे, जे. ए. सत्रे, एस. जे. खवळे, एम. बी. बोरे, एस. एस. गावंडे, व्ही. पी. अमृतकर, के. बी. चोपडे, एच. आर. सोनवणे, जी. डी. सत्रे, व्ही. डी. भोके, एस. पी. चव्हाण, ए. जे. रबडे, पी. एस. सरकडे, पी. व्ही. शेळके, बी. एस. देसले, डी. डी. कोळी, जे. एस. घोती, वाय. पी. राठोड, जे. पी. मोहने, वाय. वाय. शेळके, एम. बी. पडोळ, वाय. बी. थोटे, बाबासाहेब कोलते, अजबराव चव्हाण, श्याम जाधव, संदीप कोलते, गजानन चव्हाण, तसेच शिक्षक- कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



### बाहेती विद्यालयात ध्वजवंदन

**जळगाव** : क्रीडा रसिक एज्युकेशन सोसायटी संचलित जानकीबाई आनंदराम बाहेती विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. क्रीडा रसिक एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा उज्वला बाहेती यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. संस्थेचे संचालक श्याम कोगटा, नितीन बरडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक पी. आर. जाधव व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुनीता सिमाले उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांची देशभक्तीपर संगीतमय कवायत संचालन प्राथमिक व माध्यमिकच्या विद्यार्थ्यांची घेण्यात आली. तसेच इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीतांवर नृत्य व स्वातंत्र्य दिनानिमित्त भाषणे, आपले विचार मांडले. देशभक्ती गीतांवर नृत्य सादर करताना विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात छान प्रतिसाद दिला. या कार्यक्रमानंतर श्याम कोगटा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

### धनदाई महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**अमळनेर** : येथील धनदाईमाता एज्युकेशन सोसायटी संचलित शांतिनिकेन




प्राथमिक, जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि धनदाई कला व विज्ञान महाविद्यालयात संयुक्तरीत्या स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पाडळसरे धरण जनआंदोलन समितीचे प्रणेते तथा माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. धनदाई संस्थेचे अध्यक्ष डी. डी. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष तथा प्राचार्य के. डी. पाटील, संस्थेचे सचिव राधेश्याम पाटील, संचालक नंदकुमार पाटील, खजिनदार शैलेंद्र पाटील, संचालिका प्रा. डॉ. नयना पाटील, धनदाई कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील आदी उपस्थित होते. विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सामूहिकरीत्या कवायतींसह सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्राचार्य के. डी. पाटील, डी.डी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. शैलेंद्र पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांनी आभार मानले.

### प्राथमिक आरोग्य केंद्र नशिराबाद येथे स्वातंत्र्य दिन साजरा

**नशिराबाद** : येथील प्राथमिक आरोग्य केंद्र नशिराबादच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनानिमित्त वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव जाधव, डॉ. करिश्मा जैन, डॉ. अजय पाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी बांधव उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी डॉ. करिष्मा जैन व डॉ. अजय पाल यांनी कर्मचारी यांना स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या तसेच तंबाखू मुक्ती व अवयदान साठी प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवयवदान करिता क्यू.आर कोड स्कॅन करून फॉर्म भरून घेतले.

### दिशादर्शक फलकांमुळे चाळीसगावच्या सौदर्यात भर

**चाळीसगाव** : शहराचा विकास झपाट्याने होत असून, विविध भागांत रस्त्यांची कामे झाली आहेत. या रस्त्यांवर आमदार मंगेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून दिशादर्शक फलक लावण्यात आले. या फलकांमुळे बाहेरगावाहून आलेल्या नागरिकांना योग्य रस्ता दाखविण्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे.शहरातील भडगाव रोड, हिरापूर रोड, धुळे रोड, मालेगाव रोड, स्टेशन रोड, पाटणादेवी रोड, खरजई नाका, करगाव रोड,नागद रोड, कॅप्टन कॉर्नर, शहर पोलिस ठाणे, अशा शहरातील विविध परिसरात जाण्यासाठी व मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आदी शहरांकडे जाण्यासाठी हे फलक सोयीचे होत आहेत. शहरात यापूर्वी फलक नसल्याने बाहेरगावाहून आलेले नागरिक व विद्यार्थी संभ्रमात पडत होते. नागरिकांच्या या समस्येचा विचार करता आमदार मंगेश चव्हाण यांनी यावर कार्यवाही करीत दिशादर्शक फल्क लावले. शहरातील इतरही भागांत हे फलक लावण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या फलकांमुळे शहराच्या सौदर्यात भर पडली आहे.




### दीपस्तंभ मनोबलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**जळगाव** : स्वातंत्र्यदिन दीपस्तंभ मनोबलच्या जळगाव, पुणे आणि दिल्ली केंद्रांत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जळगाव येथील मुख्य कार्यक्रमात ध्वजारोहण दीपस्तंभचे माजी विद्यार्थी व नुकतेच यूपीएससी २०२४ मध्ये यश संपादन केलेले आयएएस पुष्पराज खोत यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. शाम महाजन व डॉ. रेखा महाजन, श्री. कुणाल महाजन (इंजिनिअर उद्योजक व दीपस्तंभ अमेरिका सचिव), श्रीमती नेहा महाजन (), श्री. जितेंद्रभाई शहा (उद्योजक, अहमदाबाद), श्री. परेशभाई शहा (संचालक) आणि दीपस्तंभचे संस्थापक श्री. यजूरवेंद्र महाजन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दृष्टिहीन विद्यार्थीनी नाजनीन शेख व समीक्षा माकोडे यांच्या देशभक्तीपर गीताने झाली. या प्रसंगी विविध शासकीय परीक्षांत यश मिळवलेल्या १६ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये विनोद महारनवर, संजना बेलेकर, मयूर गायकवाड, कैलास जाधव, वैभव पईतवार, पूजा खरात, प्रवीण गायकवाड, अंकिता चोपडे, पुष्पावती पवार, योगिता पावरा, शिवम तलारे, सत्यम सोनवणे, आकाश घाटे, किशोर वैष्णव, ऋषिकेश दिवटे आणि नेहा गायकवाड या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यावेळी संस्थेतील हा पुरस्कार जाहीर करून कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप सांस्कृतिक सादरीकरणांनी झाला. पुणे केंद्रातील कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून ईयरबूक कॅनवस या कंपनीच्या सीईओ सुरश्री रहाणे उपस्थित होत्या. नुकत्याच सुरू झालेल्या दिल्ली मनोबल केंद्रात पहिल्याच वर्षी स्वातंत्र्यदिनाचा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

# यावल-रावेरमधील २५ ज्येष्ठांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया

## आमदार अमोल जावळे यांचा पुढाकार; 'मोतीबिंदूमुक्त तालुका' अभियानाला वेग

**जळगाव/ फैजपूर** : यावल-रावेर तालुक्यातील नागरिकांना 'मोतीबिंदूमुक्त' करण्याचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी आमदार अमोल जावळे यांनी हाती घेतलेला उपक्रम आता गतिमान होत आहे. त्यांच्या पुढाकारातून रविवारी (१७ ऑगस्ट) २५ ज्येष्ठ नागरिकांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील नेत्रशल्यचिकित्सा विभागात यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया पार पडल्या.

शस्त्रक्रियेनंतर सर्व रुग्णांना आवश्यक उपचार करून घरी सोडण्यात आले. विशेष म्हणजे,



या सर्व शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. यासोबतच रुग्णांना घरी जाण्यासाठी रुग्णवाहिकेची मोफत सोय उपलब्ध करून दिल्याने ज्येष्ठ नागरिक व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रवीण पाटील, डॉ. दिव्या सोनवणे, डॉ. शोबिया अन्सारी, डॉ. वृंदा कुंभारे, डॉ. भारती वाणी, डॉ. मयुरेश डोंगरे आणि डॉ. स्वाती असोले यांचे विशेष सहकार्य लाभले.

आमदार अमोल जावळे यांच्या या लोककल्याणकारी पुढाकारामुळे अनेक गरजू नागरिकांना नवे आयुष्य मिळाले असून, या उपक्रमाचे समाजभरातून कौतुक होत आहे.

#### समाजसेवेतील कार्यकर्त्यांची मदत

कार्यक्रमाच्या नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यात शिवम हॉस्पिटलचे संचालक डॉ. पंकज पाटील, दूध संघाचे संचालक अरविंद देशमुख, मंत्री गिरीश महाजन वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे आरोग्यदूत पै. शिवाजी रामदास पाटील, होनाजी चव्हाण, चैतन्य कोल्हे आणि तुषार घुगे-पाटील यांचा मोलाचा सहभाग राहिला.

#### लोककल्याणासाठी विधायक उपक्रम

आमदार अमोल जावळे यांनी सांगितले की, अनेक गरीब आणि दुर्बल कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक अडचणींमुळे योग्य नेत्रउपचार मिळत नाहीत. या शस्त्रक्रियेमुळे त्यांना पुन्हा दृष्टी प्राप्त झाली आहे. हे समाधान देणारे कार्य आहे. 'मोतीबिंदूमुक्त यावल-रावेर तालुका' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन पुढेही सातत्याने केले जाईल.

# सोयगाव तालुक्यात एकाच रात्री अतिवृष्टी

## सोयगाव, जरंडी मंडळात सरासरी शंभरी गाठली; वेताळवाडी धरण ओसंडले

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, १७ ऑगस्ट**

सोयगावसह तालुक्यात प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर शनिवारी रात्री पाच तास झालेल्या पावसाने सोयगाव व जरंडी या दोन मंडळात अतिवृष्टी झाली असून, एकाच रात्रीतून वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो झाले आहे. त्यामुळे सोयगावची सोना नदी रविवारी पहाटे दुथडी भरून वाहत होती.

तालुक्यात चारही महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली असून, मोठ्या प्रतीक्षेनंतर सावळदबारा मंडळात ९५ मिलिमीटर पाऊस झाला आहे. दरम्यान सोयगावचे वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो झाले. धरणाच्या सांडव्यातून विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे सोना नदीला मोठा पूर आला होता.

सोयगाव मंडळात तीन महिन्यांत पहिल्यांदा अतिवृष्टी झाली आहे. पाच तासांत सोयगाव मंडळात १०८ मिलिमीटर, तर जरंडी मंडळात १०५ मिलिमीटर पाऊस झाला. त्यामुळे सोयगाव शिवारात मका, कपाशी पिके पाण्यात बुडाली आहेत. बनोटी मंडळात ६२ मिलिमीटर पाऊस झाला. या भागात हा पाऊस खरिपाच्या पिकांना तारक ठरला आहे, तर काही भागात मात्र कपाशी, मका पिके आडवी झाली आहेत.

दरम्यान, सोयगावच्या वेताळवाडी धरण ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाकडून या धरणातून



सांडव्यातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. तालुक्यात सरासरी ९५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले. त्यामुळे सोयगाव, जरंडी, सावळदबारा या तीन मंडळांत सर्वाधिक नोंद झाली आहे. दरम्यान, तालुक्यातील उर्वरित प्रकल्प आणि धरणे भरण्यासाठी दमदार पावसाची आवश्यकता असल्याचे सांगण्यात येत आहे.

**सोयगाव मंडळात पिके पाण्याखाली**

सोयगाव मंडळात झालेल्या मुसळधार पावसाने मका, कपाशी, तूर, सोयाबीन, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. जरंडी मंडळातही पिकांचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका सोयगाव मंडळात बसला आहे. या पिकांची नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे.




# रोटरी क्लबच्या वारसा फोटो स्पर्धा प्रदर्शनाचा प्रारंभ

**जळगाव** : येथील रोटरी क्लब जळगाव आयोजित वारसा फोटो - स्पर्धा प्रदर्शनाचा रिंग रोडवरील पु. ना. गाडगीळ कलादालनात प्रारंभ करण्यात आला.

प्रदर्शनाचे दीपप्रज्वलन जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, विद्यापीठाचे छायाचित्रकार शैलेश पाटील, ज्येष्ठ छायाचित्रकार शब्बीर सय्यद व संधिपाल वानखेडे यांच्या हस्ते आणि आयएमएचे अध्यक्ष डॉ. शशिकांत गाजरे, विद्यार्थी सहाय्यक समितीचे प्रा. एस. एस. राणे, पु. ना. गाडगीळ अँड सन्सचे व्यवस्थापक गिरीश डेरे, चित्रकार सचिन मुसळे व अध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी, बातमीइतकेच छायाचित्राला महत्त्व असते. एक फोटो म्हणजे एक अग्रलेख असेही म्हटले जाते. त्यामुळे काहीसे दुर्लक्षित असलेल्या वृत्तपत्र छायाचित्रकारांकडे रोटरीने लक्ष देत स्पर्धा - प्रदर्शनाद्वारे यांचा केलेला सन्मान महत्त्वाचा आहे, असे सांगितले. जिल्ह्यातील केकी मूस यांनी टेबल टॉप प्रकारातील फोटोग्राफीची जगाला देणगी दिली आहे. फोटोग्राफी हा प्रतिभावंतांचा वसा आहे, असेही ते म्हणाले.

अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, ज्येष्ठ छायाचित्रकार शब्बीर सय्यद यांनीही मनोगत व्यक्त केले. सुमित देशमुख यांनी रोटरीने दरवर्षी ही स्पर्धा व प्रदर्शन आयोजित करावे, तसेच निवडक छायाचित्रांची दिनदर्शिका प्रकाशित करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रोजेक्ट चेअरमन राजेश यावलकर यांनी प्रास्ताविक केले. को-चेअरमन सुबोध सराफ यांनी सूत्रसंचालन केले. संवाद सचिव पंकज व्यवहारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला रोटरीचे मानद सचिव सुभाष अमळनेरकर, ॲड. श्रीकांत भुसारी, जितेंद्र ढाके, मकरंद डबीर, कमलेश चांदवानी, डॉ. पवन बजाज, वृत्तपत्र छायाचित्रकार आबा मकासरे, नितीन सोनवणे, गोकुळ सोनार, भूषण हंसकर, अभिजित पाटील, जे. पी. वानखेडे, उल्हास सुतार यांची उपस्थिती होती.




### रोटरी सेंट्रलमध्ये नवीन आठ सदस्यांचे स्वागत

**जळगाव** : येथील गणपतीनगर भागातील रोटरी सभागृहात आयोजित कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलमध्ये नवीन आठ सदस्यांचे स्वागत करण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून माजी प्रांतपाल रमेश मेहेर (नाशिक), अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ॲड. केतन ढाके, मेंबरशिप डेव्हलपमेंट कमिटी चेअरमन मीलन मेहता यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात डॉ. चंद्रकांत साळुंखे, निकेश विसपुते, महेश गदोदिया, प्रवीण बोथरा, अभिषेक निरखे, मनोज पाटील, लक्ष्मण कोकांडे, विशाल तलरेजा या नवीन सदस्यांना कुटुंबीयांसह रोटरी पिन, मेंबरशिप किट आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

माजी प्रांतपाल मेहेर यांनी रोटरी हा एक प्रवास असून, तो कार्यात प्रत्यक्ष सहभागी झाल्याने आनंददायी होतो, असे सांगून नवीन सदस्यांना रोटरी शपथ दिली. मीलन मेहता यांनी प्रास्ताविक केले. नवीन सदस्यांचा कार्यपरिचय डॉ.प्रीती पाटील यांनी करून दिला. अतिथींचा परिचय विष्णू भंगाळे यांनी करून दिला. प्राचार्य गोकुळ महाजन यांनी आभार मानले. नवीन सदस्यांना आमंत्रित करणारे जितेंद्र बरडे, विनोद बलदवा, सुनील पाटील, अजय चुघरा, ॲड. ओम त्रिवेदी, संतोष बरडे, तसेच मेंबरशिप डेव्हलपमेंट कमिटी सदस्य विष्णू भंगाळे, कल्पेश दोशी, महेंद्र गांधी, ॲड.ओम त्रिवेदी, प्राचार्य गोकुळ महाजन, श्यामलाल कुकरेजा व संजय व्यास यांचा सत्कार करण्यात आला.

# भिलाली येथील विद्यालयात झाडाला राखी बांधून रक्षाबंधन

**जळगाव** : श्री स्वामी समर्थ शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ भादली खुर्द ता.जि. जळगांव संचलित श्री संत सोमगीर म ाध्यमिक विद्यालय भिलाली, ता. पारोळा येथे वृक्षाला विद्यार्थ्यांची मानवी राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्याते आले. वृक्ष जे सगळ्या प्राणीमात्रांना निस्वार्थ, ऑक्सिजन, सावली, फळे, फ ुले, लाकूड इ. देत राहतात व त्याहीपेक्षा जास्त महत्वाचे म्हणजे सजीव सृष्टीचे श्र्जनच वृक्षांच्या योगदानने होते. याचे भान ठेवूनच रक्षाबंधन साजरे करण्यात आले.

सध्याच्या युगात होत असलेली अमानुष वृक्षतोड पाहता प्रत्येक सरकारी व निम सरकारी कार्यालयात एक पेड मा के नाम या उपक्रमात अनेक ठिकाणी वृक्ष लागवड केली आहे. पण जे झाड अगोदरपासूनच आहे त्याला सांभाळणे ही आपली व नवीन पिढीची जबाबदारी आहे.

हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शाळेचे उपशिक्षक विशाल जाधव यांच्या संकल्पनेतून आणि वाल्म ीक पाटील,विकास पाटील,रवींद्र मोरे,भाग्यश्री पाटील, रूपाली पाटील, अविनाश भिल,यांच्या सहकार्याने संस्थेचे अध्यक्ष मनोज पाटील व शाळेचे मुख्याध्यापक अविनाश पाटील यांच्या म ार्गदर्शनाने शाळेत रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम ासाठी सुरेश पाटील,हरेश्वर पाटील, गुणवंत साळुंखे ,आस्तिक पाटील अरुण पाटील, योगेश पाटील ,रंगराव पाटील इत्यादींनी परिश्रम घेतले.



# 'ब्रज मधुकर अर्चना लाईफ टाईम अचिव्हमेंट' संघपती दलिचंद जैन यांना प्रदान

## माजी मंत्री सुरेशदादा जैन यांच्याकडून 'मारवाड रत्न' पुरस्काराची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

जळगाव येथील जैन समाजाने आपल्या सामाजिक आणि धार्मिक कार्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली आहे जळगावच्या जैन संघ एकतेचा भारतात वेळोवेळी गौरवोल्लेख होतो. या एकतेसाठी, समाज कार्यासाठी तसेच साधु-संतांच्या सेवेत अग्रणी व्यक्तीमत्त्व संघपती सेवादास दलिचंद जैन यांना 'ब्रज मधुकर अर्चना लाईफ टाईम अचिव्हमेंट' पुरस्काराने गौरविण्यात आले. चेन्नई येथील जय ब्रज मधुकर समितीतर्फे जैन हिल्स येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात माजी मंत्री सुरेशदादा जैन यांना समाज, संस्कृती, परंपरा आणि सेवा याविषयी महत्वपूर्ण योगदानाबद्दल 'मारवाड रत्न' पुरस्काराची घोषणा करून तो त्यांना लवकरच प्रदान करण्यात येणार आहे.

हा भव्य समारंभ जैन हिल्स येथील आकाश प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. प्रथम युवाचार्य बहुश्रुत, पंडितरत्न प.पु. मिश्रीमल जी म.सा. मधुकर यांच्या अंत्येवासीनी सुशिष्या काश्मीर प्रचारिका, राजगुरुमाता प.पु. उमरावकुँवर जी अर्चना यांच्या १०३




#### गौरवाबद्दल कृतज्ञता

आपल्या सत्काराला उत्तर देताना दलिचंद जैन म्हणाले, ''वाकोदसारख्या छोट्या गावातून आमचा परिवार आला. हा विकास केवळ शिक्षणामुळे शक्य झाला. समाजात आणि संघात एकता असणे अत्यंत आवश्यक आहे. मतभेद असू शकतात, परंतु मनभेद नसावेत. कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी एकमेकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. हा पुरस्कार मी माझ्या प्रत्येक जैन संघ सदस्याला अर्पण करतो'' जैन इरिगेशनचे संस्थापक भवरलालजी जैन यांचा 'सार्थक करू या जन्माचे, रुप पालटू वसुंधरेचे' हा संदेश उपस्थितांना देत या गौरवाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

व्या जन्मोत्सवानिमित्त हा विशेष कार्यक्रम साजरा झाला. राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तलंगणा, तमिळनाडू तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधून आलेल्या श्रावक-श्राविकांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरण हा पुरस्कार प्रदान केला गेला. माजी खासदार ईश्वरलालजी जैन यांनी आपल्या मनोगतात जळगाव श्री संघाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला.

लॅण्ड, लायब्ररी अन् लॅबरेटरी प्रेमी-भवरलालजी जैन

जैन इरिगेशचे विद्यमान अध्यक्ष अशोक जैन यांनी ३२ आगमाचे सार एकाच ग्रंथात उपलब्ध करण्याची इच्छा व्यक्त केली. यामध्ये पाली, इंग्रजी, हिंदी मध्ये प्रकाशित करून हे आगम वैश्विक पातळीवर पोहोचेल असा विश्वास देखील कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला. प्रथम युवाचार्य बहुश्रुत, पंडितरत्न प.पु. मिश्रीमल जी म.सा. मधुकर यांच्या अंत्येवासीनी सुशिष्या काश्मीर प्रचारिका, राजगुरुमाता प.पु. उमरावकुँवर जी अर्चना यांच्या १०३ व्या जन्ममहोत्सवानिमित्त भावांजली अर्पण करण्यात आली. जैन हिल्स येथील पर्यावरणपूरक कार्य आणि भवरलालजी जैन यांच्या दूरदृष्टीचे प.पू. डॉ. सुप्रभाजी म.सा. यांच्याकडून कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमास किशोर मुथा-हैदराबाद, लुणकरण कोठारी सुरत, तुलसीजी बोथरा, दिलीप चोपडा, नंदलाल गादिया, संजय बाफना-उज्जैन, विनोद मुनोत, पारस राका, विनय पारख, अमर जैन, जितेंद्र कोठारी, प्रवीण पगारिया इ. मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुक्ताईनगरमध्ये आज निघणार कावड यात्रा

**मुक्ताईनगर** : शहरात आमदार चंद्रकांत पाटील यांच्याकडून सोमवारी (१८ ऑगस्ट) महाकावड यात्रा काढण्यात येणार आहे. शहरात ठिकठिकाणी कावड यात्रेच्या स्वागतासाठी डिजिटल बॅनर व भगवे ध्वज लावून सजावट करण्यात आली आहे. कावड यात्रेचा प्रारंभ कोथळी येथील संत मुक्ताई मूळ मंदिरापासून दुपारी दोनला होणार असून, कावड यात्रेची समाप्ती सायंकाळी सातला जुने गावातील नागेश्वर मंदिरात होणार आहे. कावड यात्रेची समाप्ती झाल्यानंतर सायंकाळी सातला प्रवर्तन चौकातील शिवसृष्टीसमोर भजन गायिका शहनाज अख्तर यांचा गायनाचा कार्यक्रम होईल. कावड यात्रेत प्रमुख आकर्षण डीजे लाइट शो, अघोरी टीम आणि महाकाल ढोलपथकांचे असणार आहे. कावड यात्रेत जास्तीत जास्त संख्येने मुक्ताईनगर तालुक्यातील व परिसरातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन आमदार चंद्रकांत पाटील व मुक्ताईनगर शिवसेनेतर्फे करण्यात आले आहे.

**THE INSTITUTE OF CHARTERED ACCOUNTANTS OF INDIA (ICAI)**

(Set up by an Act of Parliament)
Head Office: ICAI Bhawan,
Indraprastha Marg, New Delhi – 110 002.
**Branch Office:** Jalgaon Branch of WIRC of ICAI,
Plot, No. 10, Gajanan Colony, Ring Road,
Jalgaon, Maharashtra.

**NOTICE INVITING TENDER (PRESS NOTICE)**

ICAI invites unconditional sealed bids, in prescribed format, from eligible, experienced and reputed Architectural firms/ Architects for providing comprehensive Architectural / Consultancy services for proposed renovation works at ICAI Bhawan, Jalgaon Branch of WIRC of ICAI, Plot, No. 10, Gajanan Colony, Ring Road, Jalgaon.

The Tender document is available at ICAI website www.icai.org, www.wirc-icai.org & www. jalgaon-icai.com. The last date of submission of duly filled in Bids is up to 01/09/2025 05: 00 pm

**Secretary, ICAI**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### भोळे महाविद्यालयात तंबाखूमुक्तीची शपथ

**भुसावळ** : येथील दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त प्राचार्य डॉ. राजू फालक, समाजसेवक प्रवीण भोळे, न्यायाधीश संजय बुंधे यांच्या उपस्थितीत तंबाखूमुक्तीची शपथ कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी प्रा. डॉ. संजय चौधरी, रासेयो अधिकारी प्रा. डॉ. जगदीश चव्हाण, प्रा. डॉ. अनिल सावळे, प्रा. श्रेया चौधरी, प्रा. एस. डी. चौधरी, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. डॉ. माधुरी पाटील, प्रा. संगीता धर्माधिकारी, प्रा. निर्मला वानखेडे, प्रा. जागृती सरोदे, प्रा. डॉ. अंजली पाटील, प्रा. गायत्री नेमाडे, प्रा. कामिनी चौधरी, प्रा. डॉ. राजेश ढाके, प्रा. डॉ. जी. पी. वाघुळदे, प्रा. दीपक जैस्वार, पराग पाटील, युवराज चौधरी, राजेश पाटील, प्रमोद नारखेडे, मिलिंद नेमाडे, ललित झोपे, प्रकाश चौधरी, प्रकाश सावळे, सुनील ठोसर, सुधाकर चौधरी, विजय पाटील, दीपक महाजन उपस्थित होते.



### खडसे महाविद्यालयात बुद्धिबळ मार्गदर्शन कार्यशाळा

**मुक्ताईनगर** : येथील श्रीमती जी. जी .खडसे महाविद्यालयात रविवारी (१७ ऑगस्ट) बुद्धिबळ खेळाची आवड विद्यार्थ्यांमध्ये रुजावी, यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना बुद्धिबळ खेळाची माहिती व नियम माजी खेळाडू प्रशांत राणे यांनी दिली. यातून काही ठराविक खेळाडूंची निवड विशेष प्रशिक्षणासाठी करण्यात आली. कार्यशाळेसाठी विजयेंद्र पाटील यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी विजेंद्र पाटील यांनी, बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विचारशक्ती आणि रणनीतीची शाळा आहे, असे म्हटले. प्रवीण राठोड, हर्ष जैन, राहुल पावरा, पुष्पेंद्र धनके, किरण पावरा, वैष्णवी मोरे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यापुढेही नियमित बुद्धिबळ या खेळाचा सराव क्रीडा विभागामार्फत घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले. प्राचार्य डॉ. हेमंत महाजन, उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे, उपप्राचार्या डॉ. वंदना चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संचालक प्रा. डॉ. प्रतिभा ढाके यांनी कार्यशाळेचे संयोजन केले. समाधान सुरवाडे व आत्माराम मराठे यांनी सहकार्य केले.




### जे.टी. महाजन स्कूलमध्ये १० वी च्या विद्यार्थ्यांनी फोडली दहीहंडी

**यावल** : यावल येथील व्यास शिक्षण मंडळ संचलित जे.टी. महाजन स्कूल येथे गोपाळकाला मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रिन्सिपल रंजना महाजन होत्या. यावेळी इंग्लिश मीडियमच्या प्राचार्य दिपाली धांडे, शाळेच्या पर्यवेक्षिका राजश्री लोखंडे व गौरी भिरूड उपस्थित होत्या. प्रारंभ श्री कृष्णा च्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. त्यानंतर गोपाळकाला विषयी शिक्षिका भार्गव व अश्विनी चौधरी यांनी मुलांना श्रीकृष्णाबद्दल माहिती दिली. शाळेतील इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी मोठ्या उत्साहात फोडत आनंद घेत गोपाळकाल्याचा प्रसाद घेतला. मुलांनी यावेळी श्रीकृष्णाच्या गाण्यांवर छान रासलीला केल्या. सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका पूनम कोळंबे यांनी तर आभार प्रदर्शन श्रद्धा बडगुजर यांनी केले.

### फैजपूरला पसायदानाचे सामूहिक पठण

**फैजपूर** : श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी ७५० जयंतीवर्षानिमित्त पसायदानाचे सामूहिक पठण करण्यात आले.
तसेच फैजपूर पोलीस स्टेशन अंतर्गत अमली पदार्थांचे दुष्परिणाम या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर मोताळे, पोलीस उपनिरीक्षक नीरज बुकिले ,सहाय्यक फौजदार विजय चौधरी उपस्थित होते. निबंध स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी प्रथम क्र. कुंजन किरंगे, द्वितीय क्रमांक राजनंदिनी चव्हाण, तृतीय क्रमांक नीरज भारंबे ने मिळविला. या विद्यार्थ्यांना रामेश्वर मोताळे आणि नीरज बोकिले यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच गर्ल्स इस्लामीक ऑर्गनायझेशनतर्फे राष्ट्रीय एकात्मता राष्ट्रभक्ती तसेच राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव या कार्यक्रमांमध्ये करण्यात आली. कार्यक्रमांमध्ये एन.पी. पाटील यांनी सूत्रसंचालन तर आभार प्रदर्शन ए.एस.नेहते यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक के. टी. तळेले, पर्यवेक्षक एस.ओ.सराफ यांचे मार्गदर्शन लाभले. तर ज्येष्ठ शिक्षक सी. एल. धांडे, ए.के. महाजन, व्ही.एम. भोई, कल्पना होले, कविता सराफ सर्व शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.



### विरावली येथे अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**यावल** : जिल्हा परिषद मराठी शाळा, विरावली येथे महान शासिका, लोकसेविका व महिला सक्षमीकरणाची प्रेरणा असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन कृषी कन्यांनी पुढाकार घेऊन केले. कार्यक्रमाची सुरुवात अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर शिक्षकांनी त्यांच्या जीवनावर आधारित भाषणांच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या कार्याची आठवण करून दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका योगेश्वरी धनगर यावेळी म्हणाल्या की, ''अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रियांसाठी सामाजिक न्याय आणि शिक्षणासाठी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे.'' कार्यक्रमाचे संयोजक कृषिकन्या धनश्वेता अहिरे, प्रज्ञा गजरे, ऐश्वर्या सोनवणे, सृष्टी डोंगरे, प्रतीक्षा गावित, विशाखा सोनावणे यांनी केले. यावेळी प्रियंका तायडे, सुवर्णा पाटील, शिक्षकवृंद तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कृषिकन्यांना कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एम.गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.पी. भोळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# भुसावळ पालिकेची आज प्रारूप प्रभाग रचना होणार जाहीर

## २१ ऑगस्टपर्यंत घेता येणार हरकती; ३० सप्टेंबरला अंतिम निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १७ ऑगस्ट**

पालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी प्रभाग रचना तयार होणार आहे. सोमवारी (१८ ऑगस्ट) प्रारूप प्रभाग रचना जाहीर होऊन यावर २१ ऑगस्टपर्यंत हरकती मागविल्या जाणार आहेत. हरकतींवर सुनावणी होऊन २६ ते ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम प्रभाग रचना जाहीर होईल.

पालिकेत १८ ते २१ ऑगस्टदरम्यान प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व हरकती मागवल्या जातील. २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबरदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांकडे




हरकतींवर सुनावणी होईल. २ ते ८ सप्टेंबरदरम्यान प्रभाग रचना नगरविकास विभागाकडे सादर होऊन २६ ते ३० सप्टेंबरदरम्यान अंतिम प्रभाग रचना सादर होईल. या प्रक्रियेची राजकीय क्षेत्राला उत्सुकता लागून आहे. दरम्यान, सुरुवातीला कोरोना महामारी व नंतर मराठा आरक्षणाच्या मुद्याने गेल्या साडेतीन वर्षांपासून पालिकेची निवडणूक रखडली आहे.

सलग साडेतीन वर्षांपासून पालिकेवर प्रशासकीय राजवट कायम आहे. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याचे आदेश दिले होते. यानुसारच आगामी निवडणूक होणार आहे. पालिकेत पूर्वीप्रमाणे १३ जागा ओबीसींसाठी राखीव ठेवून आगामी काळातील निवडणुका होतील. यातील ५० टक्के अर्थात ७ जागांवर ओबीसी महिलांना आरक्षण राहील.

### महिलांसाठी ५० टक्के आरक्षण

आगामी निवडणुकीत २५ प्रभाग व ५० जागा असतील. ५० टक्के महिला आरक्षणानुसार २५ जागांवर महिला आरक्षण असेल. भुसावळ शहरात अनुसूचित जातीची लोकसंख्या २८ हजार ५४२ इतकी आहे. तर एसटी अर्थात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ६ हजार १२५ आहे. यानुसार अनुसूचित जातीसाठी आठ जागा, एसटी अर्थात अनुसूचित जमातीसाठी २ जागा आरक्षीत राहतील. ओबीसींसाठी १३ जागांवर आरक्षण असेल.

**आठ हजार लोकसंख्येमागे एक सदस्य वाढणार**

'अ' वर्ग नगरपालिकेसाठी १ लाख लोकसंख्येसाठी ४०, तर त्यावरील प्रत्येक आठ हजार लोकसंख्येमागे एक सदस्य वाढेल. अर्थात, २०११ च्या जनगणनेनुसार भुसावळ शहराची लोकसंख्या एक लाख ८७ हजार ४२१ असल्याने नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत एक प्रभाग वाढून सदस्यांची संख्या दोनने वाढणार आहे. यापूर्वी २४ प्रभाग ते आता २५ होतील, तर ४८ ऐवजी ५० सदस्य निवडून येतील.

# कष्ट अन् आत्मविश्वासाच्या बळावर कोणत्याही क्षेत्रात यशप्राप्ती

## माजी आमदार अरुण पाटील : रावेरला मराठा समाजातर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, १७ ऑगस्ट**

विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच संस्कारित होण्याची गरज आहे. कष्ट व आत्मविश्वासाच्या बळावर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते, असा विश्वास माजी आमदार अरुण पाटील यांनी व्यक्त केला.

रावेर तालुका मराठा समाज विकास मंडळातर्फे आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या वेळी देणगीदार, विशेष प्रावीण्य पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा सत्कार व प्रतिमा अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर मुक्ताईनगर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप पाटील, राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष जे. के. पाटील, मराठा समाज विकास मंडळाचे अध्यक्ष राहुल पंडित, माजी अध्यक्ष डॉ. एस. आर. पाटील, सचिव वामनराव पाटील,



संचालक अंबादास महाजन, पुंडलिक पाटील, ॲड. ए. जे. पाटील, संतोष महाजन उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. माजी आमदार अरुण पाटील म्हणाले की, शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी स्वतः मधील क्षमता तपासून शिक्षणाची वाट निवडावी. कष्ट व आत्मविश्वासाच्या बळावर निश्चितच यश मिळते. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी संस्कारित असणे महत्त्वाचे आहे. उद्योग, नोकरीकडे जाताना शेती व्यवसायाकडे लक्ष द्यायला हवे. कष्ट करण्याची तयारी व आत्मविश्वास आणि ध्येय निश्चित असेल तर यश नक्कीच मिळेल, असा विश्वास माजी आमदार अरुण पाटील यांनी व्यक्त केला.

आर. बी. महाजन व शेखर पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला बी. एस. पाटील, दिलीप नामदेव पाटील, सुरेश पाटील, नितीन पाटील, व्ही. व्ही. पाटील, युवराज महाजन, डॉ. मनोहर पाटील, पी. आर. पाटील, अर्जुन महाजन, ॲड. व्ही. पी. महाजन, सुनील कोंडे, एस. टी. पाटील, यशवंत महाजन, घनश्याम पाटील यांच्यासह मराठा समाज विकास मंडळाचे संचालक व समाजबांधव उपस्थित होते.

### कौतुकामुळे कार्यास बळ मिळते : जे. के. पाटील

विविध क्षेत्रांत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिल्यास कार्यास बळ मिळते. व्यावसायिक शिक्षणाच्या वाटा विद्यार्थ्यांनी निवडाव्यात, ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा. समाजातील अनिष्ट प्रथा बंद केल्या पाहिजेत. युवक पिढी विघातक वळणावर जात आहे. यासाठी शिक्षणासोबत संस्कार महत्त्वाचे आहेत, असे राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष जे. के. पाटील यांनी सांगितले.



## झाड माझ्या दादांचंअंतर्गत रोपांचे वाटप

### राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचा उपक्रम

**मुक्ताईनगर** : 'झाड माझ्या दादांचं' या उपक्रमांतर्गत पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपणाचा संदेश देत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या रावेर लोकसभा क्षेत्राचे जिल्हा कार्याध्यक्ष अश्विन सुरवाडे यांच्या पुढाकाराने शहरातील विविध वरिष्ठ महाविद्यालयांना औषधी रोपे भेट म्हणून देण्यात आली.

या उपक्रमाचा उद्देश जैवविविधता जपणे, पर्यावरणाचा समतोल राखणे तसेच वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी वृक्षारोपणास प्रोत्साहन देणे, हा आहे.

याच उद्देशाने श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, शासकीय कृषी महाविद्यालय व संत मुक्ताबाई महाविद्यालयातील प्राचार्यांना आवळा, कडू निंब, चिंच, वड यांसारख्या रोपांचे वाटप करण्यात आले.

या वेळी श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. हेमंत महाजन, शासकीय कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील, तसेच राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे कार्यकर्ते जिशान बागवान, प्रवीण राठोड, विश्वजित देशमुख आदी उपस्थित होते.

# टिश्युकल्चर रोपे उत्पादन केंद्रासाठी हिंगोणेत जागा पाहणी

## केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, आमदार अमोल जावळे यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १७ ऑगस्ट**

केळीची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि उच्च दर्जाच्या लागवड साहित्याची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी केंद्रीय सहकारिता मंत्रालयांतर्गत भारतीय बीज सहकारी समिती लिमिटेडने महाराष्ट्रात अत्याधुनिक केळी टिश्युकल्चर लागवड रोपे उत्पादन सुविधा स्थापन करण्यासाठी मंजुरी दिली असून, रविवारी (१७ ऑगस्ट) केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे व आमदार अमोल जावळे यांनी स्थानिक भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हिंगोणा (ता. यावल) येथे भेट देऊन नियोजित जागेची पाहणी केली.

भारतीय बीज सहकारी समिती लिमिटेडच्या अलीकडच्या तांत्रिक मूल्यांकन आणि प्रत्यक्ष स्थळपाहिणी भेटींमध्ये यावल तालुक्यातील हिंगोणे कार्यस्थळ हे सर्वांत योग्य ठिकाण असल्याचे आढळून आले. कारण, महाराष्ट्राच्या केळी पट्ट्याच्या मध्यभागी असलेले हे ठिकाण असून,



व्यापक केळी लागवडीने वेढलेले आहे. उच्च सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण असलेली खोल, सुपीक काळी माती, मातृ वनस्पती लागवड आणि कडकपणासाठी आदर्श जमीन आहे. तसेच ट्यूबवेल आणि बोअरवेलमधून पुरेशी पाण्याची उपलब्धता २०० फूट खोली आहे.

केळी टिश्युकल्चर रोपे उत्पादन केंद्र सुविधा जळगाव आणि महाराष्ट्रातील इतर भागांमधील केळी उत्पादक शेतकरी आणि सहकारी संस्थांच्या गरजा पूर्ण करेल, परवडणाऱ्या किमतीत रोगमुक्त, खऱ्या प्रकारातील, जास्त उत्पादन देणारी केळीची रोपे तयार करण्यासाठी ही संस्था काम करेल. यासाठी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय सहकारितामंत्री अमित शहा यांच्याकडे तसेच कृषिमंत्र्यांकडे वारंवार मागणी केली होती. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष सहकार्य लाभले.

# जी. जे. राजपूत महाविद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा

**बोदवड** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पंचायत समिती शिक्षण विभागाच्या मान्यतेने जी. जे. राजपूत इंटरनॅशनल स्कूल वरखेड येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा झाल्या. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी हरी नानकर होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजाबसिंग पाटील (संचालक जी. जे. राजपूत विद्यालय), क्रीडा समन्वयक संजय निकम, माध्यमिक पतपेढी संचालक मोझे, प्राचार्य व्ही. एच. पाटील यांची उपस्थिती होती. यात १४ वर्षे १७ व १९ वर्षांतील मुला मुलींचे ३८ संघ सहभागी झाले होते.

१४ वर्षे वयोगटातील मुलांच्या अंतिम सामन्यात **विजयी संघ -** ची. स. महाजन विद्यालय, जामठी, **उपविजयी संघ -** नूतन माध्यमिक विद्यालय, हरणखेड. **१४ वर्ष मुलींचे संघ -** विजयी संघ - बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालय, शेलवड, उपविजयी संघ - सर सत्यजित राम नेमाडे, बोदवड. **१७ वर्ष मुलांचा संघ -** विजयी संघ -चि.स.महाजन विद्यालय, जामठी. उपविजयी संघ - जी.जे. राजपूत विद्यालय, वरखेड खुर्द

**१७ वर्ष मुलींचा संघ -** विजयी संघ - बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालय, शेलवड, उपविजयी संघ - सर सत्यजित राम नेमाडे विद्यालय, बोदवड. **१९ वर्ष मुलांचा संघ -** विजयी संघ - न. ह. राका हायस्कूल, बोदवड. उपविजय संघ - सर सत्यजित राम नेमाडे विद्यालय, बोदवड. **१९ वर्ष मुलींचा संघ -** विजयी संघ - जी. जे. राजपूत विद्यालय, वरखेड खुर्द, **उपविजयी संघ -** न. ह. राका हायस्कूल, बोदवड.

स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी क्रीडा शिक्षक एस. एस. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली राजनकर, पारस्कर, सुषमा पाटील, गड्डम मॅडम, ज्योत्स्ना पाटील, प्रीती पाटील, परखड मॅडम, शेळके मॅडम, आर. सी. पाटील आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



## आठवडे बाजारात नियमावलीचा भंग

### वाहतूक कोंडीने मुक्ताईनगरकर त्रस्त

**मुक्ताईनगर** : शहरात दर आठवड्याला भरणाऱ्या बाजारासाठी दहा ते पंधरा खेड्यांमधील ग्रामस्थ खरेदीसाठी येतात. मात्र, पालिकेने आखून दिलेल्या नियमावलीचा भंग होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. ठरवून दिलेल्या जागेऐवजी बाजार रस्त्यावर पसरत असून, परिवर्तन चौक ते जुने बसस्थानक यादरम्यानची बाजारपेठ गर्दीने फुलली आहे.

अनियमिततेमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ठेकेदारांना पालिकेकडून स्पष्ट नियमावली देण्यात आली असतानाही ती पाळली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. यामुळे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन मार्ग काढावा लागत असल्याचे नागरिक सांगत आहेत. तसेच बाजाराच्या ठरलेल्या जागेच्या बाहेर पसरलेल्या विक्रीतून स्वयंघोषित कर्मचारी किंवा दलालांकडून वाहनधारकांकडून पैसे वसूल होत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. काटा-वजनांवर घेतला जाणारा अधिकृत कर टाळून 'आंबा-



संभा' नावाखाली अवैध वसुली होत असल्याचा आरोप काही विक्रेत्यांनी केला आहे.

मोठी वाहने बाजाराच्या आतील भागात आणून दुकानांच्या बाजूला लावल्याने चार ते पाच विक्रेत्यांची जागा अडकून पडत आहे. यामुळे केवळ ग्राहकांनाच नव्हे; तर इतर विक्रेत्यांनाही व्यापारात अडथळा येत आहे. गेल्या काही वर्षांपासून बाजाराबाहेर ठेवली जाणारी वाहने आता बाजारातच शिरल्याने संपूर्ण बाजार व्यवस्थाच कोलमडल्याचे चित्र आहे.

याबाबत नगरपालिका प्रशासन किंवा पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होणार का, तसेच नवीन नियमावली आखून नागरिक आणि विक्रेत्यांना दिलासा मिळणार का, असे प्रश्न सध्या शहरात चर्चेत आहेत. व्यापाऱ्यांनीदेखील या परिस्थितीबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

## पाडळसे येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेचे यशस्वी आयोजन



**यावल** : लोक विद्यालय पाडळसे येथे यावल तालुकास्तरीय १४, १७ व १९ वर्षे वयोगटाच्या (मुलींच्या) खो-खोच्या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून ग्रामीण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आर.व्ही. पाटील तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ग्रामीण शिक्षण संस्था पाडळसेचे संचालक विनायक पाटील यांनी केले. यावेळी ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उदय पाटील, सचिव प्रभाकर चौधरी, संचालक ललितकुमार पाटील, शरद बऱ्हाटे, युवराज पाटील, तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, तलाठी अंजली, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष शेखर तायडे, मुख्याध्यापक व्ही.बी.पवार, पर्यवेक्षक आर.टी.चौधरी, तालुका क्रीडा अध्यक्ष के.यू.पाटील, तालुका क्रीडा समन्वयक दिलीप बिहारी, संगेले तसेच तालुक्यातील विविध शाळांमधून आलेले क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

सूत्रसंचालन मयूर पाटील यांनी केले. तहसीलदार मोहनमाला नाझीरकर यांनी विद्यार्थ्यांना खेळाविषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व विद्यार्थ्यांना खेळाची शपथ शाळेच्या क्रीडा शिक्षिका पाटील यांनी दिली. या स्पर्धेत लोक विद्यालय पाडळसे, जे.टी.महाजन इंग्लिश मीडियम स्कूल फैजपूर, जे.टी.महाजन इंग्लिश स्कूल यावल, पोदार इंटरनॅशनल स्कूल अकलूद, न्यू इंग्लिश स्कूल भालोद, घ.का.विद्यालय आमोदा, अ.ध.चौधरी विद्यालय कठोरा, ताप्ती माध्यमिक विद्यालय दुसखेडा, प्रभात विद्यालय हिंगोणा, शारदा विद्या मंदिर साकळी या शाळांनी सहभाग घेतला. सर्व वयोगटांमध्ये लोक विद्यालय पाडळसे शाळेतील मुलींचे संघ विजयी ठरले.

या सर्धेत पंच म्हणून किशोर नेहते, व्ही.जी.बऱ्हाटे, वाय.बी.नेहते, एम.बी.पाटील, मिलिंद पाटील, सतीश कोळी यांनी परिश्रम घेतले. तर गुणलेखक म्हणून एस.आर.भोई, एल.डी बऱ्हाटे, एस.एल. पाटील,जे.एन.जंगले, एल.बी.कोळी, आर.बी. कोरपावलीकर, श्रीमती बी.एस.पाटील, पी.एम. महाजन, एम.एस.कोठेकर, व्ही.व्ही.चौधरी यांनी कामकाज पाहिले. स्पर्धेतील विजेत्या संघांना जिल्हास्तरावर यश मिळवण्यासाठी शाळेच्या संचालक मंडळाने शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

|| अभीष्टचिंतन ||
आप्पासाहेब
उमेश हिरालाल करोडपती
संस्थापक अध्यक्ष
श्री बालाजी विद्या प्रबोधिनी मंडळ, पारोळा
यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा !

शुभेच्छुक

डॉ. सचिन उमेश बडगुजर | इंजि. निलेश उमेश बडगुजर | डॉ. चेतन उमेश बडगुजर | इंजि. संकेत उमेश बडगुजर
समस्त करोडपती परिवार, चोपडा-पारोळा
सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ
श्री बालाजी विद्या प्रबोधिनी मंडळ, पारोळा
श्री. हेमंतकुमार पाटील, मुख्याध्यापक | श्री. विजय बडगुजर, मुख्याध्यापक | कु. स्वाती बलखंडे, प्राचार्या
सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद
श्री बालाजी विद्या प्रबोधिनी मंडळ संचलित,
पूर्व प्राथमिक - प्राथमिक विद्यालय, डॉ. व्ही. एम. जैन माध्यमिक विद्यालय
व आप्पासो. यु. एच. करोडपती उच्च माध्यमिक विद्यालय,
सौ. एम. यु. करोडपती इंग्लिश मिडीयम स्कूल, पारोळा जि. जळगांव

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
www.tarunbharatjalgaon.com

१ जळगाव, सोमवार, १८ ऑगस्ट २०२५






# जळगावात प्लास्टिक बंदी आहे कुठे?

## सर्रासपणे होतोय वापर; पशुधनाला मोठा धोका; मनपाचा आरोग्य विभाग निद्रावस्थेत

### महत्त्वाचे

### मद्यपी बापाची मुलीसह पत्नीला मारहाण

**जळगाव :** मुलगी अभ्यास करत होती. दारु पिऊन घरी आलेला बाप मोबाईलवर गाणे ऐकत होता. मी अभ्यास करत आहे, गाणे वाजवू नका,असे मुलीने सांगितल्याने मद्यपी बापाने पत्नीसह मुलीला मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. शुक्रवारी (१५ ऑगस्ट) सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास ही घटना चंदुआण्णानगरात गिरणाई कॉलनी येथे घडली. या प्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार मद्यपी बापावर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मुलीला दुखापत केल्यानंतर संशयित त्याच्या मूळ गावी निघुन गेला. हवालदार धनराज पाटील गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### सर्पदंश होऊन चार जण अत्यवस्थ

**जळगाव :** वेगवेगळ्या ठिकाणी सर्पदंश होऊन चार जणांना विषबाधा झाली. अत्यवस्थ अवस्थेत चौघांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिजाबाई रुपसिंग पाटील (वय ५५,रा. पिंप्री,ता.धरणगाव), मंगलाबाई नरसिंग पाटील (वय ७०, शिवनी,ता.भडगाव), जितेंद्र प्रकाश राठोड (वय २०, रा.हरिनगर,ता. जामनेर) यांचा बाधितांमध्ये समावेश आहे. चौघांची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

### बेपत्ता तरुणी मिळाल्या मिसिंग तपासात

**जळगाव :** शहरातून बेपत्ता झालेल्या दोन तरुणी मिसिंग तपासातून पोलिसांना मिळुन आल्या. शनिवारी (२ ऑगस्ट) रोजी २२ वर्षीय तरुणी रामानंदनगर पोलीस ठाणे हद्दीतून बेपत्ता झाली होती. ३० जुलै रोजी २१ वर्षीय तरुणी जिल्हापेठ हद्दीतून बेपत्ता झाली होती. या प्रकरणी पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल केल्या होत्या. या तपासातून या दोन्ही तरुणी शुक्रवारी (१५ ऑगस्ट) रोजी पोलिसांना मिळुन आल्या. या दोघांना त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन पोलिसांनी केले.

### अनोळखी आढळला बेशुद्धावस्थेत

**जळगाव :** पस्तीय वर्षीय अनोळखी इसम भुसावळ रेल्वे स्टेशन परिसरात बेशुध्दावस्थेत रविवारी आढळला. ही माहिती कळताच १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेतून अनोळखीला रुग्णालयात हलविण्यात आले. रुग्णावर उपचार सुरू आहेत.

### दुचाकीच्या धडकेत दोघे भाऊ जखमी

**जळगाव :** वळण रस्त्यावर भरधाव दुचाकीने जोराची धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे भाऊ जखमी झाले. गुरुवारी (१४ ऑगस्ट) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास ही घटना वावडदा गावाच्यापुढे एरंडोलकडे जाताना कुरकुरे नाल्याजवळ घडली. जखमी दोघे भाऊ जळगाव येथील रहिवासी आहेत. चिरागदीन शेख अकबर (वय ३५) तसेच त्यांचा भाऊ सबदर शेख अकबर असे दोघे जण दुचाकी (एमएच १९ एयू०२४४) ने सोबत जात होते. त्याचवेळी दुचाकी (एमएच १९ ईडी ६८७०) वरील दुचाकीस्वाराने वेगाने वळणावरुन येताना धडक दिली. याअपघातात सबदर शेख तसेच चिरागदीन शेख हे दोघे जखमी झाले. याप्रकरणी तक्रारीनुसार अपघातास कारणीभूत दुचाकी चालक किशोर गोकुळ चौधरी (रा. गेंदालाल मिल) याच्याविरुध्द एम आयडीसी पोलीस ठाण्यात शनिवारी (१६ ऑगस्ट) गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार ईश्वर लोखंडे तपास करीत आहेत.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

**अंकासाठी संपर्क**
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२




**चेतन साखरे**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

१९९९ पासून आजवर चार वेगवेगळ्या नियमांद्वारे केंद्र आणि राज्य सरकारने प्लास्टिकबंदी करण्याचा प्रयत्न केला आहे. अध्यादेश, कायदा, नियम असे जरी त्याचे स्वरूप असले तरी आजवर प्लास्टिक नियंत्रणावर पूर्णपणे यश मिळवता आलेले नाही. जळगाव शहरात या बंदीची अंमलबजावणी कितपत प्रभावीपणे होत आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कारण शहरातील भाजी विक्रेते, किराणा दुकानदार, कपडा मार्केट, फुले मार्केट तसेच फळ विक्रेते अजूनही सर्रासपणे प्लास्टीक पिशव्यांचा वापर करत असल्याचे वास्तव उघडकीस येत आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून या संदर्भातील कारवाईवर पुरेसा जोर दिला जात नसल्याने नागरिकांमध्येही या नियमाविषयी उदासिनता दिसून येत असून जळगावात प्लास्टिक बंदी आहे तरी कुठे? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

२०१८ पासून, राज्य सरकारने प्लास्टिक पिशव्या आणि इतर प्लास्टिकच्या वस्तूंच्या वापरास बंदी घातली आहे. बंदी असूनही जळगाव शहराच्या बाजारपेठेतील विक्रेते ग्राहकांना थोडेसे भाजीपाला किंवा फळेही प्लास्टीक पिशवीत भरून देतात. या पिशव्यांवर कोणतेही दर लिहिलेले नसतात, त्यांची जाडीही शासनाने ठरवून दिलेल्या निकषांपेक्षा म्हणजेच ५० मायक्रॉनपेक्षा कमीच असल्याचे आढळते. ग्राहकांनाही याची पर्वा नसल्याने विक्रेत्यांना प्लास्टीक वापरणे सोपे जाते.

**कपडा मार्केट, फुले मार्केट, फळ विक्रेत्यांकडूनही सर्रास वापर**

कपडा मार्केट, फुले मार्केट, बळीराम पेठ, फळगल्ली याठिकाणी खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर प्लास्टीक पिशव्यांमध्ये माल दिला जातो. फुले व फळ विक्रेत्यांकडेही याच स्थितीचे चित्र आहे. प्लास्टीकवर बंदी असतानाही त्याचा वापर बिनधास्त सुरू असल्याने प्रशासनाची कारवाई फक्त कागदावरच मर्यादित असल्याचे दिसून येत आहे.

### महापालिकेचे कारवाईकडे दुर्लक्ष

महापालिकेच्या आरोग्य प्रशासनाकडून काही वेळा जप्ती मोहिमा राबवून दंड वसूल करण्यात येतो. मात्र त्याची सातत्याने अंमलबजावणी होत नसल्याने विक्रेते व व्यापारी पुन्हा जुन्या पद्धतीकडे वळतात. नागरिकांमध्येही दंड होण्याची भीती कमी असल्याने बंदीकडे दुर्लक्ष होते.



### नियमांचे सर्रास उल्लंघन

शासनाने ठरवलेल्या निकषांनुसार ठरावीक जाडीपेक्षा जास्त मायक्रॉनच्या प्लास्टीक पिशव्या वापरण्यास सक्त मनाई आहे. त्यासाठी दंडात्मक तरतूद आहे. परंतु शहरात सर्रासपणे पातळ प्लास्टीक वापरले जात आहे. आरोग्य विभागाकडून अधूनमधून छापे टाकले जात असले तरी ती कारवाई अत्यंत मर्यादित व तात्पुरती ठरते. त्यामुळे बाजारपेठांमध्ये पुन्हा प्लास्टीकचा वापर सुरू होतो.

### नागरिकांचीही उदासीनता

प्लास्टीक बंदीबाबत शासनाने वारंवार जनजागृती केली असली तरी प्रत्यक्षात नागरिक या बंदीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. खरेदीसाठी बाजारात जाताना कोणीही कापडी पिशव्या किंवा पर्यायी बॅग बाळगत नाही. उलट विक्रेत्याकडून प्लास्टीकची पिशवी मिळाली नाही तर ग्राहक नाराजी व्यक्त करतात. या मानसिकतेमुळेच विक्रेतेही प्लास्टीकचा वापर बंद करण्यास धजावत नाहीत.

### या प्लास्टिकवर आहे पूर्ण बंदी

प्लास्टिकपासून बनवल्या जाणाऱ्या पिशव्या (हँडल असलेल्या, नसलेल्या) थर्माकॉल व प्लास्टिकपासून बनवण्यात येणाऱ्या एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोझेबल वस्तू. उदा. ताट, कप्स, प्लेटस, ग्लास, काटे, वाटी, चमचे, भांडे इत्यादी. हॉटेलमध्ये अन्नपदार्थ पॅकेजिंगसाठी वापरली जाणारी भांडी व वाट्या, स्ट्रॉ, नॉन वोवन, पॉलिप्रॉपीलेन बॅग्ज इत्यादी. द्रव्य पदार्थ साठवण्यासाठी वापरात येणारे प्लास्टिक पाऊच, कप. थर्माकोल व प्लास्टिकचा वापर सजावटीमध्ये करण्यास मनाई आहे.

### मुक्या जनावरांसाठी घातक

शहरातील रस्त्यांवर व कचराकुंड्यांमध्ये प्लास्टीक पिशव्या मोठ्या प्रमाणावर पडलेल्या दिसतात. रस्त्यावर फिरणारी मुकी जनावरे कचऱ्यातून अन्न शोधताना या पिशव्या गिळतात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टीकचा खच साठतो व जीव धोक्यात येतो. पशुवैद्यक तज्ज्ञांच्या मते, अनेक जनावरे अशा विषारी प्लास्टीकमुळे आजारी पडतात किंवा मृत्युमुखी पडतात. प्लास्टीक पिशव्यांचा सर्वाधिक मोठा दुष्परिणाम पर्यावरणावर होतो. या पिशव्या सहज नष्ट होत नाहीत, जमिनीत वर्षानुवर्षे पडून राहतात. त्यामुळे मातीतील सुपीकता कमी होते. पावसाळ्यात गटारी व नाल्यांमध्ये प्लास्टीक साचल्याने पाणी वाहून जाण्यात अडथळे निर्माण होतात व शहरात पाणी तुंबण्याचे चित्र दिसून येते.









(छायाचित्रे : सुमित देशमुख)

### पिशव्यांवर उल्लेख बंधनकारक

सरकारने ३ मार्च २००६ मध्ये राज्य शासन विघटनशील व अविघटनशील कचरा नियंत्रण अध्यादेश (२००६) अंतर्गत महाराष्ट्र कॅरी बॅग्ज (उत्पादन आणि वापर) नियम २००६ अशी अधिसूचना जारी केली. या अधिसूचनेमध्ये राज्याने प्लास्टिक पिशवी संदर्भातील केंद्राचे पूर्वीचे नियम तर घेतलेच पण पिशवीच्या जाडीची मर्यादा ५० मायक्रोनपेक्षा अधिक असणे बंधनकारक आहे. एवढेच नव्हे तर केंद्राच्याही पुढे जात राज्य सरकारने प्रत्येक पिशवीवर भारतीय मानक संस्थेने त्या उत्पादन प्रक्रियेला दिलेले चिन्ह, उत्पादकाचा पत्ता, पिशवीची जाडी, उत्पादन पद्धती (पुनर्वापर केलेल्या की मूळ कच्च्या मालापासून) इत्यादी बाबी नोंदवणे बंधनकारक आहे. मात्र जळगाव शहरात अशा बाबी कुठेही प्लास्टीक पिशव्यांवर नोंदविलेल्या दिसून येत नाही.



### महापालिकेची मोहीम ठरते केवळ 'फार्स'

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्लास्टीक पिशव्या बाळगणाऱ्यांवर कारवाईची मोहीम राबविली जाते. भाजीविक्रेते, फळ विक्रेते, व्यापारी संकुलांमध्ये कारवाई केली जाते. त्यांचेकडून मालही जप्त केला जातो. काही व्यावसायिकांना किरकोळ स्वरूपाचा दंडही केला जातो. परंतु काही दिवसांनी बाजारात नव्याने प्लास्टीकच्या पिशव्या सहजतेने उपलब्ध होतात. त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाची ही मोहीम केवळ 'फार्स' ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्लास्टीक बंदी करण्यासाठी किरकोळ विक्रेत्यांसह पिशव्यांची विक्री करणाऱ्या डिलर्सवरच धडक कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच व्यावसायिकांनी ५० मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या पिशव्या वापरण्याची सक्ती महापालिका प्रशासनाकडून केली तरच शहरासह जिल्ह्यात प्लास्टीक बंदीची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी होईल.



प्लास्टीकमुळे माती व पाण्याचे प्रदूषण वाढले. जनावरांचे प्राण प्लास्टिक खाण्यात येत असल्यामुळे धोक्यात येत आहेत. नाल्यांत व नद्यांत अडथळे, पूरस्थितीची शक्यता निर्माण होते. प्लास्टिक जाळल्यामुळे हवा दूषित होऊन त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर असून जळगाव शहर व ग्रामीण भागात अस्वच्छता निर्माण होत आहे. प्लास्टीकला पर्याय म्हणून कापडी पिशव्या, प्लास्टिक वेगळा संकलन, जनजागृती व कठोर अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे.

**- सागर धनाड, पर्यावरणतज्ज्ञ.**

### प्लास्टिकला हा पर्याय आवश्यक

**कापडी पिशव्या-** कापसाच्या, ज्यूटच्या किंवा कॅनव्हास कापडाच्या पिशव्या हे प्लास्टिक पिशव्यांना सर्वोत्तम पर्याय आहेत. त्या धुण्यायोग्य, पुन्हा वापरता येणाऱ्या आणि टिकाऊ असतात. बाजारहाट, शाळा, ऑफिससाठी या पिशव्या वापरल्या जाऊ शकतात.

**कागदी उत्पादने-** कागदी पिशव्या या कप, प्लेट्स, स्ट्रॉ इत्यादी प्लास्टिकच्या वस्तुंना उत्तम पर्याय ठरतात. कागद निसर्गामध्ये लवकर विघटित होतो आणि तो पुनर्वापरास सुलभ असतो.

**बांबू व लाकडापासून बनवलेली उत्पादने-** बांबूपासून बनवलेले टूथब्रश, पेन, भांडी, स्ट्रॉ, फोन स्टँड्स यासारख्या वस्तू प्लास्टिकच्या वस्तूंच्या जागी वापरता येतात. बांबू नैसर्गिक, टिकाऊ आणि सेंद्रिय असल्यामुळे त्याचा वापर पर्यावरणपूरक आहे.

**बायोडिग्रेडेबल प्लास्टिक-** शोध आणि विकासामुळे आता बायोडिग्रेडेबल किंवा कम्पोस्टेबल प्लास्टिकसुद्धा उपलब्ध झाले आहे. हे प्लास्टिक जैविक पद्धतीने विघटित होते आणि पर्यावरणावर कमी भार टाकते.



प्लास्टीक बंदी हा विषय सामाजिक आहे. त्यामुळे प्लास्टीकला पर्याय म्हणून कापडी किंवा इतर बायो पदार्थांपासून तयार होणाऱ्या साहित्याचा वापर वाढला पाहिजे. महापालिका प्रशासन प्लास्टीक विरोधात कारवाई नेहमीच करत असते. परंतु लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. तरी शहरात जिथे कुठे प्लास्टीक कॅरीबॅग्ज असतील त्यांच्या विरोधात कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली जाईल. तसेच नागरिकांमध्ये देखिल महापालिका प्रशासनाकडून प्लास्टीक बंदीबाबाबत जनजागृती केली जाईल.

**- ज्ञानेश्वर ढेरे, आयुक्त, जळगाव महापालिका.**

## थोडक्यात महत्त्वाचे....



### इनरव्हील क्लब न्यू जेनतर्फे विशेष प्रकल्प

**जळगाव** : इनरव्हील क्लब ऑफ जळगाव न्यू जेन आणि द लाइट हाउस किंडरगार्टनच्या शाळेच्या सहकार्याने 'आपल्या महान वीरांना सन्मानित करण्यासाठी' स्वातंत्र्यपूर्व दिन साजरा करण्यासाठी 'रॅम्प वॉक विथ फ्रीडम फायटर्स' या विशेष प्रकल्पांतर्गत कार्यक्रम झाला. बालवाडीतील मुलांना भगतसिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज, राणी लक्ष्मीबाई, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लालबहादूर शास्त्री आणि अनेक महान वीरांच्या पोशाखात सुंदर सजविण्यात आले होते. नंतर सर्वांना प्रमाणपत्रे देण्यात आली. क्लबच्या अध्यक्षा मुनिरा मास्टर, सचिव इशिता दोशी, क्लब संपादिका कश्मिरा जैन, लाइट हाउस किंडरगार्टनच्या प्राचार्या श्वेता सोनार, गायत्री सोनार, भाग्यश्री पाटील, नेहा हरवाणी, पूजा पंजाबी, देवयानी महाजन, कनक कवाना, रोशनी महाजन, महिमा परदेशी आदी शिक्षकांची उपस्थिती होती.



### शासकीय रुग्णालयात रक्षाबंधन उत्सव उत्साहात

**जळगाव** : शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे लोकसेवा मंडळातील रुग्णमित्र व स्वयंसेवक यांच्यातर्फे कर्मचाऱ्यांना गौरवण्यासाठी राख्या बांधून आपल्यातली नाती अधिक घट्ट होण्याच्या दृष्टीने रक्षाबंधन उत्सव साजरा करण्यात आला. उपक्रमात वैद्यकीय अधीष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, डॉ. धर्मेंद्र पाटील, डॉक्टर, परिचारिका, ब्रदर्स तसेच सर्व रुग्णांना राख्या बांधण्यात आल्या. कार्यक्रमास रुग्णमित्र उज्ज्वल चौधरी, गौरव बडगुजर, हरीश तेली, ॲड. स्वाती पाटिल डॉ. नीलिमा सेठिया, हितेश टेकवडे, दिनेश देसाई, कैलाश देवरे, डॉ.विकास पाटील, रत्नाकर चौधरी, राजू पालिवाल, मोहनलाल पालिवाल, ज्ञानेश्वर बारी, चंद्रकांत तायडे, यशवंत कापडणे, ईश्वर सूर्यवंशी, हेमंत गौड़, गणेश निंबाळकर, भूषण शिवदे, सुरेश सोनवणे व रुग्णमित्र उपस्थित होते.




### शहरात अमलीपदार्थ विरोधी जगजागृती रॅली

**जळगाव** : अमलीपदार्थ विरोधी भव्य जनजागृती रॅली जिल्हा पोलीस दलातर्फे शुक्रवारी (१५ ऑगस्ट) शहरात काढण्यात आली. या रॅलीस पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी हिरवा झेंडा दाखविला. याप्रसंगी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांच्यासह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी,अंमलदार उपस्थित होते. जी.एस.ग्राउंड येथून सुरुवात झालेल्या या रॅलीत गुरुवर्य परशुराम विठोबा विद्यामंदिर, योगेश भालेराव यांचे लेझीम पथक, चिन्मय नाझरकर यांचे शौर्यवीर ढोलपथक, पोलीस स्पोर्ट ॲकेडमीतील कराटे खेळाडु, एम.जे.कॉलेज, नूतन मराठा महाविद्यालय, नंदीनीबाई महाविद्यालय, ए.टी.झांबरे विद्यालय, पलोड इंग्लिश मीडियम स्कूल येथील एनसीसी, आरएसपी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. संग्राम जोशी व त्यांचे सहकारी यांनी पोवाडा सादर केला. समाजकार्य विभाग उमविमधील योगेश माळी व त्यांचे पथनाट्य संघ यांनी पथनाट्य प्रयोग सादर केला. रॅलीचा समारोप महात्मा गांधी उद्यानात झाला.

### शिक्षक प्रवीण पाटील यांना पर्यावरण पुरस्कार प्रदान

**जळगाव** : सामाजिक वनीकरण वनवृत्त नासिक यांच्या तर्फ स्वातंत्र्य दिनानिमित्त २०२४-२५ या वर्षात सामाजिक वनीकरण जळगाव विभागात पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल खुबचंद सागरमल विद्यालय व पर्यावरण शिक्षक प्रवीण पाटील यांना प्रशस्तिपत्र देऊन सहाय्यक वनसंरक्षक एस. के. शिसव यांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी वनक्षेत्रपाल एस. एम. सोनवणे, अमोल ढोबळे व इतर कर्मचारी उपस्थीत होते. या यशाबद्दल त्यांचे आमदार अमोल पाटील, निवृत्त वनअधिकारी एस. आर. पाटील, डॉ. सुदर्शन पाटील, डॉ. नितिन विसपुते, डॉ. रितेश पाटील, प्रा. लेफ्टनंट शिवराज पाटील, अक्षय सोनवणे, उपशिक्षणाधिकारी फिरोज पठाण, प्रशासन अधिकारी खलिल शेख, विस्तार अधिकारी विजय पवार, मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे, पर्यवेक्षक सुरेश आदिवाल, लक्ष्मीकांत महाजन, योगेंद्र पवार यांनी स्वागत केले आहे.





### मनपातर्फे ज्ञानेश्वर माऊलींच्या जयघोषात पालखी उत्सव

**जळगाव** : श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त प्रशासकीय इमारत महानगरपालिका येथून पालखीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरीक्त आयुक्त निर्मला गायकवाड, नगरसचिव सुनील गोराणे, भांडारपाल दिनानाथ भामरे यांच्यासह विभाग प्रमुख, शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. ही पालखी महानगरपालिका प्रशासकीय इमारत येथून काढण्यात येऊन श्री ज्ञानेश्वर मंदिर प्रतापनगर येथे सांगता करण्यात आली.

### 'भविष्यातील युद्धे-युद्ध पद्धती'वर उद्या व्याख्यान

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग, कला आणि मानवविद्या प्रशाळेतर्फे मंगळवारी (१९ ऑगस्ट) सकाळी १०.३० वा. 'भविष्यातील युद्धे आणि युद्ध पद्धती' या विषयावर व्याख्यान होणार आहे. विद्यार्थ्यांसह प्राध्यापकवर्ग व अभ्यासकांसाठी हा उपक्रम विशेष मार्गदर्शक ठरणार आहे. लेफ्टनंट जनरल विनोद जी. खंडारे (सेवानिवृत्त) प्रमुख वक्ते असतील. कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी अध्यक्षस्थानी असतील. भारतीय लष्करातील दीर्घ सेवा, नेतृत्व आणि रणनीती क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीसाठी त्यांना अनेक सन्मान मिळाले आहेत. त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेत वरिष्ठ लष्करी सल्लागार म्हणून काम केले असून, संरक्षण धोरण, सायबर युद्ध, तांत्रिक नवप्रयोग आणि आधुनिक युद्धतंत्र यावरील त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहेत. लेफ्टनंट जनरल खंडारे यांनी आपल्या कारकिर्दीत जम्मू-काश्मीर, लडाख, ईशान्य भारत आणि सीमेवरील तणावपूर्ण परिस्थितीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या व्याख्यानातून भविष्यातील युद्धांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, सायबर हल्ले, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि भारताच्या सुरक्षेची आव्हाने या बाबींचा ऊहापोह होणार आहे. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात होणाऱ्या या विशेष व्याख्यानासाठी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

# आधुनिक युगात भूगोलशास्त्राच्या प्राचीन अभ्यासाला महत्त्व

## कुलगुरू प्रा. माहेश्वरी : विद्यापीठात 'भारतातील प्राचीन भौगोलिक विचारधारा'चे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १७ ऑगस्ट**

भूगोलशास्त्राच्या प्राचीन अभ्यासाला आता महत्त्व प्राप्त झाले असून, आजच्या आधुनिक व संगणकाच्या युगात जगातील ज्ञान एका खोलीत बसूनही प्राप्त होऊ शकते. भूगोलाच्या मानवी भूगोलातील असंख्य शाखांपैकी 'भौगोलिक विचारधारा' हा विषय अध्ययनाच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आहेच. मात्र, भौगोलिक विचारधारा अभ्यासल्याने भौगोलिक घटकांच्या अध्ययनाचे महत्त्व विशद होऊन अभ्यासकाचा भूगोलशास्त्र विषयासंबंधीचा दृष्टिकोन सकारात्मक होण्यास मदत होते, असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी केले.



चोपडा येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयाचे पदव्युत्तर व संशोधन भूगोलशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. शैलेशकुमार वाघ व कुसुंबा (ता. जि. धुळे) येथील श्रीमती एन. एन. सी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे भूगोलशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सिद्धार्थ सोनवणे यांच्या 'भारतातील प्राचीन भौगोलिक विचारधारा' या अथर्व पब्लिकेशन्स प्रकाशित पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी (१४ ऑगस्ट) विद्यापीठात झाले.

याप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, अमोल पाटील, अधिसभा सदस्य ऋषिकेश चित्तम, प्रा. कांचन महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, अथर्व पब्लिकेशन्सचे संपादक व प्रकाशक युवराज माळी उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत द्वितीय वर्ष कला शाखेसाठी विशेष भूगोल विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय ज्ञान परंपरांतर्गत 'भारतातील प्राचीन भौगोलिक विचारधारा' या विषयाचा अभ्यासक्रम महाराष्ट्रभर लागू करण्यात आला आहे. या विषयाच्या अध्ययनातून प्राचीन भारतीय भौगोलिक तत्त्वज्ञान, प्राचीन भारतीय विद्वानांच्या भौगोलिक विचारधारा, विश्व, विश्वविज्ञान भूगोल, कालचक्र, पृथ्वीची रचना, जगाचा भूगोल, जगातील पवित्र भूदृश्ये, प्राचीन भारतीयांचा पर्यावरणीय दृष्टिकोन, प्राचीन व्यापार, उद्योग, व्यापारी मार्ग, वाहतूक, प्राचीन अर्थव्यवस्था यांसारखे दृष्टिकोन तसेच प्राचीन काळातील भारतातील नगर नियोजन व वस्त्यांचे प्रारूप आदींसारख्या प्राचीन भौगोलिक दृष्टिकोनांची माहिती प्राप्त होऊन प्राचीन भारतीय ज्ञान, तत्त्वज्ञान, विद्वान, साहित्य, वेद, पुराण, उपनिषदे, रामायण, महाभारत व तत्सम पौराणिक ग्रंथ व महाकाव्ये यांची प्रचीती व महत्त्व यांची या पुस्तकातून मांडणी प्रा. डॉ. सोनवणे व प्रा. डॉ. वाघ यांनी केली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्र-कुलगुरू प्रा. इंगळे, राजेंद्र नन्नवरे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, अमोल पाटील यांनी हे पुस्तक राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र या अभ्यासक्रमानुसार व इतर विद्यापीठांच्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित असून, एमपीएससी, नेट-सेट व इतर स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त असल्याचे नमूद केले. लेखक प्रा. डॉ. सोनवणे व प्रा. डॉ. वाघ यांनी, 'भारतातील प्राचीन भौगोलिक विचारधारा' हे आमचे ५० वे पुस्तक असून, ते विद्यार्थी, अभ्यासकांसह संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल, असे सांगितले. प्रा. डॉ. मुकेश पाटील यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. युवराज माळी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. अनिल सूर्यवंशी, प्रा. दीपक सोमाणी, डॉ. मुकेश पाटील यांनी सहकार्य केले.

# शहरात स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

**जळगाव : शहरात ७९ व्या स्वातंत्र्यदिन देशभक्तीपर आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यालय, संस्था महाविद्यालयातर्फे विविध देशभक्तीपर आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

### डॉ. अविनाश आचार्य विद्यालय

विवेकानंद प्रतिष्ठान संचलित डॉ. अविनाश आचार्य विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विवेकानंद प्रतिष्ठान व्यवस्थापन मंडळ सदस्या कविता दीक्षित यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका डॉ. रत्नमाला पाटील, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कल्पना बावस्कर, प्रशासकीय अधिकारी दिनेश ठाकरे यांची उपस्थिती होती. संगीत शिक्षिका रंजना बाभुळके, तुषार पुराणिक व विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत व झेंडा गीत सादर केले. सूत्रसंचालन सिद्धी काळकर व प्रांजल पिंपळे या विद्यार्थीनीनी केले. प्रमोद इसे व पूजा साळवी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### महाराणा प्रताप विद्यालय

महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, प्रेमनगर, जळगाव या विद्यालयाचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विश्वस्त सुरेश लोढा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीताने तिरंगा झेंड्यास सलामी देण्यात आली. यावेळी विद्यालयाचे शालेय समिती सदस्य डी.एस. पाटील, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मन्सुर पटेल, सुनंदा लोढा, मुख्याध्यापक संजय चौधरी पर्यवेक्षक सी.एस. चौधरी, कनिष्ठ विभाग प्रमुख संजय पाटील उपस्थित होते.

## देशभक्तिपर कार्यक्रमांनी रंगला स्वातंत्र्य दिनाचा उत्सव

### डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात ध्वजारोहण

**जळगाव** : डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त महाविद्यालयातर्फे विविध देशभक्तीपर आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाचा उत्साह संचारला होता. यावेळी संस्थेचे चेअरमन माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सुरूवातीला सकाळी ७.३५ वा. संस्थेचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, हृदयविकार तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, फिजीओथेरेपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागूलकर, होमीओपॅथी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. मिश्रा, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य हर्षल बोरोले, नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या विशाखा गणवीर, डॉ. केतकी पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य शिवानंद बिरादर, सीईओ विजय बाविस्कर, रेक्टर सुरेंद्र गावंडे, अर्चना भिरूड, ज्योत्स्ना भिरूड आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्याला वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, डॉक्टर, रूग्णालयातील सर्व विभागप्रमुख आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या रक्तपेढीतर्फे रक्तदानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. ८० पिशव्यांचे रक्त संकलित केले. यशस्वीतेसाठी रक्तपेढीचे समन्वयक लक्ष्मण पाटील यांनी परिश्रम घेतले.

### शानभाग विद्यालय

कै.ब.गो.शानभाग, सावखेडा येथे ७९ वा भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कारगिल युद्धात सहभागी असलेले शहीद स्व. राकेश शिंदे यांच्या माता अनुसयाबाई शिंदे आणि बंधू सरपंच सुरेश शिंदे, शालेय समिती अध्यक्ष विनोद पाटील, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाटील आणि गुरुकुल विभागप्रमुख शशिकांत पाटील यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते भारतमाता प्रतिमा पूजन आणि ध्वजपूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. गीतासाठी साथसंगत भूषण गुरव, उमेश सूर्यवंशी, दर्शन गुजराती यांच्यासोबत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिली. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यालयाच्या विद्यार्थिनी सुरभी कासार आणि पुष्कर पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय कविता कुरकुरे यांनी केला. आभार तेजस्वी बाविस्कर यांनी मानले.

### काशिनाथ पलोड शाळा

काशिनाथ पलोड पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एमआयडीसी पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल मुकुंद पाटील हे उपस्थित होते. तसेच मयूर चौधरी, विवेकानंद प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा हेमाताई अमळकर, माजी विद्यार्थी व शालेय समिती सदस्य सरल चोपडा, मुख्याध्यापक प्रवीण सोनावणे, समन्वयिका स्वाती अहिरराव, अनघा, सागडे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे महत्त्व पियुष कराड, पूर्वजा पाटील, प्रथमेश चव्हाण, व क्रितिका पवार या विद्यार्थ्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रमुख मोनाली पाटील, जयेश देशमुख, शिल्पा मांडे, रूपाली निकम, कंचन सरोदे होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली पाटील व पाहुण्यांच्या परिचय पूनम पाटील यांनी केला. मुख्याध्यापक प्रवीण सोनावणे व समन्वयिका स्वाती अहिरराव, अनघा सागडे यांचे मार्गदर्शन लाभले.






### विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम स्कूल

विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विलास बारी हे उपस्थित होते. स्कूल कमिटी मेंबर प्रांजल रस्से यादेखील कार्यक्रमाला उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमा पूजनाने व तिरंगा ध्वज फडकवत राष्ट्रगीताने झाली. सूत्रसंचालन सुनीता तडवी व आभार सविता चौधरी यांनी मानले. यावेळी योगिता शिंपी, सविता कुलकर्णी, संतोष चौधरी हेमराज पाटील, किशोर पाठक यांचे मार्गदर्शन लाभले.

### क.ब.चौ.उ.म.वि.

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिन व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३५ वा वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न झाला. नंतर 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात तिरंगा रॅलीसह मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. म. सु. पगारे, प्रा. पवित्रा पाटील, डॉ. योगेश पाटील, रवींद्र पाटील, डॉ. सचिन नांद्रे यांच्यासह सदस्य, विद्यापीठ प्रशाळा, विभागाचे संचालक, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. नशामुक्तीची शपथ सुभाष पवार यांनी उपस्थितांना दिली.



### सुभद्रा लक्ष्मण चौधरी विद्यालय

समर्पण संस्थेच्या श्रीमती सुभद्रा लक्ष्मण चौधरी विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात अखंड भारत मातेच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

याप्रसंगी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे झोनल ऑर्गनायझेशनचे सेक्रेटरी गितेश चव्हाण आणि सिद्धेश्वर लटपाटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत संस्थेचे कार्यकारी संचालक राजेंद्र नन्नवरे, सावित्री सोळुंके वर्धमान भंडारी, प्रकाश सोनवणे, अनिल भोळे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका चेतना नन्नवरे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या सान्वी देवरे आणि वेदांत देशपांडे यांनी केले.



### बी.यू.एन. रायसोनी स्कूल

बी.यू.एन. रायसोनी स्कूल ( पॅटर्न) येथे ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता ५ वीतील तेजस्वीनी बेदरकर हिने शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल तिला ध्वजारोहण करण्याचा मान देण्यात आला.

शाळेतर्फे विजयी विद्यार्थ्यांना पालक शिक्षक संघाच्या सदस्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेचे अध्यक्ष शिरीष रायसोनी व उपाध्यक्ष उमेद रायसोनी, मुख्याध्यापक मनोज शिरोळे व पालक-शिक्षक संघाचे सदस्य उपस्थित होते.






### बहिणाबाई प्राथमिक अन् माध्यमिक विद्यालय

बहिणाबाई ज्ञान विकास संस्था संचलित प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात देशाचा ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी रॉयलचे अध्यक्ष जितु भोजवाणी यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनाचे ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग काळे, ज्ञानदेव काळे, गिरिष शिंदे, भावेश शहा, पिंकी मंधान, विद्यालयाच्या समन्वयक प्रतिभा खडके, विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे, प्राथमिकचे मुख्याध्यापक राम महाजन उपस्थित होते. प्रास्ताविक पी.पी. चौधरी यांनी केले. आभार आर. एस. वाणी यांनी मानले. यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक संतोष पाटील, विशाल पाटील, दिनेश चौधरी, चंद्रकांत पाटील, शंकर चव्हाण, अजय कुंवर, संतोष सोनार, दुर्गादास कोल्हे, जगदीश नेहते, महेंद्र पाटील, डॉ. प्रतिभा राणे, स्वाती कोल्हे, सीमा चौधरी, भाग्यश्री फिरके, शरिफा तडवी, पूनम तडवी, खुशी तडवी यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### खडकी शासकीय आश्रमशाळेतर्फे 'हर घर तिरंगा' रॅली

**नंदुरबार :** श्रावणी केंद्रातील खडकी येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतर्फे आजादी का अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात शाळेच्या प्रांगणातून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी हाती तिरंगा घेऊन देशभक्तिपर घोषणाबाजी करत गावातील मुख्य मार्गावरून रॅली काढली. याप्रसंगी मुख्याध्यापक शशिकांत वसावे, अधीक्षक अरविंद पवार, महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपाल गावित, शिक्षक एस. आर. पाटील, मनीषा कोकणी, सावित्री गावित, चारुशीला मोहिते, परिचारिका आशा गावित, सोमवेल वळवी, मनुवेल वळवी, सोनिक गावित, शत्रुघ्न कोकणी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.



### अर्थे येथे स्वातंत्र्य दिनी माजी सैनिकांचा गौरव

**शिरपूर :** स्वातंत्र्य दिनानिमित्त झुआरी पारदीप फॉस्फेट, जय किसान कंपनीकडून अर्थे (शिरपूर) गावात माजी सैनिकांसह आदर्श शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. किरण गुजराथी अध्यक्षस्थानी होते. सरपंच मनोहर पाटील, श्री कृषी विकास केंद्राचे संचालक राजेंद्र भंडारी यांची प्रमुख उपस्थिती होती. राजेंद्र भंडारी यांनी माजी सैनिकांचा सत्कार केला. आर्मीतील निवृत्त जवान संदीप पाटील, गजेंद्र दोरीक, बापू भिल यांच्यासह आदर्श शेतकरी डॉ. किरण गुजराथी, श्री. बी. महाजन, विलास पाटील यांचा गौरव करण्यात आला. राजेंद्र भंडारी यांनी माती परीक्षणाबद्दल माहिती दिली. पारादीप फॉस्फेटचे मार्केटिंग मॅनेजर किरण राठोड यांनी जवानांचा व किसानांचा सत्कार केला. त्यांनी शेतीच्या समस्यांचे निराकरण केले. जय किसान कृषी सल्लागार जगदीश लोहार यांनी सूत्रसंचालन केले.



### बेटावदमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**बेटावद (शिंदखेडा) :** विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनानिमित्त येथील शाखेतर्फे गावातील आदिवासीबहुल जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना ताट, ताटली, वाटी व ग्लास यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता होऊन स्वच्छता व आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे. उद्यमशील शिक्षिका संगीता मराठे अध्यक्षस्थानी होत्या. या वेळी शिक्षक पंढरीनाथ पवार, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री योगेश बाविस्कर, शाखाध्यक्ष मनोज कोष्टी, संघाचे कार्यकर्ते दिनेश माळी, ग्रामपंचायतीचे सदस्य महेंद्र माळी, तसेच तुषार कोळी आदी उपस्थित होते. मान्यवरांनी मनोगतात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास वाढतो तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील शैक्षणिक व सामाजिक उन्नतीस हातभार लागतो, असे सांगितले.




### धुळे स्कूल ऑफ फार्मसीत राष्ट्रीय ग्रंथपाल दिन

**धुळे :** येथील एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंटमध्ये ग्रंथालय विज्ञानाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. एसपीटीएमचे डीन डॉ. समीर गोयल अध्यक्षस्थानी होते. त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे शैक्षणिक जीवनातील महत्त्व व ग्रंथपालांचा ज्ञाननिर्मितीतला मोलाचा वाटा याबाबत मार्गदर्शन केले. यानिमित्त ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले. निबंधलेखन स्पर्धेतील सुप्रिया शांताराम पाटील (प्रथम), मेघा घनश्याम पाटील (द्वितीय), कोमल प्रभाकर पाटील (तृतीय), जान्हवी योगेश शिंपी, निकिता प्रविण पवार, प्राजक्ता महेंद्र चव्हाण व प्रश्नमंजुषा स्पर्धेमधील गिरीश बच्छाव (प्रथम), संकेत गजानन थोसार (द्वितीय), वैष्णवी पाटील (तृतीय) यांना पदक, पुस्तके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सहाय्यक ग्रंथपाल सचिन पाटील व नायसी सनल यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमाला डॉ. किरण पाटील, डॉ. गिरीजा भवर, डॉ. योगिता गोयल, डॉ. कार्तिक नखाते, डॉ. अमित गंगवाल, डॉ. किरण आहेर, डॉ. मनोज जोगराणा आदी उपस्थित होते.

### के. डी. गावित आश्रमशाळेत स्वातंत्र्य दिन




**नंदुरबार :** तालुक्यातील पावला येथील के. डी. गावित अनुदानित आश्रमशाळेत स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राजश्री गावित यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. देशभक्तिपर भाषण आणि नृत्याने शाळेचे वातावरण देशभक्तिपर घोषणांनी दुमदुमन गेले. गावातून शोभायात्रा काढत देशभक्तिपर घोषणा देत पर्यावरणपूरक जनजागृतीही करण्यात आली. पिरॅमिड मानवी मनोरा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला. कार्यक्रमाला सरपंच, पोलिसपाटील, ग्रामसेवक व पालक, तसेच मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. केतन गिते यांनी सूत्रसंचालन केले. नीलेश पाटील यांनी आभार मानले.

### पाटील महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा

**नंदुरबार :** येथील जी. टी. पाटील महाविद्यालयात नंदुरबार तालुका विधायक समितीचे माजी चेअरमन (स्व.) दादासाहेब बटेसिंह रघुवंशी यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यात २३ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचा विषय १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिवस असा होता. यात प्रथम निकिता महेंद्र पाटील, द्वितीय सावित्री मुन्ना पवारा, तृतीय खुशी रामसिंग यादव, तर उत्तेजनार्थ क्रमांक नूतन समाधान पाटील व रोहिणी सुरेश ठाकरे यांनी पटकाविला. स्पर्धा प्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या वेळी संस्थेचे समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. रघुवंशी, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. डी. चौधरी, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जी. वसावे, फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या वैशाली शेवाळे, नरसिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण ठोंबरे, यशवंत विद्यालयाचे प्राचार्य पुष्पेंद्र रघुवंशी व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, मुख्याध्यापक सुनील पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी परीक्षणाचे कार्य केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा. डी. आर. महाजन, डॉ. मंजुषा महाजन, प्रा. एस. आर. पाटील, प्रा. ममता पाटील, प्रा. किंजल दवे, प्रा. मीना पाटील, प्रा. स्नेहल शर्मा यांनी सहकार्य केले.

# बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाकडून कानाडोळा

## आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू, दोन जण गंभीर जखमी



गतवर्षभरात वनविभागाकडून लावण्यात आलेल्या सापळ्यांमध्ये तब्बल १४ बिबटे तर गुजरात राज्य हद्दीत दोन ठिकाणी लावलेल्या सापळ्यात २ असे १६ बिबट्यांना अडकवून सुरक्षित अधिवासात सोडण्यात आले आहे.


**मनोज माळी**
**तळोदा, १७ ऑगस्ट**

सातपुडा पर्वतराजीच्या पायथ्यालगतच्या तालुक्यात बिबट हिंस्त्र वन्यप्राण्यांचा मुक्त संचार गेल्या वर्षभरापासून सुरू आहे. यात आतापर्यंत वर्ष-दीड वर्षात तब्बल आठ नागरिकांचा बळी गेला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या हिंस्त्र वन्यप्राणी बिबट्याला ड्रोन, ट्रॅप कॅमेरे वा सापळे लावून जेरबंद करण्यात वनविभागाकडून कानाडोळा केला जात असून परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बिबट्या मुक्त संचारात पायबंद घालण्यासाठी ठोस उपाययोजनांची अंमलबजावणी करावी अशी मागणी केली जात आहे.

तळोदा तालुक्यात वनविभागांतर्गत तळोदा, बोरद, सोमावल आणि प्रतापपूर असे चार मंडळ आहेत. या चारही मंडळ परिसरात बिबट्याच्या मुक्तसंचार असल्याच्या तक्रारी शेतकरी, शेतमजूर, नागरिकांकडून वारंवार केल्या जात आहेत. परंतु, वनविभाग अधिकाऱ्यांकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. गत सप्ताहात शुक्रवार ९ ऑगस्ट रोजी काजीपूर-तलावडी शिवारातील शिरीष माळी यांच्या शेतात रखवालीचे काम करणाऱ्या ६५ वर्षीय भावीबाई सांगल्या वळवी हि महिला तळोदा कोठार या वर्दळीच्या रस्त्याने बाजारासाठी जात होती. दरम्यान, रस्त्यालगतच्या काटेरी झुडुपांमध्ये दबा धरून बसलेल्या बिबट्याने भावीबाई वळवी यांच्या पायावर झडप घातली. बिबट्याच्या अचानक हल्ल्याने घाबरून आरडाओरड केल्याने तेथून जात असलेल्या दुचाकीस्वारांनी धाव घेतली. यामुळे भावीबाई थोडक्यात बचावली असली तरी तीच्या पायावर गंभीर दुखापतीमुळे जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

सद्यस्थितीत शेतशिवारातील पिकांची वाढ म्हणावी तशी झालेली नसली तरी आगामी काळात या पिकांमधून होणारा बिबटचा संचार पहाता वन विभागाकडून परिसरात नियमित गस्त वाढविण्यात यावी. बिबट्याच्या बंदोबस्तासाठी ड्रोन व ट्रॅप कॅमेरे, शोध पथकासह सापळे लावून बिबट्या मुक्त संचारावर नियंत्रण मिळवणे साध्य होऊ शकते.

वन्य प्राण्याच्या हल्ल्यात आतापर्यंत ८ जणांनी जीव गमावला असून २ जण गंभीर जखमी झाले आहेत. वनविभाग अधिकाऱ्यांनी राजकिय पदाधिकाऱ्यांप्रमाणे केवळ पाहणी करून आश्वासने न देता मनुष्य जीवितहानीची वाट न पहाता बिबट्याच्या मुक्त संचाराच्या परिसरात पिंजरे लावून ठोस उपाययोजना करीत अंमलबजावणीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच वरिष्ठ



विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील सर्वसामान्य नागरीक वा माध्यम प्रतिनिधींशी संपर्क केल्यानुसार वनविभाग अधिकाऱ्यांना सकारात्मक प्रतिसाद देण्याविषयी सूचीत करण्याचे आवाहन केले जात आहे.

## मोलगी आश्रमशाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

**नंदुरबार :** पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ नंदुरबार संचलित मोलगी (ता. अक्कलकुवा) येथील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी माजी पोलिसपाटील रतनसिंग दौल्य वसावे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून दमादादा वसावे, रामसिंग वसावे, गुलाब वसावे, राजपूत डॉक्टर, सुपर टेलर, चंद्रसिंग वसावे, ब्रिजलाल पाडवी, सायसिंग वसावे, लालसिंग वसावे, पिंटीताई वसावे , प्राथमिक मुख्याध्यापिका ज्योती तडवी, माध्यमिक मुख्याध्यापक राहुल पाटील उपस्थित होते.

प्रथम गावातून विद्यार्थ्यांनी रॅली काढत 'हर घर तिरंगा, घर घर तिरंगा' याविषयी जनजागृती केली. माध्यमिक मुख्याध्यापक राहुल पाटील यांनी प्रास्ताविक केले. रतनसिंग वसावे यांनी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन केले. लोकमान्य टिळक पुण्यतिथी तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या गणित स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण विजेत्या विद्यार्थ्यांना करण्यात आले. यानंतर दर शनिवारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत घेण्यात येणाऱ्या कृती आराखडा उपक्रमातील स्पर्धा परीक्षांमधील शालेय स्तरावरील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य देऊन प्रोत्साहन देण्यात आले.

आश्रमशाळेतील वृषाली हेमंत शिंदे, प्राची मधुकर वसावे, रिया पाण्या पाडवी, कीर्तिशा सतपालसिंग पाडवी, प्रतीक इंद्रसिंग वसावे, शुभम मालसिंग वसावे, हिना भरत पाडवी, अर्चना वसावे, सेजल दारासिंग तडवी, प्रणाली विनायक वसावे, अवनी प्रकाश ढोले, सोनाक्षी जयसिंग पाडवी, श्रुती सीताराम वळवी, कुश विजय पवार, हर्ष राकेश जैन, ऋषभ किशोर जैन, शाफीन जावेद पिंजारी, विशाल ठाकरे, कलावती वसावे, गोविंद वळवी, दिव्या विजय पवार, कल्पना कालसिंग वसावे, कामिनी वसावे, दीक्षा अहिरे या विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर भाषण देत वातावरण देशभक्तिपर केले. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना 'देश रंगीला इंडियावाले', 'वो देश मेरे', 'वंदे मातरम्', 'प्यारी भारत माँ' 'ऐ वतन मेरे वतन' यांसारख्या देशभक्तिपर गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

यावेळी राजपूत डॉक्टर यांनी या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य बक्षीस म्हणून जाहीर केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक राहुल पाटील व मुख्याध्यापिका ज्योती तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री चौधरी, विलास मराठे, सचिन नाथजोगी, सुरेश गावित, निशा वळवी, उदय गावित, लोटन पावरा, प्रशांत खैरनार, संदीप पवार, नीता पावरा, बालाजी रसाळ, भरत नवेज, यशवंत वळवी, प्रताप वसावे, भय्या अहिरे आदींनी सहकार्य केले. राजश्री चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. निशा वळवी यांनी आभार मानले.



### तऱ्हाडीत शाळा-महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन

**शिरपूर :** येथील अण्णासाहेब साहेबराव सोमा पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनी संस्थेचे उपाध्यक्ष निंबा भामरे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. स्काउट ध्वजवंदन संस्थेचे खजिनदार पुंडलिक धनगर यांच्या हस्ते झाले.

संस्थेचे अध्यक्ष सुभाष भामरे, सचिव विजय भामरे, कार्याध्यक्ष सुधीर भामरे, संचालिका उषा भामरे व उज्ज्वला भामरे, संचालक प्रशांत भामरे, मुख्याध्यापक रावसाहेब चव्हाण व नितीन पाटील यांनी मानवंदना स्वीकारली. या वेळी माजी सरपंच सुदाम भलकार, उपसरपंच पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रमोद करंके, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालयात माजी सैनिक काशिनाथ गोसावी यांनी ध्वजवंदन झाले. या वेळी ग्रामविकास अधिकारी देविदास धाडे, अंगणवाडी सेविका तलाठी संतोष अहिरे व ग्रामस्थ उपस्थित होते. विविध कार्यकारी सेवा सोसायटीत संचालक दिलीप अहिरे यांनी ध्वजवंदन केले. या वेळी चेअरमन शशिकांत कदम, व्हाइस चेअरमन, संचालक व सचिव चंद्रकांत गुजर उपस्थित होते.



## आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नंदुरबारमध्ये शांतता समितीची बैठक

### पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती

**नंदुरबार :** आगामी गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद हे महत्त्वाचे सण शांततेत पार पडून जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शांतता समितीची बैठक घेण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बिरसा मुंडा सभागृहात बैठक घेण्यात आली. पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे अध्यक्षस्थानी होते. बैठकीत जिल्हाभरातील विविध ठिकाणांहून शांतता समितीचे १०० ते १५० सदस्य तसेच प्रतिष्ठित नागरिक व विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत विशेषतः आगामी सण-उत्सवांत गणेशोत्सव व ईद- ए- मिलादच्या अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीत पालकमंत्री ॲड. कोकाटे, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमदार आमश्या पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस, उपविभागीय दंडाधिकारी अंजली शर्मा, नंदुरबारचे उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन, शहाद्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ता पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, तसेच जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व इतर प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### के. आर. पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिनी कार्यक्रम



**नंदुरबार :** येथील श्री स्वामी समर्थ विद्यानिकेतन संचलित के. आर. पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी प्रिजा एस. यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजवंदन करण्यात आले. अनिता पाल, उज्ज्वला शिरसाठ, शाळेचे चेअरमन किशोरभाई वाणी, व्हाइस चेअरमन सिद्धार्थभाई वाणी, संचालक अशोकभाई शहा, उमाबेन वाणी, सचिव सचिनभाई शहा, प्राचार्या डॉ. छाया शर्मा आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ध्वजास मानवंदना दिली. विविध नृत्य, भाषण, नाटक, मलखांब, तसेच शिक्षकांनी गाणी सादर केली. प्रिजा एस., प्राचार्या डॉ. छाया शर्मा यांनी मनोगत व्यक्त केले. चेअरमन किशोरभाई वाणी यांनी मनोगत व्यक्त केल्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.



### होळनांथेतील सीबीएसई स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन

**शिरपूर :** होळनांथे येथील आर. सी. पटेल सीबीएसई स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन मुख्याध्यापिका भूमिका गर्ग यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत सदस्य व सरपंचांच्या उपस्थितीत झाला. मुख्याध्यापिका भूमिका गर्ग यांनी ध्वजवंदन केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रणिती सिसोदियाने स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व उलगडले. मागील वर्षी दहावीत गुणवंत ठरलेला ध्रुव जैन याचा सत्कार करून बक्षीस देण्यात आले. पूर्व-प्राथमिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने विविध क्रियाकलाप सादर केले. शिक्षिका छाया मिस्त्री यांनी राष्ट्रीय ध्वजाचे महत्त्व व त्यातील रंगांचे प्रतीक समजावून सांगितले. पल्लवी चौरशिया यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रितेश मिश्रा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### पटेल महाविद्यालयात आदिवासी गौरव दिन

**शिरपूर :** आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विश्व आदिवासी गौरव दिन साजरा करण्यात आला. उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एम. पाटील यांनी आदिवासी सांस्कृतिक ओळखीच्या जपणुकीबद्दल अभिमान व्यक्त केला. डॉ. आर. आर. वसावे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला डॉ. रजनीकांत सोनार, डॉ. पी. वाय. मगरे, डॉ. बी. डी. पाटील, डॉ. के. आर. पाटील, डॉ. रत्नेश्वर भावसार, कार्यालयीन अधीक्षक संजय मोरे, गणेश सोनार उपस्थित होते. डॉ. एस. एस. चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. बी. बचुटे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मगरे यांनी आभार मानले.



### सोनवल विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**शिरपूर :** सोनवल तर्फे बोरद येथे प्रेरणा शैक्षणिक व बहुद्देशीय विकास संस्था संचलित श्री किशोर सखाराम महाजन माध्यमिक विद्यालय व लिटल स्टार्स इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे प्रेरणा शिक्षण संस्थेचे किशोर महाजन यांच्या मार्गदर्शनात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

संस्थेचे ज्येष्ठ शिक्षक संजय बच्छाव अध्यक्षस्थानी होते. माजी सरपंच सखाराम अण्णा, संभा बापू, मुख्याध्यापिका शिवदे, ग्रामसेविका कुंवर, पोलिसपाटील गोरख मोरे प्रमुख अतिथी होते. संजय बच्छाव यांनी ध्वजपूजन करून ध्वजवंदन केले. प्रवीण भामरे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक सुधीर सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. माजी मुख्याध्यापक अनंत महिरे यांनी गावाचा शैक्षणिक विकास व शाळेचा विकास व्यक्त केला. नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर नृत्य सादर केले. याप्रसंगी हेमंत महाजन, गौतम महिरे, हेमंत पवार, सूर्यकांत भामरे, हर्षल सोनवणे, लिपिक प्रमिला माळी, दिनेश पाटील, सतीश वाडिले व आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये अवयवदान जनजागृती

**नंदुरबार :** 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत ९ ते १५ ऑगस्टदरम्यान डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये अवयवदान जनजागृती, तिरंगा राखी स्पर्धा व चित्रकला प्रदर्शन आदी कार्यक्रम झाले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनय सोनवणे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नरेश पाडवी, डॉ. प्रियंका ढिवरे, डॉ. मनोहर ढिवरे, मुख्याध्यापिका सीमा मोडक, पर्यवेक्षक मिलिंद चव्हाण, संजय चौरे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. डॉ. नरेश पाडवी मनोगत व्यक्त केले. डॉ. मनोहर ढिवरे यांनी अवयवदान जनजागृती प्रतिज्ञा घेतली. पाचवी व सहावीसाठी घेण्यात आलेल्या तिरंगा राखी बनविणे स्पर्धेत प्रथम भाग्यश्री राजेंद्र कोळी, द्वितीय हेतल जयेश भंडारी, तृतीय काव्या गोविंदा शिंदे, चौथी स्वराली अनिल पाटील, उत्तेजनार्थ नताशा चंदनसिंग परदेशी, तसेच सातवी व आठवीसाठी घेण्यात आलेल्या तिरंगा आधारित चित्रकला स्पर्धेत प्रथम खुशी राजमल ठाकरे, द्वितीय रिद्धी घनश्याम बेडसे, तृतीय पायल भरत सूर्यवंशी, चौथी वृषाली अमर गावित, तर विद्या मच्छिंद्रनाथ कोकणी उत्तेजनार्थ ठरली. यशस्वी विद्यार्थिनींना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण चंद्रशेखर चौधरी यांनी केले. हेमंत बोरसे यांनी सूत्रसंचालन केले. सीमा गावित यांनी यादी वाचन केले. मुख्याध्यापिका सीमा मोडक यांनी आभार मानले.

## पटेल शैक्षणिक संकुलात ध्वजवंदन



**शिरपूर :** शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलाच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनी ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे पदाधिकारी, मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी, पालक या सर्वांनी भारतीय तिरंग्यास सलामी दिली. याप्रसंगी आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, गोपाल भंडारी, संचालक अतुल भंडारी, संचालक विजय भंडारी, डॉ. उमेश शर्मा, पी. व्ही. पाटील, प्राचार्या डॉ. शारदा शितोळे, प्राचार्य प्रदीप साळुंखे, प्राचार्य एस. ए. कुरेशी, मुख्याध्यापक प्रदीप गहिवरे, मुख्याध्यापक मनोज पाटील, पर्यवेक्षक एस. जे. पाटील, पर्यवेक्षक एस. एन. पाटील आदी उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून (स्व.) रसिकलाल चुनीलाल पटेल ऊर्फ पप्पाजी पारितोषिक वितरण सोहळा झाला. मनोज पाटील, संजय शिंपी, सीमा जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

## हस्ती ग्रुप ऑफ स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**दोंडाईचा (शिंदखेडा) :** हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती ग्रुप ऑफ स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी हस्ती कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी रितेश चौधरी यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

याप्रसंगी सीए राजन जैन, डॉ. कल्पना जैन (दिल्ली), हस्ती ग्रुप ऑफ स्कूलस्चे चेअरमन कैलास जैन, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक- शिक्षक संघ सदस्य आणि प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, प्राचार्य जीवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, शाळेच्या प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर, उपप्राचार्या रझिया दाऊदी, समन्वयक मनोज ठाकूर, समिना बोहरी, महेश डिगराळे, पूनम गुरुबाणी आदी उपस्थित होते.



ध्वजवंदनानंतर नॅशनल कॅडेट कॉर्प्स् छात्रसैनिकांनी संचलन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यानंतर कार्यक्रमांतर्गत हस्ती पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयातील पहिली ते बारावीच्या आणि हस्ती वर्ल्ड स्कूलच्या पहिली ते नववीच्या व हस्ती गुरुकुलच्या पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिन म्हणजे काय? विविधतेत एकता, माझा आवडता स्वातंत्र्यसैनिक, भारताची राष्ट्रीय चिन्हे, भारताचा तिरंगा आणि त्याचे महत्त्व, आजचा तरुण स्वातंत्र्य जपू शकतो? भारत पूर्वीचा आणि आताचा या विषयांवर अस्खलित मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांतून मनोगत व्यक्त करीत, कार्यक्रमात उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीतांचे समूह गायन आणि विद्यार्थिनींनी राष्ट्रभक्तीवर आधारित नृत्य व शास्त्रीय नृत्य सादरीकरण केले.

रितेश चौधरी यांनी शाळेने ध्वजवंदनाचा मान दिला, यासाठी शाळेप्रति आभार व्यक्त केले. शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांनी म्हटले की, देशभक्ती, राष्ट्रप्रेम ही भावना सदैव आपल्या मनात जोपासली पाहिजे. त्यात शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे प्रतिपादित केले.

विद्यार्थिनी यशश्री रगडे, अवनी शिजोले, रूपाली जैन, झैनफ बादशहा, झैनफ बोहरी, नूपुर भाई, अनुष्का नेरकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विजय खांडेकर, विजेंद्र भाई, मंगलसिंग राजपूत, सचिन कसबे, वंदना पाटील, प्रतिष्ठा परमार, राहुल भामरे, स्वप्नाली तिकुटे, आरती माळी, उदय नाईक, अरवा कटलरी, अमोल तांबे, पंकज जाधव यांनी व शाळेच्या एनसीसीची परेडविषयी तयारीकरीता नरेश सावंत व पुष्पा साळवे यांनी सहकार्य केले.



## अजंदे बुद्रुक येथे शालेय साहित्य वाटप

**बेटावद (शिंदखेडा) :** अजंदे बुद्रुक (ता. शिंदखेडा) येथे स्वातंत्र्य दिनी ध्वजवंदनानंतर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. पोलिसपाटील हेमलता योगेश चौधरी यांच्या संकल्पनेनुसार, त्यांच्या मानधन रकमेतील १० टक्के निधीतून उपक्रम राबविण्यात आला. ज्येष्ठ नागरिक भटूदादा सोनार अध्यक्षस्थानी होते. या वेळी सरपंच राजश्री हितेंद्र सोनार, उपसरपंच माधुरी मुकेश हरणे, पोलिसपाटील हेमलता योगेश चौधरी, माजी सरपंच ईश्वर परदेशी, शालेय समितीचे अध्यक्ष नीलेश परदेशी, सामाजिक कार्यकर्ते धनराज चौधरी, गोरख चौधरी व नंदकिशोर परदेशी आदी प्रमुख पाहुणे होते. उपक्रमासाठी मुख्याध्यापक रवींद्र माळी, शिक्षक महेंद्र पाटील, खंडेराय गुरुजी यांचे विशेष सहकार्य लाभले. युवकांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. अशा उपक्रमातून समाजातील प्रत्येक घटक शिक्षणाशी जोडला जाऊन विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यास हातभार लागेल, असा विश्वास ग्रामस्थानी व्यक्त केला.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### क्षत्रिय-खत्री समाजातर्फे धानपंचमी उत्सव साजरा

**धरणगाव :** येथील सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय-खत्री समाजामध्ये नुकताच धानपंचमी हा पारंपरिक सण हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सकाळी आई मछोदरी देवीला अभिषेक अॅड. गिरीश कट्यारे यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आला. सकाळी अकराला देवीची महाआरती करण्यात आली. महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. महाप्रसाद अॅड. सी. झेड. कट्यारे यांच्या सौजन्याने होता. सायंकाळी मिरवणुकीने धानाचे विसर्जन करण्यात आले. महिला सुवासिनींच्या डोक्यावर धानाच्या टोपल्या घेऊन मिरवणूक निघाली. या वेळी समाजाचे लेझीम पथक होते. यात युवक व युवतींनी लेझीम खेळण्याचा आनंद घेतला. याशिवाय महिलांनी फुगडी, पारंपरिक नृत्य केले. तलावात धानाचे आरती करून विसर्जन करण्यात आले. बळीराजाला भरपूर धान्य पिकू दे अशी प्रार्थना करण्यात आली. या वेळी राजेंद्र पडोळ, गणेश रावतोळे यांनी मनोगते व्यक्त केली. समाजाचे अध्यक्ष उदय सोळंके यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पुरुषोत्तम सुतारे, मनोज सुतारे, कृष्णा सोळंके आदींनी सहकार्य केले.




### पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

**एरंडोल :** येथील दादासाहेब दिगंबर शंकर पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. शियाली राममृत रंगनाथन यांची जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्ष अमित पाटील अध्यस्थानी होते. प्राचार्य डॉ. ए. जे. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. ए. बडगुजर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एन. बी. गायकवाड प्रमुख पाहुणे होते. याप्रसंगी ग्रंथपाल डॉ. शर्मिला व्ही. गाडगे यांनी प्रास्ताविकात डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जीवन परिचय व त्यांनी ग्रंथालयशास्त्रात केलेल्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी ज्येष्ठ प्रा. ए. टी. चिमकर, प्रा. व्ही. के. गाढे, डॉ. मीना काळे, डॉ. रेखा साळुंखे, प्रा. आर. एस. पाटील, प्रा. जे. व्ही. पाटील, प्रा. एम. बी. पाटील, प्रा. आर. पी. देशमुख, प्रा. व्ही. पी. महाजन, कुलसचिव एस. एस. बोरसे, प्राध्यापक व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सहाय्यक ग्रंथपाल नितीन पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी नितीन पाटील, छाया पवार, सतीश अहिरे यांनी सहकार्य केले.



### पाचोऱ्यात अवयवदान जनजागृतीपर पथनाट्य

**पाचोरा :** रोटरी क्लब पाचोरा-भडगाव आणि पाचोरा डॉक्टर्स असोसिएशन यांच्यातर्फे आणि (कै.) पी. के. शिंदे माध्यमिक विद्यालयाच्या इंटरॅक्ट क्लबच्या सहकार्याने जागतिक अवयवदान दिनानिमित्त राजे संभाजी महाराज चौकात जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. मुकेश तेली, सचिव डॉ. अजयसिंग परदेशी, डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. पवनसिंग पाटील, सचिव डॉ. मुकेश राठोर, अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हाध्यक्ष व प्रांत सचिव डॉ. अनिल देशमुख, नायब तहसीलदार निकम, रोटरी पदाधिकारी व सदस्य चंद्रकांत लोढाया, भरत सिनकर, नीलेश कोटेचा, संजय कोतकर, शिवाजी शिंदे, डॉ. राहुल काटकर, डॉ. अतुल पाटील, अरुणा उदावंत, ऋतुजा देशपांडे, चारू तेली, पिंकी जिनोदिया, चंद्रकांत पाटील, मनोज केसवानी, नितीन तायडे, ज्ञानेश्वर पाचोळे, संजय पाटील, शरद गिते, भागवत पाटील, मानव सालोमन आदी उपस्थित होते. विद्या कोतकर यांचे मार्गदर्शन लाभले. चंद्रकांत पाटील यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी ३ महिलांसमवेत ४ पुरुषांनी संपूर्ण अवयवदान, तर १० व्यक्तींनी आंशिक अवयवदानाचा संकल्प केला.



### धानोरा विद्यालयात पसायदानाचे सामूहिक पठण

**धानोरा (ता. चोपडा) :** श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त येथील झिपरू तोताराम महाजन माध्यमिक व नामदेवराव भाऊसिंग पाटील विद्यालयात विद्यार्थ्यांनी सामूहिक पसायदानाचे पठण केले. या वेळी प्रा. मिलिंद बडगुजर यांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत पसायदानाचा अर्थ स्पष्ट करून दिला. विद्यार्थ्यांनी संगीताच्या तालावर कवायत करून दाखविली. ज्येष्ठ नागरिक व विद्यालयातील प्रथम विद्यार्थी चिंतामण कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. विद्यालयाचे चेअरमन प्रदीप महाजन, शालेय समिती सदस्य बी. एस. महाजन, वामनराव महाजन, योगेश पाटील, प्राचार्य के. एन. जमादार, उपमुख्याध्यापक एस. पी. महाजन, पर्यवेक्षक एल. डी. पाटील, शिक्षक-पालक संघाच्या उपाध्यक्षा सनदीशा चौधरी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्रीडाशिक्षक डी. एच. महाजन, वासुदेव महाजन, शिक्षक, शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### जि. प. उर्दू शाळेत साहित्य, गणवेश वाटप

**पाचोरा :** पिंपळगाव हरेश्वर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत शैक्षणिक साहित्य, गणवेश वाटप व मार्गदर्शन कार्यक्रम नुकताच झाला. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मधुकर काटे अध्यक्षस्थानी होते. मुख्य अतिथी म्हणून माजी सरपंच शांतिलाल तेली, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तालिब कुतुबुद्दीन उपस्थित होते. तालिब शेख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शांतिलाल तेली, मधुकर काटे यांनी मनोगते व्यक्त केली. तालिब कुतबोद्दीन यांनी आभार मानले. मधुकर काटे यांचा लोकनायक पुरस्कार मिळाल्याने शालेय व्यवस्थापन समितीतर्फे सत्कार करण्यात आला. या वेळी सरपंच सुनंदा क्षीरसागर, शोभा तेली, हाफिज कुतबोद्दीन, हाफिज शाहीद, हाफिज जावेद, मौलाना रमजान, हाफिज रेहान, हाफिज जैद, जुबेर पिंजारी, रहिम बागवान, खलिल शेख, मोहसीन खान, अश्फाक बागवान, शकील खान, गुफरान शेख, जावेद शेख, इमरान शाह, तालिब काझी, हाफीज खान उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक अशपाक अन्सारी, अब्दुल मलिक, अबू उबैदा, तौकीर शेख, समरीन शेख, इरम शेख यांनी सहकार्य केले.

# धरणगाव तालुक्यात सतत 'मुसळ'धार!

## धरणी चौकातील पुरामुळे दुकानात पाणी शिरल्याने लाखोंचे नुकसान; घरांची पडझड






**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, १७ ऑगस्ट**

गेल्या अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले होते. पिकांना पावसाची गरज होती. आता दोन दिवसांपासून रात्री शहरासह तालुक्यात मुसळधार पाऊस होत आहे. पावसाचे रौद्र रूप तालुकावासियांनी अनुभवले. पावसामुळे पिकांना मोठा फटका बसला असून, शहरातील धरणी नाल्याला आलेल्या पुरामुळे घरांसह दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान झाले आहे. घरांचीही पडझडही झाली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी पावसाची वाट पाहत होते. १५ व १६ ऑगस्टला रात्री मुसळधार पावसाने हजेरी लावली. या वेळी पावसाचे रौद्र रूप पहावायास मिळाले. रात्री १० ते पहाटे ३ पर्यंत जोरदार पाऊस झाला. पावसामुळे तालुक्यातील शेतपिकांना मोठा फटका बसताना दिसत आहे. शहरातील धरणी नाल्याला पूर आलेला बघायला मिळाला. त्यामुळे शहरात पाणी शिरले. धरणी नाल्याच्या झालेल्या दैनावस्थेमुळे आजूबाजूच्या दुकानांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे अन्नधान्यासह सामानांचे मोठे नुकसान झाले. शहरात अनेक घरांची पडझड झाली. त्यात संसारोपयोगी साहित्यांचे नुकसान झाले. सकाळी सातच्या सुमारास शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते गुलाबराव वाघ, माजी नगराध्यक्ष नीलेश चौधरी, शहरप्रमुख भागवत चौधरी, सुरेश महाजन, व्यापारी सेनेचे दिनेश वाणी, रणजित पुरभे, गजानन माळी, राहुल रोकडे, आबा महाजन व व्यापाऱ्यांनी नुकसानग्रस्त घरांसह दुकानांची पाहणी केली. तत्काळ प्रांताधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्याशी संपर्क करून ताबडतोब पंचनामे करून या नुकसानग्रस्तांना भरपाई मिळावी, अशी मागणी केली. दरम्यान, तहसीलदार व मुख्याधिकारी यांनी ताबडतोब यंत्रणा पाठवतो व आम्ही येतो, असे सांगितले.

### पालिकेतर्फे पंचनामा करण्याचे काम सुरू

धरणगाव शहरात रात्री मुसळधार पाऊस झाला. याची तीव्रता इतकी होती की, शहरातून वाहणाऱ्या धरणी नाल्याला यामुळे मोठा पूर आला. यामुळे नाल्याकाठच्या घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले. याबाबत पालिकेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या आदेशाने आरोग्य निरीक्षक संतोष बिऱ्हाडे, रामकृष्ण महाजन, अण्णा महाजन यांनी नुकसान झालेल्या प्रत्येक घराची व दुकानाची पाहणी करून माहिती घेऊन पंचनामा केला व तो शासनापर्यंत पाठवून नुकसानभरपाईसाठी प्रयत्न करू, असे आश्वासन देण्यात आले.

### धरणी नाल्याच्या पुरामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान

**धरणगाव :** शहरातील धरणी नाल्याला पूर आल्यामुळे परिसरातील दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान झालेले आहे.



सकाळी नुकसानग्रस्त दुकानांची पाहणी नायब तहसीलदार लक्ष्मणराव सातपुते, महसूल कर्मचारी गणेश पवार, शहर तलाठी विनोद पाटील, तरवेज शेख यांच्यासह राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे भानुदास विसावे, शिवसेनेचे शहरप्रमुख, विलास महाजन, धीरेंद्र पुरभे उपस्थित होते. याप्रसंगी नुकसानग्रस्त व्यापारी, धान्य दुकानदार स्वप्नील येवले, दत्तात्रय वाणी, भालचंद्र येवले, किराणा दुकानदार, भिकन वाणी, हॉटेल व्यावसायिक नंदू मराठे, चहाचे दुकानदार विठोबा महाजन, सुदाम मराठे, पानटपरी व्यावसायिक रमेश चौधरी, बियाण्याचे दुकानदार योगेश सूर्यवंशी, राजू चौधरी, नाना चौधरी, संजय गुरव, प्रमोद बयस, दिलीपसिंह जनकवार, संजय गुप्ता, बापू महाजन, हिरालाल लोहार यांच्यासह व्यापारी उपस्थित होते.

# चोपड्यात दूध उत्पादक चेअरमन कार्यशाळा

## रोहित निकम यांचा गुणवत्तापूर्ण पशुखाद्यावर भर, विशेष योजनांची ग्वाही

**चोपडा :** जळगाव जिल्हा दूध उत्पादक संघ मर्यादित प्राथमिक दूध उत्पादक सहकारी संस्था चोपडा विभागाच्यावतीने चेअरमन कार्यशाळेचे आयोजन चोपड्यात उत्साहात करण्यात आले. तालुक्यातील विविध दूध उत्पादक संस्थांचे चेअरमन व सचिव यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पणन महासंघाचे उपाध्यक्ष तथा जळगाव जिल्हा दूध उत्पादक संघाचे संचालक रोहित निकम होते. यावेळी कार्यकारी संचालक शैलेश मोरखडे, तावसे चेअरमन विवेक पाटील, रामेश्वर संपुले, प्रल्हाद पाटील, रुंधाटीचे नितीन पवार, चहार्डीचे सतीश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भारत माता, गो माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्था चेअरमनमार्फत मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच २०२४-२५ मध्ये तालुक्यातून सर्वाधिक म्हैस, गाय दूध पुरवठा करणारी तसेच दूध शीतकरण केंद्र तथा विभागातून सर्वाधिक पशुखाद्य खरेदी करणारी प्रथम क्रमांकाची संस्था व चेअरमन यांचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

कार्यकारी संचालक शैलेश मोरखडे यांनी संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधत विविध अडचणी व त्यावर उपाययोजना यावर चर्चा केली. प्रस्तावना व्यवस्थापक जयेश पाटील यांनी केली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दिलीप पाटील यांनी केले. यशस्वीतेसाठी ईश्वकू पाटील, निकितेश निर्मळ, डॉ. विमलेश रॉय, गजानन ढाले, राजेंद्र वाघ, केशव पाटील, चोपडा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# अन् भोरटेक जि. प. शाळा अखेर बंद

## गटशिक्षणाधिकाऱ्यांचा निर्णय; तीन विद्यार्थिनींवर वर्षाला २५ लाख खर्च

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १७ ऑगस्ट**

पहिली ते चौथी एकही विद्यार्थी नसल्याने तालुक्यातील भोरटेक येथील जिल्हा परिषद शाळा बंद करण्याचा निर्णय गटशिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील यांनी घेतला आहे.

शाळेत मध्य प्रदेशातील तीन विद्यार्थिनी २०२२ पासून होत्या. त्यांच्या शिक्षणावर वर्षाला २५ लाख खर्च होत होता. आता त्याही स्थलांतरित झाल्या आहेत. भोरटेक येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत २०२२ पासून फक्त तीन विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. त्यादेखील भोरटेक येथील नव्हे; तर मध्य प्रदेशातील पावरा समाजाच्या होत्या. या विद्यार्थिनी पहिलीपासून चौथीला आल्यानंतर यावर्षी त्या मध्य प्रदेशात पालकांबरोबर स्थलांतर झाल्या आहेत.

गटशिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील, गटसमन्वयक रवींद्र पाटील आणि केंद्रप्रमुख दिलीप सोनवणे यांनी १६ ऑगस्टला या शाळेला भेट दिली असता, एकही विद्यार्थी आढळून आला नाही. मुख्याध्यापक बापू काशिनाथ चव्हाण व शालेय समितीसमक्ष पंचनामा केला. गावातील एकही विद्यार्थी गेल्या तीन वर्षांत पहिलीला दाखल नाही. तसेच गावात सर्वेक्षण केले असता, गावात ६ ते १४ वयोगटातील एकही बालक आढळून आला नाही. चौथीत शिकत असलेल्या तिन्ही मुली ४ ऑगस्टपासून कायमस्वरूपी मध्य प्रदेशात स्थलांतरित झाल्या असल्याचे आढळून आल्या. या शाळेत दरवर्षी २५ लाख रुपये खर्च होत होता. शासनाचा पैसा वाचवण्यासाठी शून्य पटसंख्या असलेली शाळा बंद करण्याचा निर्णय गटशिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील यांनी घेतला आहे.

या शाळेतील दोन शिक्षकांपैकी श्याम वाघ यांना ९ ऑगस्टलाच मारवड मुलांच्या जिल्हा परिषद शाळेत पाठवण्यात आले आहे, तर मुख्याध्यापक बापू चव्हाण यांना जैतपीर केंद्रात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शाळेच्या मालमत्तेचा पदभार जैतपीर केंद्राचे केंद्रप्रमुखांना देण्यात आला आहे. तसेच तिन्ही विद्यार्थिनींचे दाखले चिचपाणी-निपाणी (जि. बडवाणी, मध्य प्रदेश) येथील जिल्हा परिषद शाळेत रवाना करण्यात आले आहेत.



### गणपूर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साजरा

**चोपडा :** तालुक्यातील गणपूर येथे गेल्या अनेक पिढ्यांपासून दरवर्षी साजरा होणाऱ्या येथील श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा उत्साहात फटाके फोडून व पेढे वाटून श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साजरा करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांची परंपरा राहिलेल्या येथील महानुभाव उपदेशी बांधवांकडून दरवर्षी मोठ्या उत्साहात श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साजरा केला जातो. यावर्षीही तीन दिवस अगोदरच गावात सर्वत्र मंडप बांधून पताका व रोषणाई करून गल्लीबोळ सजवण्यात आले होते. अनेक भागात सार्वजनिकरित्या तर काही भाविकांनी वैयक्तिकरित्या घर व परिसराची सजावट करून रोषणाई करण्यात आली होती. भाविकांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला. दिवसभर भजने व गवळणींचे आवाज गावात घुमत होते.

रात्री बारा वाजेपूर्वी सर्वत्र आरतीला सुरुवात झाली. आणि फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा रात्री बारा वाजता पाळणा हलवून व आरती करून साजरा झाला. त्यानंतर उपस्थितांना व भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला.

यावर्षी येथील श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळ्याला हजारो भाविकांनी हजेरी लावत विविध ठिकाणी सजवण्यात आलेल्या श्रीकृष्ण मूर्तींचे दर्शन घेतले.

# मंगळ जन्मोत्सवाच्या आयोजनासाठी बैठक

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १७ ऑगस्ट**

येथील श्री मंगळग्रह मंदिरात २ सप्टेंबर रोजीचा श्री मंगळ जन्मोत्सव हा अभूतपूर्व आहे. या महासोहळ्याच्या नियोजनाबाबत नुकतीच शेतकरी नेते प्रा. सुभाष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत महासोहळ्याच्या एकूणच आयोजन आणि नियोजनाबाबत विविध विषयांवर चर्चा झाली. उपस्थितांच्या सूचना स्वीकारण्यात आल्या. या बैठकीत मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी २९ व ३१ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर रोजी होणाऱ्या तीन दिवसांचा भरगच्च व भव्य धार्मिक कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत माहिती दिली.



श्री मंगळग्रह मंदिराकडे येणाऱ्या मार्गाजवळील भव्य प्रवेशद्वार, त्याठिकाणीच अभिषेक, महाप्रसाद बुकिंग काउंटर, चौकशी कक्ष, मदत कक्ष, चहा कॉफी व पाण्याचे स्टॉल, स्थायी व अस्थायी स्वरूपाची स्वच्छतागृहे, वैद्यकीय कक्ष, चोपडा रोडलगतच्या उघड्या भूखंडावर चारचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था, त्याचठिकाणी देखरेखीसाठी मोठ्या टॉवरची उभारणी, मंदिर परिसरातील पार्किंगच्या ठिकाणी दुचाकी पार्किंग, अपंग, वृद्धांसाठी व्हिल चेअरची सुविधा, मोबाइल्ससाठी स्वतंत्र टॉवर उभारणी, सर्व प्रकारचे अभिषेक व शांतीसाठीची भव्य व्यवस्था, चोपडा रस्त्यापासून ते मंदिरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर वॉटरप्रुफ पेंडॉलची उभारणी, चोपडा रोडवरील शासकीय वसतिगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंदिराकडे जाण्यासाठी प्रवेशद्वाराची उभारणी करुन त्याठिकाणी चौकशीकक्ष, सुरक्षा रक्षक तसेच वसतिगृहाच्या परिसरातील मोकळ्या जागेत दुचाकी, चारचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करणे, सध्याच्या चप्पलस्टँड जवळ ऑनलाइन, डिजिटल, सीसीटीव्ही कक्षाची उभारणी, मंदिराच्या उजव्या बाजूला मोकळ्या जागेत एकाचवेळी सुमारे २५ हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेऊ शकतील, याबाबतची माहिती दिली. सर्वांना संपूर्ण मंदिर परिसर व सर्व व्यवस्था प्रत्यक्ष दाखविण्यात आल्या.

यावेळी व्यासपिठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, डी. ए. सोनवणे, जयश्री साबे, मंगल सेवेकरी विनोद कदम, प्रकाश मेखा, आशा महाले, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण आदी उपस्थित होते.

# ई-पीक पाहणीसाठी तांत्रिक अडचणी!

## नशिराबादमधील शेतकरी हैराण; नेटवर्क, ओटीपी, अॅप क्रॅशमुळे प्रक्रिया ठप्प

**सुनील महाजन**
**नशिराबाद, १७ ऑगस्ट**

राज्यात खरीप हंगामातील पिकांच्या स्थितीची नोंद घेण्यासाठी ई-पीक पाहणी मोहीम सुरू झाली आहे. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांची खरीप पिकांची माहिती ऑनलाइन नोंदवून पारदर्शकता व गती मिळवणे हा आहे. मात्र, नशिराबादकर शेतकऱ्यांना या ई-पीक पाहणीसाठी तांत्रिक अडथळ्यांचा मोठा फटका बसत आहे.




ग्रामीण भागातील कमकुवत मोबाइल नेटवर्क, शेतकऱ्यांच्या मोबाइलवर ओटीपी न मिळणे, तसेच पीक पाहणी अॅप सतत क्रॅश होणे यांमुळे शेतकऱ्यांना आणि संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. काही भागांत संपूर्ण माहिती भरल्यानंतर अॅप अचानक बंद होऊन पुन्हा सुरुवातीपासून माहिती भरावी लागत असल्याने कामाची दगदग वाढली आहे.

**शेतकरी अन् कर्मचाऱ्यांची अडचण**

नेटवर्क समस्या अनेक गावांमध्ये असून, नेटवर्क इतके कमजोर की माहिती अपलोड करणे अशक्य झाले आहे. अॅपमध्ये प्रवेशासाठी लागणारा ओटीपी शेतकऱ्यांच्या मोबाइलवर वेळेत पोहोचत नाही. वारंवार ओटीपीसाठी प्रक्रिया करावी लागत आहे. माहिती भरून पूर्ण केल्यानंतरही अॅप आपोआप बंद होऊन डेटा नष्ट होतो. या अडचणी नवीन नाहीत. अॅप अमलात आले तेव्हापासून येत आहेत. मात्र, शासन-प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात असल्याची स्थिती आहे.

**प्रशासनाला तातडीच्या कारवाईची गरज**

शेतकरी नेत्यांचे मत आहे की, या समस्यांवर शासनाने तत्काळ लक्ष द्यावे आणि अॅप तसेच नेटवर्कची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक तांत्रिक बदल करावेत; अन्यथा हजारो शेतकरी शासनाच्या योजनांपासून वंचित राहतील, असा इशाराही देण्यात येत आहे.

### योजनांवर परिणाम होण्याचा धोका

कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, जळगाव जिल्ह्यात खरीप पेरणी मोठ्या प्रमाणात पूर्ण झाली आहे. तरीही पाहणी प्रक्रिया गती मंदावल्यामुळे आणि नोंद वेळेत पूर्ण न झाल्यास शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, विमा, अनुदान यांसारख्या योजनांवर थेट परिणाम होऊ शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

### शेतकऱ्यांमध्ये नाराजी

या समस्या यावर्षीच नाहीतर सुरुवातीपासूनच सुरू आहेत. जेव्हापासून ही संकल्पना सुरू झाली, अॅप्स अमलात आले, तेव्हापासून 'आपला सातबारा, आपला पीकपेरा आपणच नोंदवा' या शासनाच्या मोहिमेची डिजिटल जाहिरात मात्र जोरात आहे; पण प्रत्यक्षातील अडथळ्यांवर शासन- प्रशासनाने कुठलाही ठोस उपाय केलेला नाही, अशी नाराजी शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



### सामनेरच्या जि. प. शाळेत साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १७ ऑगस्ट**

सामनेर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत ग्रामपंचायतीतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

माजी उपसरपंच बाळकृष्ण साळुंखे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर माजी उपसरपंच रवींद्र पाटील, माजी सरपंच मनोज साळुंखे, देविदास पाटील, भोलेनाथ भिल, उपसरपंच महेंद्रकुमार साळुंखे, ग्रामपंचायतीचे सदस्य महेश पाटील, पोलिसपाटील अरुण गोसावी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी पाटील, बापू चव्हाण, रामा पाटील, नितीन पाटील, ग्रामपंचायत अधिकारी अविनाश पाटील, मकरंद पाटील, ऋषिकेश नेरपगार, प्रशांत सूर्यवंशी उपस्थित होते.

या वेळी जिल्हा परिषद शाळेतील १०८ विद्यार्थ्यांना दू रेघी, चार रेघी आणि चौकडी अशा प्रत्येकी तीन वह्या, पाटी, पेन्सिल, खोडरबर, शॉर्पनर पट्टी, पेन, अशा साहित्याचे वाटप करण्यात आले.

यापूर्वीही जिल्हा परिषद शाळेत प्रत्येक वर्गात दूरचित्रवाणी संच ग्रामपंचायतीतर्फे भेट देण्यात आले आहेत. शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी वॉटर फिल्टर, वॉश बेसिनची सोय जिल्हा परिषद शाळेत करण्यात आली आहे; त्याचबरोबर शाळेला बाला कार्यक्रमांतर्गत प्रत्येक वर्गात रंगरंगोटी करण्यात आली आहे.

या वेळी मुख्याध्यापक धीरज पाटील, दिलीप पाटील, वैशाली पाटील, राजश्री गोपनारायण, प्रियंका पाटील आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक धीरज पाटील म्हणाले की, यापुढेही ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद शाळेला अशीच मदत करत राहावी, अशी भावना बोलून दाखवली.